
# पश्चिम दर्शन

डॉ. सौ. शकुंतला खोत

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं क्र. ६८७









REFBK-0025219

संदर्भ गृहप्रवास
६८७
२५२१९
३०।१२।८९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1987
18 FEB 1987
4 MAR 1987
13 MAY 1987
17 MAY 1987
10 JUN 1987
14 JUN 1987

MAR 198

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

# पश्चिम दर्शन

REFBK-0025219

डॉ. सौ. शकुंतला खोत

हीरक प्रकाशन

प्रकाशिका -

सौ सीमंतिनी सहस्त्रबुद्धे
हीरक प्रकाशन
'कला निवास'
हनुमान पथ,
धरमपेठ, नागपूर-१०.

प्रथमावृत्ती :

७/९/१९८६

© डॉ. सौ शकुंतला खोत
'जयनीता'
रामदास पेठ, नागपूर-१०.

मुद्रक :

श्री विजय बढे
श्री विनायक प्रिंटिंग प्रेस,
रामदासपेठ, नागपूर.

मूल्य : २५ रुपये

हीरक प्रकाशन क्रमांक २२

# अर्पण पत्रिका

जिला भेटण्याकरिता आम्ही परदेशाच्या प्रवासाला निघालो ती आमची कन्या डॉ सौ सुनीता कुळकर्णी ज्यांच्या सतत आग्रहाच्या निमंत्रणामुळे आम्ही हा परदेशचा प्रवास केला ते आमचे बहुश्रुत जामात (डॉ भालचंद्र कुळकर्णी) आणि जिला प्रथमच पाहण्याच्या ओढीने आम्ही उत्साहाने या प्रवासाला निघालो ती आमची छोटी गोड नात (चि. रश्मी कुळकर्णी) या सगळयाना हे पश्चिम दर्शन अर्पण

डॉ. सौ. शकुंतला खोत

# प्रकाशिकेचे निवेदन

पश्चिम दर्शनच्या जेष्ठ लेखिका डॉ. सौ खोत यानी मराठीत सरस अनुवाद केलेल्या मुलांचे रामायण या पुस्तकाची निवड सोफिया (जर्मनी) येथे भरणाऱ्या आतरराष्ट्रीय पुस्कत प्रदर्शनाकरिता झाली याचा आम्हाला आनद व अभिमान वाटतो

त्याच्या या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील कशी आशा आहे.

---

# मनोगत

आपल्याला मिळालेला आनद सर्वाना सांगता यावा, वाचता यावा म्हणून मी सर्व लेख नागपूरला तरुण भारत या दैनिकाकडे पाठवले व ते त्यांनी छापले मी त्यांची ऋणी आहे.

प्रवास परतीनतर नागपूरला अनेक ठिकाणी प्रवासाचे अनुभव कथन केले ते बऱ्याच जणाना आवडले हे पुस्तक रुपाने प्रसिध्द व्हावे अशी अनेकांनी इच्छा प्रदर्शित केली

सुदैवाने हीरक प्रकाशनाच्या सचालिका सौ. सीमतिनी सहस्त्रबुद्धे ह्यानी पुढाकार घेतल्याने हे पुस्तक आज प्रकाशित होत आहे

प्रा प्रकाश कावळे ह्यानी सुरेख मुखपृष्ठ तयार करुन दिले त्याचप्रमाणे मुद्रक श्री बढे ह्यांचे देखील मी आभार मानते.

माझ्या आजवरच्या साहित्याप्रमाणे पश्चिम दर्शनचेही वाचक स्वागत करतील ही खात्री आहे

डॉ सौ. शकुंतला खोत

६८० ३५२१८ ३२५५८६

# परदेशी विमानातला पहिला प्रवास

सध्याच्या विज्ञानयुगात जग जवळ आल आहे. पृथ्वीप्रदक्षिणा करण्याच्या अनेक सोयी उपलब्ध झाल्या आहेत. आणि तरीही कितीही इच्छा असली, आवड असली तरी जगभर प्रवास करण हे जमणार नाही, म्हणूनच कि काय बहुतेक माणसं देशोदेशाची प्रवासवर्णन वाचून प्रवास केल्याच समाधान मिळवतात. हल्ली परदेशाच्या प्रवासवर्णनाची सचित्र पुस्तकही बाजारात बऱ्याच प्रमाणात दिसतात प्रवास कितीही दगदगीचा असला तरी माणूस सतत प्रवास करीतच असतो काही वेळेला हौशीने, आवडीने तर क्वचित नाईलाजास्तव पण एकूण प्रवास करण हे माणसाला आवडणार आहे.

आपल्या भारतात अनेक प्रेक्षणीय शहर, वास्तु आहेत. परदेशाहून या प्रेक्षणीय वास्तु पाहायला प्रवासी येतात त्याचप्रमाणे आपल्या देशातले प्रवासीही परदेशचा दौरा करतात परदेशाबद्दल, तिथल्या प्रेक्षणीय स्थळाबद्दल तिथल्या लोकाबद्दल, त्याच्या चालीरीति, संस्कृती-पेहेराव, रीतीभाती यासगळ्याबद्दल आपल्या भारतीयाच्या मनात नकळत एक उत्सुकता आहे आणि म्हणूनचत्या वैभवशाली अत्याधुनिक देशाची प्रवासवर्णन आपल्याला वाचायला आवडतात परदेशाचा प्रवास कितीही आवडत असला तरी अत्यंत महागडा आहे म्हणून बहुतेकांना ही दुधाची तहान ताकावरच भागवावी लागते एकेकाळी मीही असच करीत होते पण ४ मे १९८३ ची पहाट उजाडली ती विमानातच आणि गमत अशी की ते स्वप्न नव्हत. तर प्रत्यक्षात मी विमानात बसून प्रवासाला निघाले होते.

त्याआधी जर कुणी मला सांगितल असतं की तुम्ही परदेशात जाल, इग्लड, अमेरिका या देशाना गमत म्हणून भेटी द्याल. तर आम्ही त्याला वेड्यात काढले असत ह-तस ज्योतिषानी अनेकदा सांगितलं होत-अगदी बारकाईने तळहाताच्या रेषा न्याहाळून सांगितल होतं की तुम्हाला लोक-

# प्रकाशिकेचे निवेदन

पश्चिम दर्शनच्या जेष्ठ लेखिका डॉ. सौ खोत यानी मराठीत सरस अनुवाद केलेल्या मुलाचे रामायण या पुस्तकाची निवड सोफिया (जर्मनी) येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुस्कत प्रदर्शनाकरिता झाली याचा आम्हाला आनद व अभिमान वाटतो

त्यांच्या या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील अशी आशा आहे.

---

# मनोगत

आपल्याला मिळालेला आनद सर्वांना सांगता यावा, वाचता यावा म्हणून मी सर्व लेख नागपूरला तरुण भारत या दैनिकाकडे पाठवले व ते त्यांनी छापले. मी त्यांची ऋणी आहे.

प्रवास परतीनतर नागपूरला अनेक ठिकाणी प्रवासाचे अनुभव कथन केले ते बऱ्याच जणाना आवडले हे पुस्तक रुपाने प्रसिध्द व्हावे अशी अनेकानी इच्छा प्रदर्शित केली.

सुदैवाने हीरक प्रकाशनाच्या सचालिका सौ. सीमतिनी सहस्त्रबुद्धे ह्यानी पुढाकार घेतल्याने हे पुस्तक आज प्रकाशित होत आहे

प्रा प्रकाश कावळे ह्यांनी सुरेख मुखपृष्ठ तयार करुन दिले त्याचप्रमाणे मुद्रक श्री बढे ह्याचे देखील मी आभार मानते.

माझ्या आजवरच्या साहित्याप्रमाणे पश्चिम दर्शनचेही वाचक स्वागत करतील ही खात्री आहे

डॉ. सौ. शकुंतला खोत

६८० २५२१० ३३७५८६

# परदेशी विमानातला पहिला प्रवास

सध्याच्या विज्ञानयुगात जग जवळ आल आहे. पृथ्वीप्रदक्षिणा करण्याच्या अनेक सोयी उपलब्ध झाल्या आहेत. आणि तरीही कितीही इच्छा असली, आवड असली तरी जगभर प्रवास करण हे जमणार नाही, म्हणूनच कि काय बहुतेक माणस देशोदेशाची प्रवासवर्णन वाचून प्रवास केल्याच समाधान मिळवतात. हल्ली परदेशाच्या प्रवासवर्णनाची सचित्र पुस्तकही बाजारात बऱ्याच प्रमाणात दिसतात. प्रवास कितीही दगदगीचा असला तरी माणूस सतत प्रवास करीतच असतो काही वेळेला हौशीने, आवडीने तर क्वचित नाईलाजास्तव.पण एकूण प्रवास करण हे माणसाला आवडणार आहे.

आपल्या भारतात अनेक प्रेक्षणीय शहर, वास्तु आहेत. परदेशाहून या प्रेक्षणीय वास्तु पाहायला प्रवासी येतात त्याचप्रमाणे आपल्या देशातले प्रवासीही परदेशचा दौरा करतात परदेशाबद्दल, तिथल्या प्रेक्षणीय स्थळाबद्दल तिथल्या लोकाबद्दल, त्याच्या चालीरीति, सस्कृती-पेहेराव, रीतीभाती यासगळयाबद्दल आपल्या भारतीयाच्या मनात नकळत एक उत्सुकता आहे आणि म्हणूनचत्या वैभवशाली आत्याधुनिक देशाची प्रवासवर्णन आपल्याला वाच.य[illegible] आवडतात परदेशाचा प्रवास कितीही आवडत असला तरी अत्यत महागडा आहे म्हणून बहुतेकाना ही दुधाची तहान ताकावरच भागवावी लागते एकेकाळी मीही असच करीत होते. पण ४ मे १९८३ ची पहाट उजाडली ती विमानातच आणि गमत अशी की ते स्वप्न नव्हत. तर प्रत्यक्षात मी विमानात बसून प्रवासाला निघाले होते

त्याआधी जर कुणी मला सागितल असत की तुम्ही परदेशात जाल, इग्लड, अमेरिका या देशाना गमत म्हणून भेटी द्याल तर आम्ही त्याला वेडयात काढले असत ह-तस ज्योतिषानी अनेकदा सागितल होत-अगदी बारकाईने तळहाताच्या रेषा न्याहाळून सागितल होत की तुम्हाला लौक-

रच परदेशगमनाचा योग आहे. पण त्याचा तो 'लौकरच' उजाडेना. आम्हीही सगळ धट्टेवारी नेलं नाहीतरी आपल्यापैकी प्रत्येकाला ज्योतिषाला एकदा तरी विचारावस वाटतं-उगाच आपली गमत म्हणूनच 'का हो मला फॉरेनचा चान्स आहे का ! माझ्या पत्रिकेत तसा योग आहे का! निदान हातावरच्या रेषा तरी नीट बारकाईने पाहून सागा ह . आहे का?' आणि बहुतेक वेळा ज्योतिषी मडळी आपली घाई आणि इच्छा ओळखून आपल्याला सागतात हो-तुम्ही फॉरेनला नक्की जाणार- आपल्यालाही हे ऐकून जरा वर वाटत मन सुखावत-थोडावेळ विमानात बसल्या सारखही वाटत-पण ते तेवढ्यापुरतच-बहुतेकाच हे अस होत पण मला मात्र ४ मे च्या पहाटेला विमानात बसल्यावर प्रवासात हे सार आठवून आठवून भविष्याची गमत वाटत होती सिरीअन एअर लाईन्सन मी आणि माझे यजमान इग्लंडला प्रवासाला निघालो आजवर केवळ नकाशावर पाहिलेली गावाची नावं, लडन, दमास्कस, शारजाह ही आता प्रत्यक्ष पाहायला मिळणार होती

प्रत्यक्ष विमानात बसण्याआधी इतके कागदोपत्री सोपस्कार-तो पासपोर्ट त्यानतर ते फोटो-ती मुलाखत आणि शेवटी मिळणारा तो व्हिसा-या देशातून त्या देशात जायची कागदोपत्री परवानगी-पण हे सगळं आटपेपर्यंत खरंच जीव वैतागला- पण विमानात चढले आणि ती हवाई सुदरी दिसली मात्र सारा वैताग शीण पळाला. खरच ती दिसली तिनं पाहिल ती हसली आणि तिन जिकल की हो मला. तिचा टापटिपेचा पोशाख ते–मृद मधुर हळु आवाजात बोलण-त्या लगबगीनं केलेल्या मोहक चपळ हालचाली सार सार आवडल- या-मी तुमच्या सेवेला हजर आहे-अस जणु आवाहन, आश्वासन तिच्या नजरेत होत आजवर हवाई सुदरी बद्दल खूप ऐकल होतच. पण आज प्रत्यक्ष पाहिलं आणि वाटल सुदरी उगाच नाही म्हटलं हिला.

प्रवासात सगळ्याच प्रवाशाची अगत्यपूर्वक ती काळजी घेत होती. कुणाला पोटावरचा पट्टा बाधायला मदत कर, तर कुणाला मळमळतय म्हणून फळाचा रस आणून दे, तर कुणापुढे पेपरमीटचा बास्केट धरून अदबीन उभ राहण-सगळ कस हसतमुख राहून ती करत होती. विमान प्रवास सुखाचा म्हणतात ते पटल-अगदी अलगद विमानात सहारचा विमा

नतळ सोडला वर विमान उडाल क्षणभर पोटात गोळा आला–नाही वर नाही खाली-दे माय धरणी ठाय अशी अशातरी [illegible] तिला दिसली. तत्परतेन मदतीला हवाई सुदरी पुढे झाली. आता विमानान एकदा मोठ्ठा कर्कश आवाज-कानठळ्या बसविणारा केला आणि मस्तपैकी ते आकाशात हवेत उच उच उडायला लागल आमचा हा प्रथमच विमान प्रमास होता. त्यामुळे हे सगळे बारकावे-टप्पे जाणवले. आणि मग मात्र अगदी सफाईदार अस विमान बराच वेळ चालत राहिल-धावत पळत राहिल

विमानात आतली सोय फारच छान होती एकतर सर्वत्र गालीचे पसरलेले मऊ मऊ गाद्याची सुदर आसनं त्यातून खिडकी जवळ जागा मिळालेली खाली पाहायचा मोह अनिवार होत होता-प्रवाशाच्या सीटजवळाटस जवणाच टवल करण्याची सोयही मला फारच आवडली. पुन्हा हात धुण पुसण काही नको सगळी सोय विमानातच. खाण-जेवण-पिण-झोपण-सगळी छान सोय-जमिनीपासून विमान उच उंच चढताना मद मधूर सगीत अगदी जवळच प्रत्येक सीटच्या जवळ लावलेल्या मायक्रोफोनमधून (इअर फोन) ऐकण्याची सोय-समोर टी व्ही च्या पडद्यावर सिनेमा सुरुही झालेला. खाद्य पदार्थांचे ट्रे ट्रॉलीतून भरभर आले. रगीबेरगी मद दिव्याची आतमध्ये रोषणाही जोडीला मग स्वर्गसुख म्हणतात ते आणखी काय वेगळ ! आपण आता कुठल्या गावात-कुठच्या देशात आहोत याचही भान नव्हत जस कुणाला मस्त मजेत जेवण चाललेल-हरत-हेचे फळाचे रस-सत्रा-पाईनॲपल-टोमॅटो ज्यूस वेगवेगळ्या तऱ्हेची उत्तमपैकी दारु आइस्क्रीम-पुडींग-केक-चहा कॉफी-म्हणाल ते अर्थात या सगळ्याचे पैसे तिकिटात जमा केलेले असतात

बाहेरुन छोट्याशा दिसणाऱ्या पण आत ऐसेपैसे असणाऱ्या या विमानात एकाच वेळी चारशे लोक आपपर भाव विसरुन आरामात जेवत होते. हे दृष्यच मोठ मनोहारी-विविध प्रदेशातल्या चविष्ट पदार्थांच समेलन विविध भाषाची मधूर कुजबूज-मद सगीत-सार मनापासून आवडल. याचवेळी विमानाच्या त्या छोट्याशा खिडकीतून बाहेर खाली पाहण्याचा मोह होत होता आणि बघितल्यावर भीतीच वाटली. विमान तीस हजार फूट उचीवरून उडत असल्याची घोषणा मधूर पण दिलासा देणाऱ्या

आवाजात झाली आणि जेवणातल लक्ष उडाल मनावर उगाचच दडपण आलं. हवाई सुंदरी आपल्या सहकाऱ्यासह मजेत गप्पा मारीत होती माझ तर चित्रपटावरच - जेवणावरच लक्षच उडाल. समोर दिसणारं अफाट आकाश आणि खाली दिसणाऱ्या भयंकर दऱ्या डोंगर पाहून भीतीने पोटात कालवाकालव झाली उगाच या फंदात पडलो असही क्षणभर मनात आल- पण थोड्या वेळान भीती कमी झाली–कारण आता आमच विमान ढगातून जात होत. ढगाशी जणु लपाछपी खेळत होत. चंद्र सूर्याला काबीज करण्याच्या ईर्ष्येने झपाट्यान धावत होत. अंतर कापत होत जेवण आटपून सगळे प्रवासी हळुहळु झोपेच्या आधीन होत होते.इतक्या उंचीवरून आपण विमानातून प्रवास करतो आहोत याचा क्षण-भर विसर पडल्यासारखा झाला आणि चक्क रोजच्या सारखी जेवणानंतर झोप आली. वेगमर्यादेची कल्पना दृष्टीआड झाली. पोटातल पाणीही हलणार नाही. याची काळजी घेत विमान आपल्याच नादात चालतच राहील इतक्यात हळुवार आवाजात घोषणा झाली 'Fasten your belts' आपले पोटावरील पट्टे आवळा. सावध वसा. विमान आता हळुहळु खाली येत उतरण्याच्या, थांबण्याच्या मार्गाला लागल होत विमानाच्या विश्रा-तीचा पहिला टप्पा आला होता. विमान वर उडताना आणि विमान खाली उतरताना हे पोटावरचे पट्टे नीट बांधायला सांगतात म्हणजे यदाकदाचित काही गडबड उदभवली तर आपण वेडेवाकडे फेकले जाऊ नये म्हणून काळजी घेण्याचा तो एक प्रयत्न असतो लागलीच झोप आवरून प्रवासी सावध झाले. पट्टे आवळले गेले आणि दूरवर लुकलुक-णारे दिवे दिसायला लागले.' शारजाह 'आल होत मुंबई ते लंडन जायला निघालेल आमच विमान उड्डाणा नंतर प्रथम थांबलं ते शारजाहला-शार-जाहचा मनोरा दिसला आणि तांबडतोब जाणवल की आपण नव्या मुलु-खात आलो आहोत. रात्रीच्या (पहाटेच्या)काळोखात उंचउंच दिसणारा तो पांढरा शुभ्र मनोरा आणि एक प्रकारची नीरव शांतता–शारजाह गाव झोपेत–साखर झोपेत होत. पण विमान अधिकारी स्वागतसज्ज होते.

याच शारजाहला मध्यंतरी क्रिकेटचा झालेला गाजलेला सामना जो भारताने जिंकला. आणि गावस्कर कपीलदेव यानी मिळवून दिलेला विजय आठवला. तेच हे शहर शारजाह. आज ते प्रत्यक्ष विमानातून

दिसल. शारजाहच्या विमानतळावरले लोक वेगळेच दिसले त्या उंच, भव्य मनोऱ्यासारखेच लोकही उंच धिप्पाड आणि लालबुंद गोरे. विमानातून खाली पाय मोकळे करायला वगैरे उतरण्याची पद्धत नाही सर्वत्र नियमाने बांधलेले त्यामुळे सर्वच प्रवासी सीटजवळच्या खिडकीतून बाहेर पाहून समाधान मानीत होते. विमानान शारजाहला इंधन घेतल पोट भरून घेतल. आणि पुन्हा विमान उत्साहान उडाल एक गोष्ट लक्षात आली की शाहजाहला दिसणारे विमानतळावरले हे लोक अरब वाटले. आणि निदान त्यावेळी तरी विमानतळावर एकही स्त्री, अगदी बुरखाधारीही कुठेही दिसली नाही आम्ही सर्व प्रवासीही पुन्हा पोटपट्टे आवळून पुढच्या प्रवासाच्या तयारीत बसलो विमानात एकसारख खाण-जेवण-चहा, कॉफी फळाचा रस-फ्राईड पुलावा-वाईन-सगळी रेलचेल-त्यामुळे दुसरा उद्योगच उरला नाही. साहजिकच पोटाचा पट्टा आता आवळणं भागच होतं नाहीतरी

पुन्हा विमानाच उड्डाण सुरु झाल आणि मग मात्र एकदम ते दमास्कसला धावल. दमास्कसचा विमानतळ हरतऱ्हेचे गोलघुकरट व मनोरे यांनी झगमगलेला दिसला पुन्हा तशीच धिप्पाड लालबुंद माणस पाहिल्यावर क्षणभर भीती वाटावी अशी-दमास्कसला विमान बदलायच असल्यान आम्ही सगळे प्रवासी खाली उतरलो. सामान परस्पर व्यवस्थित नेण्याची सोय विमान कंपनींकडून असल्याने काळजी नव्हती सगळीजण विमान बदलण्याच्या गडबडीत होती दोन तास विमानतळावर बसल्यानंतर पुढे दुसऱ्या विमानातून लंडनला जायच होत पहिल्या विमानाच्या वैमानिकाने सुखरुप दमास्कस पर्यंत आणल्यावर मला त्याचे आभार मानावेसे वाटले कारण शेवटी हा माझा पहिलाच विमान प्रवास होता न

दमास्कस हे शहर तस फार मोठ नाही विमानतळावर बसल्याबसल्या वेळ काढण भाग होत भाषा इंग्रजी- पण उच्चार वेगळे- नाणी वेगळी त्यामुळे काय कराव कळेना म्हणून तिथल्याच रेस्टॉरंटमध्ये बसलो व थंडी वाटल्याने चहा मागवला मोठी गमतच झाली चहा प्लास्टीकच्या ग्लासातून आणि तोही बिनदुधाचा काळाकुट्ट खूप प्रयत्न करून समजावून सांगितल्यावर वेटरने दूध आणल तेही लहानश्या

प्लास्टीकच्याच त्रिकोनी समोस्यातून समोशाच्या आकारात बद असलेलं ते दूध कस काढाव कळेना. वेटर निघून गेलेला मग तो समोसा फोडला. सर्वत्र दूध उडाल उरलसुरल आपोआपच चहात पडल साखर पाकीट फोडून साखर घातली. कसाबसा चहा घेतला तर पोटात ढवळल्या सारख झाल कारण इथे बिनदुधाचा चहा पितात दूध शेळीच असाव (की उटीणीच ?) कसतरीच लागल आणि इतके सोपस्कार करून चहा जो घेतला तो फारच महाग वाटला दोन कप चहाचे पचवीस रु. (अडीच डॉलर) झाले हे पाहून मात्र पोटात गोळाच उठला. पण शेवटी अनुभवच घ्यायला निघालो होतो ना प्रवासाला त्यातला दमास्कसचा चहा लक्षात राहिला दमास्कसची निराळीच दिसणारी नाणी मी जपून ठेवली आता मात्र लंडन पहाण्याचे वेध लागलेहोते केव्हा एकदा लडनला पोचतो अस डोळयाना झाल होत आणि ते ओळखून की काय विमानही झपाटयानें लडनच्या दिशेने मार्गाला लागल खिडकी जवळच्या माझ्या सीटजवळून ढगाना पकडण्याचे मनोरे मी मनात रचीत होते कवी मन-मोहन याच्या कल्पनाची मला आठवण आली. लोककवी मनमोहनानी एका मुलाखतीत म्हटल होतं "मी चद्रसूर्याची बटनं माझ्या खमिसाला लावेन" ते आठवल आणि वाटलं आपणही हातात मावतील तेवढे ढग पकडायचे पण सारे कल्पनेतले मनोरे विमानातून दिसणार अफाट सृष्टीच वैचित्र्यपूर्ण सौंदर्य पाहून मी थक्क झाले सार दिसणार डोळयात मनात साठवीत राहिले खरच निसर्ग केवढा महान आणि मानव त्या निसर्गाशी स्पर्धा करण्यात, त्याला काबूत ठेवण्यात मग्न झालेला, गढलेला किती प्रयत्नवादी आहे मानव आता आकाश जणुं खाली गेल आणि आम्ही त्यावर वर विमानात बसलेले कारण सगळीकडे खाली-वर, बाजूला ढगच ढग मघाशी मात्र अगदी या उलट स्थिती होती आम्ही खाली विमानात आणि आकाश वर उच आमच्या डोक्यावर छत्र धरून जणु उभ पसरलेल. निसर्गाची क्षणार्धात बदलणारी ही विविध रूप पाहून अचबा वाटला.

आणि मग जगप्रसिद्ध असलेल्या पॅरिसचा विमानतळ आला-दिसला. आणि विमानातून घडलेल त्या मोहमयी नगरीच नयनरम्य रूप पाहून मन सुखावल. सध्याकाळचे सात वाजलेले. घडयाळ पाहिलं वेळ बदलून

घेतली आणि डोळे दिपवून टाकणारा पॅरिस विमानातळावरचा दिव्याचा झगमगाट पहातच राहिले. जणु स्वप्ननगरीत प्रवेश करतो आहो असं वाटल रंगीबेरंगी दिसणारे असंख्य दिवे. ही स्वप्ननगरी मायाजाळात ओढणारी वाटलीच विमान थाबलं. खाली उतरायला परवानगी नव्हती. वेळही फार थोडा होता. त्या रात्रीच्या अंधारात पॅरिसच्या विमानतळा-वर जणु असंख्य पाढरे शूभ्र बगळे उतरावे तशी विमान उभी राहिलेली दुरून दिसत होती. बदकाच्या डौलदार ऐटीत काही विमान हळूहळू धावपट्टीवरून चालत होती तर काही विमान माशाच्या शेपटचा वर उभ्या धराव्यात तशा पद्धतीने ताफ्यात उभी होती. इतकी विमान एकाच वेळी उभी असलेली मी कधी पाहिलीही नव्हती त्यामुळे आपण खरच परदेशात आता आलो याची खात्री झाली. बावळटासारखी मी पॅरि-सचा विमानतळ पहात राहिले माझ्याकडे पाहून एक अनोळखी फ्रेंच स्त्री हसली, तेव्हा माझा बावळटपणा मी लपवला आणि सराईत प्रवासी असल्याचा आव चेहऱ्यावर आणला तिने क्षणार्धात प्रसाधन आटोपलं आणि नजरेनच निरोप घेऊन ती पॅरिसलाच उतरली. विमान प्रवासातून उतरताना आपण बरी पोचताच ताजंतवान दिसाव म्हणून क्षणार्धात प्रसाधन करण्याची तिची हातोटी पाहून मी मात्र बावचळले क्षणात ती किती सहज सुंदर नटली आणि अगदी ऐटीत उतरून गेली सुद्धा आता या परदेशच्या प्रवासात बावळटपणा कुठेही दाखवायचा नाही सराईता-प्रमाणे आपण वागायच अस मीही ठरवून टाकल पण तरी कुठेकुठे बावळटपणा फजिती झालीच. पुढे त्याबद्दल मी लिहीणारच आहे.

पॅरिसने हुरहूर लावली प्रसिद्ध आयफेल टॉवर परतताना बघाय-चाच अस मी ठरवल विमान पुन्हा वर उडाल आता शेवटचा प्रवा-सातला टप्पा लंडनचा- लंडन येणार पुढे प्रवास सुरू झाला आणि लौकरच ज्याची आज चार महिने आम्ही स्वप्न दृष्य पाहिली तो लंडनचा 'हिथ्रो' विमानतळ आला आणि लंडनला आम्ही प्रत्यक्षात जाऊन पोहोचलो.

—००—

# लंडनचे प्रथम दर्शन

लडन ही ग्रेट ब्रिटनची राजधानी आहे. तसेच उत्तर आयर्लंड-वेल्स, स्कॉटलड या इंग्लड आणि वेल्सच्या प्रजासत्ताक, लोकशाहीचा कारभारही याच लडनहून चालतो त्यामुळे लंडन हे राजधानीचे शहर असल्याने ते पाहण्याची फार उत्सुकता मनाला लागलेली होती बऱ्याच वर्षापासून लंडन हे नाव या शहराचे हे नाव मनाला खुणावीत होते. लहानपणासून लडन या शब्दानें नावाने, मनात एक दबदवा निर्माण केला होताच कारण माझ्या लहानपणात आपल्या भारतावर ब्रिटीशाचे राज्य होते. देश स्वतंत्र झालेला नव्हता आणि म्हणूनच भारताचा कारभार ब्रिटीश मुत्सद्दी-राजकारणी मुत्सद्दी जे इग्लड मध्ये राहात होते. त्याच्याकडून त्याकाळात चालत होता माझ्या लहानपणात तर पचम-जाज राजाच्या वाढदिवसानिमित्त मुबई शहराने केलेली विजेच्या दिव्याची रोषणाई मी टॅक्सीत बसून पाहिलेली आजही आठवते व त्यावेळी आमच्या सरकारी शाळेत आम्हाला वाटण्यात आलेली मिठाई देखील आज आठवते-तर असे हे इग्रज राज्यकर्ते आणि त्याचा लडनला असणारा मुक्काम, त्या लोकाचे लालसर गोरेपण, त्याची सफाईदार इग्रजी भाषा (जी आम्हाला कधीच नीट जमली नाही) आणि म्हणूनच त्याच्या मुक्कामाचे हे लडन शहर लहान वयापासूनच माझ्या मनात घर करुन होते म्हणूनच लडनला जाण्याची व लडन शहर पाहण्याची मला फार उत्सुकता होती लडन हे राजधानीचे शहर असल्याने राणीचा मुक्काम तिथेच आहे तिथला बकिंगहॅम पॅलेस मधे राणीचे वसतीस्थान आहे ती राणी-राजा, राजपुत्र व राजकन्या याना पाहण्याचीही मनाला घाई झाली होती राजवाडा तर आजवरच्या आयुष्यात कधीच पाहायचा योग आला नव्हता. म्हणूनच लडनला राहणाऱ्या या इंग्लीश राणीचा राजवाडाही मला पाहायचा होता.

लडनलाच हा बकिंगहॅम राजवाडा असून तिथेच सरकारी कामकाज चालणारे पार्लमेंट लडन शहरात आहे–आज भारत स्वतंत्र झाला–पण राणीच्या अमलाखाली असलेल्या छोट्या छोट्या बेटाची कामकाजाची सोय व्हावी म्हणून वेल्सची राजधानी कार्डिफला तर स्कॉटलडची एडिंबरोला व उत्तर आयर्लंडची बेलफास्टला अशी सगळी व्यवस्था आहे

ब्रिटीश राज्याची भाषा ही सर्वत्र इंग्रजीच आहे. इग्रजाना आपल्या इग्रजी भाषेचा फार अभिमान आहे आणि ते अगदी स्वाभाविकही आहे. सर्वच इग्रजी भाषेतून कारभार चालतो असे दिसून आले आणि पुढे अमेरिकेला आम्ही गेल्यावरही तिथेही आमच्या उपयोगाला इंग्रजी भाषा सोईची झाली इग्रजी भाषा व्यवहारासाठी सर्वत्र सोईची वाटली. अर्थात फ्रान्समध्ये मात्र इग्रजी कुणीच बोलत नाही त्याना त्याच्या फ्रेंच भाषेचा अभिमान आहे त्याना इग्रजी भाषा समजतही नाही आणि ते फ्रेंच भाषेखेरीज दुसरी कोणतीच भाषा बोलत नाहीत असे दिसून आले अमेरिकेत मात्र इग्रजी भाषा चालते पण अमेरिकन उच्चार मात्र वेगळे आहेत. आघातही वेगळेच आहेत त्यामुळे अमेरिकेतले इग्रजी समजायला जरा वेळ लागतो पण काम निभावते अमेरिकेला गेलो तेव्हा आम्हाला आमच्या इग्रजीच्या ज्ञानाचा, भाषेचा उपयोग झाला हे मात्र खरे उच्चार समजायला मात्र थोडा त्रास झाला पण परदेशात आणि परदेश प्रवासात सर्वत्र इग्रजी चालते हे अनुभवाला आले

असे असले तरी १९६७ पासून वेल्समध्ये मात्र इग्रजाचे राज्य असूनही वेल्श भाषेला इग्रजीप्रमाणे समान दर्जाचे महत्व तेथे प्राप्त झाले आहे वेल्समध्ये वेल्शभाषेचा वापर व मान आहे सरकारी कामकाज, राज्यकारभार, न्यायालये या सर्वच बाबतीत वेल्श भाषेचा इग्रजीबरोबरीने सन्मानाचे स्थान मिळाल्याने या सगळ्या गोष्टी वेल्श परगण्यात वेल्श भाषेमध्ये चालतात असे समजले फ्रेंच भाषेचा वापर व दर्जा याना दुय्यम स्थान आहे. जर्सी येथे फ्रेंच भाषा चालते भाषेची अडचण सर्वच प्रवासात आम्हाला कुठेच जाणवली नाही कारण नाहीतर पावलापावलावर भाषेशिवाय माणसाला व्यवहार करणे कठीण जाईल आणि परदेशातल्या प्रवासात तर भाषा (निदान इग्रजी) ही तर फारच महत्वाची गोष्ट ठरते.

लंडन शहर हे राजधानी चे शहर असून ते थेम्स नदीवर वसलेले आहे दक्षिण पूर्व वाहणारी ही थेम्स नदी लंडनच्या सौंदर्यात भर टाकते. लंडन शहराची रचना ही थेम्स नदीच्या पार्श्वभूमीवर आहे. प्रत्यक्ष लंडन शहर मात्र लहानसे आहे. राजधानीचे असले तरी तसे हे शहर म्हणजेच मुख्य लंडन शहर लहानखोरेच आहे सुरुवातीला लोकसंख्याही फारच थोडी होती लंडनची लोकसंख्या त्यावेळी सुरुवातीला फक्त पाच हजार-च्या आसपास होती तरीही लंडनमध्ये कामाच्या निमित्ताने लाखो लोकांची ये जा होत असते लंडनची बाजारपेठ ही नावाजलेली आहे. लंडन शहराची स्थापना इ सन १८८८ त झाली त्यावेळेला फक्त ११७ मैलाचा टापू या शहराने व्यापलेला होता तेव्हा पासून हळुहळु सगळाच व्यवहार, व्यापार व इतर बाबतीत वाढतच राहिला आणि जसजशी लोकसंख्या वाढत राहिली तसतशी व्यवहारसाठी 'मिडलेक्स' आजुबाजुचे परगणे 'केंट', 'हर्टफोर्डशायर' वगैरे टापूने मोठे लंडन शहर उदयाला आले. दिवसेंदिवस ही उर्जितावस्था वाढत्या प्रमाणावरच आहे आज लंडन शहराचा परिसर अत्यंत गजबजलेला असून तो अंदाजे ६२५ मैलाच्या टापू इतका वाढलेला आहे. आणि त्याच प्रमाणात लोकसंख्येची ही वाढ झाली असून जवळजवळ ६ लक्षाच्या पुढे ही लोकसंख्या गेली आहे आता पूर्वीचे लहानसे लहानखोरे लंडन शहर कुठल्याकुठे गडप झाले आहे आजच्या घटकला वाढलेल्या लंडन शहराला मोठे लंडन म्हणावे लागते व लोकसंख्या जवळजवळ १२ लक्षाच्या आसपास आहे.

लंडन शहराचे सबंधी सगळे ऐकून हे शहर पाहण्याची उत्सुकता अधिकच वाढत होती आज हे शहर अद्ययावत आहे सर्व सोयींनी परि-पूर्ण आहे आधुनिक सुखसोयी, विज्ञान, व्यापार, फॅशन सगळ्याच गोष्टीत आजच्या लंडन शहराने पूर्वीच्या लहानशा लंडनचे स्वरूप पार पुसून टाकले आहे

आजचे लंडन शहर हे दोन भागात विभागले गेले आहे त्यात एक भाग लंडन शहर व दुसरा भाग त्यात असणारे जवळजवळ ३२ परगणे या परगण्याचा कारभार त्या त्या जिल्ह्यात असणाऱ्या अधिकारी व्यक्ती-मार्फत चालविला जातो लंडन शहराचा कारभार कोर्ट ऑफ कॉमन्स कौंसील तर्फे चालतो आपल्या नागपूरला जसे मेयरचे स्थान महत्वाचे

तसेच लॉर्ड मेयर हा त्या कोर्ट कौन्सीलचा मुख्य अधिकारी वार्षिक निवडणूक पद्धतशीरपणे याकरिता होत असते व मेयरपदाचा मान हा योग्य व्यक्तीकडे जातो जवळजवळ १५९ मेंबर या कौन्सीलचे असतात हे सर्वचजण लडनचा कारभार चोख चालवितात पण मोठ्या लडन शहराकरिता १०० सभासदाचे एक मडळ असते व दर चार वर्षांनी ते निवडले जातात लॉर्ड मेयरचे वसतीस्थान म्हणजे 'मॅन्शन हाऊस'– काही सभासद सहाह्यात असतात ते अनुभवी व वयोवृद्ध असतात व शहराची सर्वतोपरी काळजी घेतात व्यवस्था पहातात. लॉर्ड मेयर हे पद ११९२ साली प्रथम सुरू झाले. अनुभवी व जाणकार शिक्षणाने परिपूर्ण असलेली व्यक्तीच मेयर पदासाठी निवडली जाते त्यामुळे एकूण लडन शहराचा कारभार व्यवस्थित चालविला जातो

लडन शहर हे थेम्स नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर वसलेले आहे व दिवसेदिवस वाढतच आहे किंबहुना थेम्स नदीमुळे शहराचे दोन विभाग झाले आहेत दोन्ही किनाऱ्याच्या बाजु गजबजलेल्या आढळतात–लडन बदरातून बोटींची वाहतूक चालते. या बदराची जगात ख्याती आहे– एकेकाळी ब्रीटनमध्ये हे एकमेव बदर होते व सर्व जगाशी ब्रिटनचा व्यव-हार या बदरातूनच चालत असे. दिवसेंदिवस अधिकाधिक भरभराट होऊन व्यापाराच्या दृष्टीने लडन बदर व म्हणूनच लडन शहर हे एक प्रमुख व्यापारी केंद्र बनले आहे असे आज दिसून येते बदराचा सर्व कारभार व्यापाराकरिता व्यवस्थित चालविला जातो बदराने एकूण १६ स्क्वेअर किलोमिटर एवढी जागा आज व्यापली आहे लडन ब्रीज व टॉवर ब्रीज ही तेथली प्रमुख नावे आढळतात लडन ब्रीज इज फॉलींग डाऊन हे गाणेही या सदर्भातले प्रसिध्द गाणे आहे. शाळेतल्या लहान मुली हीं गाणे मोठ्या आवडीने व अभिमानाने म्हणताना दिसतात.

मुख्य रहदारीचा व भरभराटीला आलेला वाढलेला भाग टॉवर ब्रीजच्या आसपासच्या २० मैलाचा आहे या सगळ्यातून मुख्यत: मोटरी निर्यात केल्या जातात. तसेच मशिनरी व केमिकलसही निर्यात होतात. व त्या बदली धान्य, तेल, लाकूड वगैरेची आयात केली जाते. अशी ही थेम्सची बाजारपेठ लडनच्या वाहतुकीचा दुसरा प्रकार म्हणजे विमानमार्गे चालणारी वाहतूक–असख्य विमाने उडताना दिसतात सारखी जा ये

चालुच असते. सुरुवातीला मला एकसारखी विमाने उडताना पाहून नाविन्य व कौतुक वाटले पण मग पुढे व पुढच्या प्रवासात तो रोजचाच एक भाग झाल्याने कौतुक कमी झाले आपल्याकडे जशा लहान रस्त्यावर सारख्या सायकली तशी लंडनमधे रस्त्यावर मोटरी व आकाशात विमाने आढळतात. लंडनमधे दोन मोठे विमानतळ आहेत त्यातला प्रसिध्द विमानतळ हिथ्रो आज सर्वांच्या ऐकून परिचयाचा आहे तसाच गॅटविकचा विमानतळही प्रसिध्द आहे हिथ्रोचा विमानतळ पाहून मी तर थक्कच झाले. कारण प्रथमच मी एवढा मोठा विमानतळ पहात होते जवळजवळ १४ मैल लांबीचा हा विमानतळ आहे. आणि या विमानतळावर तीन मजले वरवर चढत जाऊन मोटारीचे पार्किंग करावे लागते तरीही तीन्ही मजले मोटरीनी पूर्ण भरलेलेच असतात सतत मोटरीची ये जा चालुच असते. पार्किंगची सोय फारच छान वाटली पण जागा मिळणेही कठीण दिसले इतके मोटरवाले लोक आढळले

इथे रस्ते अतिशय रुंद–स्वच्छ व आखीव आहेत त्यातही वेगमर्यादा हा प्रकार आहे कमाल व किमान वेगमर्यादा ज्याला जशी हवी त्या त्या पट्ट्यातून त्याने आपली मोटर चालवायची असते वाहतूक चालू असताना सहसा हॉर्न कुणीही वाजवत नाही–तशी पध्दतच नाही पुढे जाण्याची घाई असण्यास आपला वेगमर्यादेचा पट्टा (Track) बदलायचा अतिशय काळजीपूर्वक वाहन चालवावे लागते कारण बहुतेक मोटारीचा वेग विलक्षणच असतो. प्रत्येकालाच घाई असल्याप्रमाणे दिसते. व म्हणून वेगाने असंख्य मोटरी व्यवस्थित मैल अन मैल पळत असतात. त्यामुळे वाहतूकही पध्दतशीर दिसली मोटारीचा तो पाठशिवणीचा खेळ पाठलाग पहात रहावासा प्रेक्षणीय वाटला निदान प्रथम दर्शनी तरी अचंबा वाटला व मजाही वाटली मग मात्र मोटरीची रांग हे रोजचेच झाले. बरे, मोटरीचे नमुने (Models) तरी किती व रंग किती विविध आणि चकाकी किती ! आपले तोंड त्यात सहज पाहून घ्यावे असा चकमकीतपणा–एकूण लंडन शहरात मोटरीची प्रेक्षणीय रांग दिसते. पार्किंगची अतिशय छान व्यवस्था आहे तरीही मोटरीचे प्रमाणच इतके वाढलेले आहे की पार्किंगचा नेहमी प्रश्न येतो. त्यातही रस्त्यावर पार्किंग करता येत नाही. फारच काम अडले तर कायदेशीरपणे तासाप्रमाणे गाडी विशिष्ठ पट्ट्यात

ठेवायची पध्दत आहे व त्याचे भाडे तासाप्रमाणे तिथेच भरावेही लागते. गाडी चालवताना हॉर्न वाजवणे हा गुन्हाच ठरतो—यदा कदाचित तुम्ही हॉर्न वाजवलात तर चारही बाजूनी वाहने गोळा होतात चौकशी होते. पण हे प्रसग क्वचितच आढळले. गाडी चालविणाराने व त्याच्याशेजारी पहिल्या भागात बसणाराने गळ्यापासून खाली खास बनविलेला पट्टा बाधलाच पाहिजे. नाहीतर दडही होऊच शकतो अपघातापासून बचाव म्हणून ही पध्दत आहे मुख्य म्हणजे नेमून दिलेल्या सर्व नियमाचे व कायद्याचे काटेकोरपणे पालन करण्याची तिथल्या सर्वच लोकाना सवय लागलेली दिसली—कायद्याचे कुणीही उल्लघन करीत नाही—प्रत्येकजण जबाबदारीने वागतो त्यामूळे वाहतूक व्यवस्थित चालते इग्रजाच्या अगा-तच शिस्त आणि कायदा मुरलेली आहेत

बोटीवरील पाण्यातून चाललेली वाहतूक असो वा रस्त्यावरील मोटारीची वाहतूक असो अथवा आकाशातून हवेतून विमानातून चाल-लेली वाहतूक असो सगळीकडे कायदा व्यवस्थित पाळला जातो हे कौतुक करकाण्यारखे व आपण शिकण्यासारखे आहे

हिथ्रो हा जसा आतरदेशीय मोठा विमानतळ आहे तसाच गॅटवि-कचा दुसरा एक विमानतळ सतत वाहतूक करताना दिसतो. हा आहे ३० मैल लाबीचा व दरवर्षी दशलक्ष नागरिकाची या मार्गे वाहतूक चालत असते हा विमानतळही गजबजलेला तसे दोन आणखीही बिमानतळ लड-नमध्ये आहेत. ते अर्थातच लहान आहेत व खास, खासगी चार्टर्ड विमा-नाची जा ये तिथून चालते त्यातला एक लूटनचा व दुसरा स्टॅनस्टेडचा विमानतळ. हे गावातल्या गावात उपयुक्त ठरतात विमानवाहतूकही दिवसें दिवस वाढतच आहे त्यामुळे या सर्वच विमानतळावर गर्दी आढ-ळते विमान वापरणे, विमान प्रवास, विमान खरीदणे हे प्रमाण भराभर वाढताना दिसते म्हणूनच विमान प्रवासाला व विमानतळाना महत्व प्राप्त होत आहे विमानाने प्रवास ही तिथे आज चैन नसुन ती एक गरज व्हायला, वाटायला लागली आहे दैनदिन जीवनाची गरज व खर्च म्हणून त्याकडे आज पहावे लागते.म्हणूनच लडनला आकाशात विमानाचे असख्य पतग उडताना पाहून मनाला प्रथम आश्चर्य वाटले. मग ओसरले. लडन-मधील बससेवा ही फारच सुखाची सोय आहे.बसेस एकमजली दोनमजली

व अतिशय नियमीत आहेत बसची वाट पाहणे व वाट पाहून कटाळणे नाही-आपल्या कडच्या प्रमाणे शिव्या (मनातल्या मनात ह) देणेही नाही किंवा वाकूनवाकून बस येतेय का पाहणे नाही. इग्रज माणूस घड्याळाबर हुकूम चालणारा आहे मग तो बसचा ड्रायव्हर असला तरीही त्यामुळे बस वेळेवर येत असते सर्व टाईम टेबल बस स्टॉपवर नकाशासहित लावलेले असते माहिती व्यवस्थित लिहलेली असते. इतकी व्यवस्थित कि नवशिक्या माणसालाही ती सहज समजावी. कुणाला विचारत बसायला नको (मला आपल लडनची बस पाहुन आठवल का हो ही बर्डीला जाते का ?) तेव्हा बससेवा हे स्वतत्र प्रकरण व्हावे इतके व्यवस्थित आहे. बसमध्ये चढल्यावर आपणच यत्रात पैसे टाकायचे (नाणी) मग हात तयार ठेवायचा–अलगद तिकीट हातात पडते नाणी मात्र हिशोबाने मोजून बरोबर टाकावी लागतात. यत्राचे तुम्ही व्यवस्थित पोट भरलेत (नाणी टाकून) कि यत्र तुम्हाला इमानाने चोख व त्वरित सेवा देते हे इग्लडमध्ये मी प्रथम पाहिले

लडनमध्ये काम करणाऱ्याची सख्या सर्वात अधीक आहे कारण तिथेच सगळी व सर्वात मोठी बाजारपेठ आहे त्यामुळे वाहतुकीची सर्व साधने व मार्ग व्यवस्थितच ठेवावे लागतात- नोकरीनिमित्त तिथे सर्वात अधिक लोक (जवळच्या युरोपातूनही) येत असतात, त्यामुळ त्यातील आठ लक्ष लोक रेल्वेने प्रवास करीत असतात तर एक दीड लक्ष लोक मोटरने प्रवास करतात, व एक दीड लाक्ष लोक बसने ये जा करतात आणि उरलेले दहा हजार लोक मोटरसायकल स्कुटर वा सायकलने प्रवास करीत असतात. हे सगळे रोजच घडत राहते. म्हणूनच वाहतुकीची साधने व मार्ग व्यवस्थित ठेवावेच लागतात. लोकही आपल्याकडून जबाबदारीने वागतात त्यामुळे अपघाताचे एकूण प्रमाण कमी आहे.

लडनच्या बसमध्ये मी प्रथम बसले तो अनुभव मी पुढे लिहीणारच आहे नव्या माणसाला आश्चर्य वाटावे कौतुकही वाटावे, अशी ही सगळी अद्यावत व्यवस्था बसमध्ये आढळते. आणि याहीपेक्षा पुढे प्रवासी बस (Tourist Bus) म्हणजे खरोखरीच सुखाचा प्रवास वाटावा अशी व्यवस्था त्यात असते हे मी प्रत्यक्ष अनुभवले इग्लडमध्ये व अमेरिकेत सर्वत्र अशीच सुखाची बसव्यवस्था आहे स्वच्छता, नियमीतपणा, निय-

मात्रे काटेकोरपालन वेळेचे व्यवस्थित पालन (minute to second) प्रवाशाच्या सुखाला, सोईला महत्व, तत्पर सेवा, योग्य मार्गदर्शन माहिती पुरवणे-वेग नियत्रण ठेवणे हे सगळेच मला बस प्रवासात सर्वत्र आढळले—अनुभवाला आले आणि हे असे व्यवस्थित आज वर्षानुवर्षे चालले आहे (केवळ सौजन्य सप्ताहा पुरते नव्हे)

लडनमध्ये शहरातली (आगगाडी) व्यवस्था भुयारी पद्धतीची आहे. जमिनीखालून ट्रेन वाहतुकीचे जाळेच्याजाळे पसरले आहे पण कुठेही गोंधळ नाही हे विशेष शहरात सकाळच्या व सध्याकाळच्या वेळी, एन कामाला जाण्याच्या वेळी व घरी परतण्याच्या वेळी ट्रेनला गर्दी असते. पण लाईनीत उभे राहण्याने सर्व व्यवस्थित काम सुरू राहते जमिनीखालून धावणाऱ्या भुयारी ट्रेन्स या अधिक वेगाने जाणाऱ्या असतात. सर्वात अधिक गर्दी (ट्रेनला) असते तेव्हा वेगही तसाच आवश्यक आहे हे तितकेच खरे जवळजवळ सात लक्ष लोक आगगाडीने प्रवास करतात. प्रत्येक स्टेशनवर नकाशा माहितीकरता तयारच असतो ट्रेन कुठून निघते, कुठेकुठे थाबते, कुठे शेवटचे स्टेशन हा सगळा मार्ग नावानिशी लिहून लावलेला असतो. नवीन माणसाची त्यामुळे फार मोठी सोय होते. लडनच्या मुख्य शहराला (ग्रेटर लडन) या आगगाडीच्या वाहतुकीचा बराच फायदा होतो व लोकाचीही त्यामुळे मोठी सोय होते. सर्वात अधिक गर्दी बाकर्लु व उत्तरेकडील भागाला आढळते लडन मधील ही भुयारी रेल्वे जगातली सर्वात जुनी व सर्वप्रथम अशी आहे इ. सन १८६३ मध्ये पहिली भुयारी गाडी (ट्युब ट्रेन) धावली इलेक्ट्रीकवर चालणाऱ्या गाडीची सुरुवातही इ सन १९०६–७ ला झाली तेव्हापासून आजपर्यंत त्यात अधिकाधिक सुधारणाची भरच पडत आहे लडनच्या या जगातल्या सर्वात जुन्या असलेल्या भुयारी रेल्वेचे मुख्य केन्द्र (स्टेशन) व्हिक्टोरिया हे होय इथून सर्व गाड्या सुटतात व इथे सर्व परततात. आपल्याकडे जसे बोरीबदर (V T.) तसे तिकडे व्हिक्टोरिया- हे देखिल त्यावेळच्या राणीच्या नावे आहे व्हिक्टोरिया टर्मिनस (V. T.) जसे मुबईचे तसे लडनचे हे व्हिक्टोरिया स्टेशन टर्मिनस आहे. या भुयारी रेल्वे पद्धतीचा व त्यातील जमिनी खालील स्टेशनाचा युद्धकाळात बॉम्ब हल्ल्यापासून

जीव बचावण्याकरिता चांगलाच उपयोग झाला लोक अशावेळी सुरक्षित जागा म्हणून इथे आसरा घेत असत

बसेसमधूनही बहुसख्य प्रवासी प्रवास करतात अशा डबलडेकर (दोन मजली) बसेस सुदर, स्वच्छ, रुद व मोकळचा रस्त्यावरून हॉर्न न वाजवता धावु शकतात याचेच मला नवल वाटले व कौतुकही वाटले. आठवडचाला ४॥ लक्ष लोक या बसेसचा फायदा घेत असतात एका तासाला साधारण ३६ बसेस सुटतात हे प्रमाण आहे 'वेस्टमिनिस्टर', 'ट्राफलगार स्क्वेअर' या गर्दीच्या व गजबजलेल्या ठिकाणी सर्वात अधिक बससेवा चालते याशिवाय लाल रगाचे बाण असलेली एक मजली बस आहेच ती मात्र ठराविक स्टेशन (Stops) थाब्यावरच थावते बस सेवा लडन वाहतूक कपनीच्याकडे असून ती ते व्यवस्थित चालवतात.लडनमध्ये अनेक जाती, धर्म व देशाचे लोक राहताना दिसतात व्यापार नोकरी, शिक्षण व इतर कामे या निमित्ताने ते कायमचे लडनमध्येच आता स्थायिक झाले आहेत. त्यामुळे लोकसख्या भराभर वाढत आहे व लडन शहराचे बाजारपेठ, व्यापारकेन्द्र म्हणून महत्वही अधिकच वाढले आहे. १९ शतकाच्या सुरुवातीला व्यापाराच्या निमित्ताने काही चिनी व काही आफ्रिकन लोक जे लडनला आले ते आज तिथेच स्थायिक झालेले आहेत. तर इतर कारणाने वेस्ट इडिज, सायप्रस, हिन्दुस्थान व पाकिस्थान येथूनही बरीच सख्या लडनला येऊन आज तिथेच कायमची राहिली आहे. या सगळचाचा परिणाम लडनची लोकसख्या वाढण्यावर झाला आहे अलिकडे लडनमध्ये बरीच अरब देशातलीही मडळी दिसतात त्यानी तर लडनमध्ये हॉटेल्स विकत घेऊन व्यापार सुरू केला आहे. ही अरब जमात श्रीमत असल्याने लडनमधील उची हॉटेल्स याच्या आज मालकीची आहेत त्यामुळे लडन शहराचे आजचे स्वरुप हे मिश्र दिसते व अठरापगड जातीधर्मांचे व वेगवेगळचा देशाचेही लोक तिथे कायमचे घरे करून राहिलेले दिसतात हिथ्रो विमानतळावरुन लडनला पोचणे नवख्याला एकदम कठीणच काम आहे पण तरीही हातातला नकाशा, बसची, भुयारी रेल्वेची सोय यामुळे सगळ जमून गेल. लडन सबधी बऱ्याच गोष्टी— प्रत्यक्षातच या पुढे पाहायला, अनुभवायला मिळाल्या.

लडन आल हिथ्रो विमानतळावर आम्ही एकदाचे पोचलो आणि सगळचा प्रवाशानी सुटकेचा निश्वास टाकला. नजरेनेच एकमेकाचा निरोप घेत प्रवाशानी विमानाबाहेर पडण्याची तयारी केली. जो तो ऐटीत (साहेबाच्या) विमानातून बाहेर पडत राहिला त्याचवेळी आकाशात तीन इद्रधनुष्य दिसली. तिरगी अशा तीन इद्रधनुष्यानी लडनच प्रथम दर्शन झाल–मोठ विलोभनीय अस हे दृश्य दिसल..असख्य विद्युदिपानी आणि रगीबेरगी विमानाच्या सुसज्य ताफ्यानी नटलेला लडनचा हिथ्रो हा विमानतळ भव्य वाटला हाडापर्यंत आतआत बोचणारी थडी ही ब्रिटनची पहिली ओळखीची सलामी ठरली एकदम गारठा वाटला. एअरबसने आम्ही हळुहळु विमानतळाबाहेर पोचलो–सामान घेतल आणि मनावर आलेल दडपण जराही चेहऱ्यावर दिसू न देता हॅलो–हॅलो करीत मार्गाला लागलो आता आम्ही साहेबाच्या देशात आलो होतो–सार कसं हुषारीने–चटपटीतपणे शिस्तीत करायला लागलो–कारण आजुबाजूला सगळीकडे शिस्त दिसत होती एवढ्या मोठ्या विमानतळावर हळूवारपणे माणस कुजबुजत होती– गोगाट नव्हता हे आश्चर्य वाटल आणि आठवला मुबईचा सहार विमानतळावरचा बाजार. आतां आमच्या परदेशप्रवासाला खरीखुरी सुरुवात झाली होती.

–००–

# निवडक लंडन दर्शन

लालबुद गोरे लोक, त्याचे विशिष्ठ इग्रजी उच्चार आणि लगबगीनं आपल सामान उचलून ऐटीत चालण्याची शिस्तबध्द पध्दत सार त्याच्या व्यक्तिमत्वाला साजेसच, अगदी ऐंशी वर्षांचे म्हातारे आणि तशाच वयोवृध्द स्त्रिया व्यवस्थित कपडे, मेकअप करुन हळूवार (हे महत्वाचं नाही का ?) आवाजात एकमेकाशी बोलत सामानासह अगदी तरुणाप्रमाण उत्साहान तुरुतुरु चाललेले पाहून साहेबाच कौतुक करावस वाटल त्याचा हा उत्साह आपल्याला तर आवडला-सकाळ, दुपार, सध्याकाळ, अगदी रात्रीही केव्हाही पहा इग्रजी साहेब चोवीस तास शिस्तीतच, सुटाबुटातच पद्धतशीर आणि उत्साहाने वागताना दिसला इथल्या आमच्या निवासस्थानो(डार्लिग्टन)येतायेता घडलेल लडनच आणि इग्लीश माणसाचं हे दर्शन छानच होत गोऱ्या गोबऱ्या गालाची लालबुद तोडाची लहानलहान मुल, त्याना ढकलगाडीतून लगबगीने ढकलीत नेत बाजारहाट करणाऱ्या इग्लीश स्त्रिया-स्वच्छ रस्ते सुदर सजविलेली दुकानं, अगदी कुठेही औषधालाही कचरा नाही सथपणा नाही कटाळा नाही-निदान दर्शनी तर नाहीच नाही-बाकी एक मात्र खर हे-या प्रवासात माझ इग्लीश सुधारलं (खर नाही न वाटत) लडनला आल्यानतर कधी घरच्या गाडीन तर कधी लडनच्या प्रवासी बसन लडन पाहण सुरु झाल

लडनमध्ये पाहण्याजोग खूपच आहे सवड आणि निवड मात्र हवी-कारण शेवटी हा प्रवास आहे त्यामुळे थोडया वेळात सोयीनुसार सर्व पाहायला हव-प्रथम दिसला तो 'हाईड पार्क' तिथली ती हिरवळ पाहून वाटल पाचूचाच गालिचाच पसरला आहे-टयुलिप्सडॅफोडिल्स,चेरीबुलॉसमची पिवळी, लाल, गुलाबी सुदर फुल-ताटवेच्या ताटवे पसरलेले पण कुणीही फुल चोरत नव्हत-हे पाहून नवल वाटल-सगळी जोडपी हाईड पार्कमधे लपूनछपून प्रेम करण्यात दग दिसली. त्याच्या कडे पहाव तरी पंचाईत-

न पहाव तर स्वस्थ बसवेना–पण आता यापुढे परदेशात अशी प्रेमात दंग झालेली मंडळी जोडपी वारंवार दिसणार तेव्हा त्याची सवय करायलाच हवी, म्हणून दुर्लक्षच करायच ठरवल डॅफोडिल्सच्या फुलांनी लक्ष वेधून घेतल उगाच नाही वर्डस्वर्थला डॅफोडिल्स पाहून कविता सुचली ! तर असा हा हाईड पार्क जुना तरीज नवचैतन्याचा-मनाला हिरवकच करणारा तिथल्या बोटिंग, पोहणे, पक्षी संग्रहालय अशा इतरही गोष्टी प्रेक्षणीय.

—००—

# लंडनचा हाईड पार्क

हाईड पार्क या नावानेच भुयारी रेल्वेचे स्टेशन आहे. याच हाईड पार्कमधून तीन रस्ते जातात त्यातला पहिला हाईड पार्क कॉर्नरला तर दुसरा मार्बल आर्च ला आणि तिसरा रस्ता जातो थेट लँकेस्टर गेट या ठिकाणी. हाईड पार्कच्या पश्चिमेकडे केन्सींग्टन गार्डनही आहे आणि हा भाग म्हणजे लंडनमधील सर्वात मोठी मोकळी असलेली जागा आहे अशी मोकळी जागा आज लंडनमध्ये सापडणेही कठीण झाले आहे कारण झपाट्याने सर्वत्र वस्ती व उद्योगधंदे वाढीला लागले आहेत म्हणूनच लंडन मध्ये एवढी मोकळी जागा पाहून नवल वाटले हा हाईड पार्क पूर्व पश्चिम साधारणपणे दोन किलोमिटर लांब पसरला असून उत्तर दक्षिण अर्धा मैल आहे. पूर्वी हा हाईड पार्क वेस्ट मिनिस्टर ॲबेच्या मालकीचा होता व त्याच्या ताब्यात होता. नंतर १५३६ साली आठव्या हेन्रीने तो आपल्या ताब्यात घेतला आणि त्यामुळे या पार्कचे स्वरूपच बदलले राजेशाही असे या हाईड पार्कचे स्वरूप झाले पण प्रत्यक्षात लोकाकरिता हाईड पार्क चार्लस पहिला यानेच खुला करून दिला आणि म्हणूनच तेव्हापासून हाईड पार्क सगळ्याकरिता खुला झाला आहे १९७३ साली राणी कॅरोलीन (दुसऱ्या जॉर्ज राजाची पत्नी) हिने या पार्कमधे एक मोठा खास तलाव बांधून घेतला त्यामुळे नौकाविहार पोहणे, बोटींतून फिरणे,

पशुपक्षी पाहात पिकनिक करणे हे शक्य झाले इथेच हाईड पार्कमधे एक पक्षीसंग्रहालय आहे ते उत्तरेच्या बाजुला तयार करण्यात आले आहे. डब्ल्यु. एच् हडसन या लेखकाच्या ग्रीन मॅन्शन या कादबरीतील नायिका 'रिमा' (एक पक्षीण) हिची प्रतिकृतीही या बगिच्यात वसवली आहे दक्षिणेकडे या हाईडपार्कमधे एक विश्रातीगृह हॉटेल वगैरेची सोय असल्याने येणाऱ्या प्रवासी मडळींना हाईड पार्क म्हणजे पिकनिक करण्याजोगे एक प्रेक्षणीय ठिकाण वाटण्यास नवल नाही तसेच आघोळी करणे, पोहणे याची सोयही व्यवस्थित आढळली त्यामुळे प्रवासी क्वचित येथे आवश्यकतेनुसार मुक्कामही करु शकतात

या हाईड पार्कला आत येण्याकरिता मुख्य दरवाजा जो आहे ती एक कमान आहे. ही ट्रीपल आर्च (कमान) १८२८ साली डेसिमस बर्टन याने बांधून घेतली. या मार्बलट्रीपल आर्चमुळे हाईड पार्कची शोभा अधिकच वाढली आहे याच्या मुख्य दरवाजाजवळच ड्युक ऑफ वेलिग्टनच्या सन्मानार्थ आर्चिलिसचा पुतळाही या ठिकाणी उभा आहे रोममधील पुतळ्याप्रमाणे या पुतळ्याचे काम करुन घेण्यात आले आहे ते वैशिष्ट्यपूर्ण आहे तिथे जवळच बँडवादनाची सोय आहे दर रविवारी उन्हाळ्यात तिथे बँडवादन चालु असते त्यामुळेकरमणुकीत भर पडते हाईड पार्क कॉर्नरमधून तीन ठिकाणि रस्ते फूटलेले दिसतात त्यात डावीकडे कॅरेज रोड आहे. हा आलबर्ट मेमोरिअल हॉलकडे निघतो. लता मगेशकर आपल्या भारताच्या स्वरसम्राज्ञी याचा कार्यक्रम याच प्रसिध्द आलबर्ट मेमोरिअल हॉलमधे मध्यतरी झाला होता उजवीकडील कॅरेज रोड मार्बल आर्चकडे निघतो-आणि तिसरा मधला रस्ता घोडदौड व इतर कामकाजाकरिता वापरला जातो

हाईड पार्क कॉर्नर या नावाचे भुयारी रेल्वेचे स्टेशन आहे. याच हाईड पार्क कॉर्नर मध्ये ड्युक ऑफ वेलिंग्टनच्या नावाची कमान दिसते. त्याने मिळविलेल्या विजयाचे सन्मानार्थ (वॉटर्लु येथील लढाईतला ड्युक ऑफ वेलिंग्टनला मिळालेला विजय) ही कमान शाततेचे प्रतीक म्हणून सन्मानार्थ बाधलेली आहे. ड्युकच्या वसतीस्थानासमोर त्याचा ब्रॉन्झचा पुतळा उभा आहे. इग्लंडच्या मुक्कामातली स्मारक पुतळे, पार्क पाहण्याची

सुरूवात इथूनच झाली. म्हणून आम्हाला ड्युकच्या या प्रथमच पाहिलेल्या स्मारकाचे, पुतळ्याचे, कमानीचे आणि म्हणूनच हाईड पार्कचे विशेष कौतुक वाटले ही अर्थात सुरुवात होती. पुढच्या प्रवासात बहुतेक ठिकाणी हा प्रकार आवर्जून दिसला पराक्रमाचे कौतुक, गुणग्राहकता आणि स्मारकाची निगा, स्वच्छता ही देखिल कौतुकास्पद. हाईड पार्कमध्ये आणखी दोन स्मारके आहेत रॉयल आर्टिलरीचे व मशीनगन कॉर्पचे

—००—

# मॅडम ट्युसाडच्या वॅक्स म्युझियम

लडनला आल्यानतर वॅक्स म्युझियम पाहिला नाही असे होणारच नाही मॅडम टचूसाड यानी तयार केलेली—मेणातून मनात पोचणारी ही कला पाहून मन थक्क होतं मॅडम टचुसाडच्या मेणातून तयार केलेल्या कलाकृती अगदी अस्सल नैसर्गिक व खऱ्याखुऱ्या वाटतात म्हणजेच हे मेणाचे पुतळे नसून ही खरोखरीचीच माणसे आहेत व आता क्षणार्धात बोलायला लागतील की काय असे पाहताच वाटायला लागते इतकी ही सगळी मडळी (मेणातील) व हे मेणाचे देखावे हुबेहूब साधले आहेत अवश्य पाहिलाच पाहिजे असा हा म्युझियम आहे लडनला येण्याआधीच या मेणाच्या कलाकृतींबद्दल बरीच ख्याती ऐकलीच होती तेव्हा मॅडम टचुसाड या बाईंनी मेणातून तयार केलेल्या कलाकृती मुद्दाम पहायला जाण्याचे ठरवले. टचूसाडच्या या प्रसिद्ध मेणाच्या पुतळ्याचे प्रदर्शन सर्वात आधी पॅरिस येथे भरले होते हा काळ म्हणजे १७७० चा तिथे अतिशयच लोकप्रीय ठरले त्यानतर त्याची ख्याती ऐकून पॅरिसहून हे प्रदर्शन १८०२ मध्ये लडन येथे आणण्यात आले आणि सध्या ज्या रस्त्यावर (मेरीलबोन स्ट्रीट) ते म्युझियमच्या रुपात आहे त्या ठिकाणी ते प्रदर्शन इ. सन. १८३५ पासून ठेवलेले आहे आजही भुयारी रेल्वेने बेकर स्ट्रीट स्टेशनवर उतरल्यास हा म्युझियम पाहणे सोईचे ठरते. खूपच पाहण्याजोगे आहे व

अतिशय काळजीपूर्वक, मेहनतीने, कलापुर्ण तऱ्हेने हे पुतळे या टचुसाड बाईनी तयार केलेले असल्याने ते पहायला सदोदीत गर्दी असते. सकाळी (१०–३० ते सध्याकाळी ५–३०) सध्याकाळी हे प्रदर्शन पहायला म्युझिअम उघडला जातो दि २५ डिसेंबरला ते बंद ठेवतात जुलै व ऑगस्ट महिन्यात सकाळी १० ते सध्याकाळी ६ वाजेपर्यंत खुले असते. (या वेळा तिकडच्या घड्याळाप्रमाणे) तिकिट लावून प्रदर्शन आहे तरीही प्रवाशाची सतत रीघ लागलेली असते या म्युझियममधे जगप्रसिद्ध व्यक्ती व प्रसिद्धीच्या झोतात नसलेल्याही काही व्यक्तीचे पुतळे हुबेहूब केलेले आहेत इतिहासात–राजकारणात होऊन गेलेल्या पूर्वीच्या व सध्याच्या चालु काळातल्याही अनेक प्रसिद्ध व्यक्ती आपल्यासमोर उभ्या आहेत या दृष्याने दबल्यासारखे वाटते इ स १९७९ सालापासून या मेणाच्या म्युझियममधे आणखी एका महत्वाच्या दृष्यदेखाव्याची भर पडली आहे तो देखावा आहे 'चेंबर ऑफ हॉररर्स' या नावाने, या दृष्यात खरोखरीची लढाई चाललेली–त्यावेळचे आवाज व सर्वच भयानक भीतादायक परिणाम करणारे आहे तो तुरुग, त्या शिक्षा,ते किंचाळणे तो स्फोट, त्या किंकाळ्या आणि ते भयानक भेसूर आवाज पाहून ऐकूनच मनाला भीती वाटते व अगावर काटा उभा राहतो या नव्या दृष्याने तर म्युझियमची गर्दी आणखीनच वाढवली असून लढाईचे त्या काळाचे त्या वेषभूषेचे शस्त्रास्त्राचे अगदी वास्तवदर्शन घडवले आहे. चेंबर ऑफ हॉररर्स हे पाहण्याजोगे आहे या मेणाच्या पुतळ्यात आठवा हेन्री हा राजा व त्याच्या सहा बायका याचे पुतळे आहेत.तसेच सध्याची इग्लंडची राणी एलिझाबेथ हिचाही पुतळा केलेला आहे. या राणीने पुतळा तयार करण्याकरिता आपण होऊन बसण्याची इच्छा (Model sitting) दर्शविली तिला या कलाकौशल्यात रस आहे. मेणाच्या पुतळ्यांचे काम करणाऱ्या म्युझियमच्या कलाकाराना राणीने खास सहकार्य देऊन पुतळा करवून घेतला तसेच राजघराण्यातील सर्व महत्वाच्या व्यक्तींचे पुतळे आहेत व सर्व महत्वाच्या प्रसगाचे देखावेही या वॅक्स म्युझियममधे आहेत फ्रेंच राज्यक्रांतीचा देखावा, त्यातील धारातीर्थी पडलेल्या महत्वाच्या व्यक्ती तसेच विसाव्या शतकातील महत्वाचे राजकीय नेते पुढारी–चर्चिल, राष्ट्रपिता महात्मा गांधी-व अलिकडील इग्लडच्या पतप्रधान मार्गरेट थॅचर या सगळ्या नेते मडळीचे

मेणाचे हुबेहूब तयार केलेले पुतळे आहेत. शिवाय दूरदर्शनवरील महत्वाचे कलावंत कुप्रसिद्ध खुनी, गुन्हेगार याचा समावेशही इथे आहे.

त्यानतर मॅडम टचुसाडचा वॅक्स म्युझियम पाहायला-गेलो.मेणावरची ही कलाकुसर पाहून कलेची कमाल वाटली या म्युझियममधे वेगवेगळ्या देशाच्या पुढाऱ्याचे पुतळे किती हुबेहुब बनविलेले आहेत जगप्रसिध्द ट्रॅफलगारच्या लढाईचे मेणात तयार केलेले दृश्य पाहून तर आश्चर्याने थक्क व्हायला झाल. लढाई प्रत्यक्ष चालली आहे अस वाटायला लावणारे ते आवाज-भीती वाटावी असा तिथला 'चेंबर ऑफ हॉरर' या सग-ळ्यातून लढाईच वातावरण, यशस्वी तऱ्हेन निर्माण केल होत आणि हे सगळ साध्या मेणातून, लढाईनतरचे फाशीचे दृष्य पाहून तर भीतीच वाटली इग्लडच्या राणीच्या परिवारातील पुतळे, प्रिन्स चार्लस व लेडी डायना याच्या विवाह समारंभाचे दृष्य, राणी एलिझाबेथ,विन्स्टन चर्चिल भारताच्या दिवगत पतप्रधान इदिरा गाधी, यशवतराव चव्हाण, बॅरिस्टर जीना, पंतप्रधान नेहरु यासारखे मेणाने बनविलेले अनेक पुतळे पाहून कलेच्या कौतुकाला खरच शब्द अपुरे पडले अलिकडेच थॅचरबाई-चाही पुतळा बनविला आहे

केन्सीगटनला सकाळी सकाळीच रस्त्यावरील बर्फ झटकून टाकणाऱ्या सफाई कामगाराना पाहून गमत वाटली तशातच भुरभूरणारा पाऊस अधूनमधून चाललेला बारिक बारिक बर्फाचे तुषारकण अगावर झेलीत आम्ही पायीच निघालो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८७
३५२१९
३०।१२।९८

# 'विंडसर कॅसल'

विंडसरचा किल्ला पाहण्याकरिता ब्रिटिश रेल्वेस्टेशन विंडसरला जावे लागते लंडनपासून पश्चिमेकडे अंदाजे पस्तीस किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. विंडसरला जाताना प्रथम लागतात ती १७ व्या १८ शतकातली जुन्या पद्धतीची लाकडाची घरे — अरुंद गल्ल्या आणि मातीचे रस्ते थेम्स नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर वसलेले विंडसर हे गाव लंडनच्या पश्चिमेला आहे आणि या विंडसर किल्ल्यामुळे या गावालाही महत्व आले आहे. थेम्स नदीच्या किनाऱ्यावर असलेला हा किल्ला ९०० वर्षे झालेला जुना पण सर्वात मोठा व भक्कम किल्ला आहे. इंग्लंडला आल्यावर पहिला किल्ला आम्ही पाहिला तो हा विंडसर किल्ला. म्हणूनच तो विशेषच ऐतिहासिक काळात घेऊन गेला. पण नंतरच्या आमच्या प्रवासात ठिकठिकाणी असे जुने पण भक्कम किल्ले बरेच आहेत. व ते सगळे पाहण्याजोगे असून त्याची निगाही व्यवस्थित ठेवलेली आहे— (मला आपला उगाचच आमच्या नागपूरचा भोसल्याचा किल्ला आठवला व वाढलेल्या गवताच्या भासाने मी पाय झटकला पण तो हवेतच. कारण इथे सगळे स्वच्छ टापटिपीचे काम होते) विंडसरचे राजघराणे उन्हाळ्यात इथे मुक्कामाला असे. आज जगातील सर्वात जुना असा हा किल्ला आहे अशी याची ख्याती आहे. जेव्हा राणी (सध्याची) विंडसरला मुक्कामाला असते तेव्हा तमाम जनतेला किल्लाचे दर्शन अर्थातच दुर्लभ ठरते— पण या किल्लाला जवळचे जोडून असलेला इतर सर्व भाग जसा उत्तरेकडील गच्चीचा भाग, राऊंड टॉवर, खालच्या मजल्यावरील भाग, सेंट जार्ज चॅपेल, आलबर्ट मेमोरिअल चॅपेल—पूर्वेकडील गच्चीचा भाग — करफ्यू टॉवर हे सगळे भाग प्रवाशाकरिता व तमाम लोकांकरिता वर्षभर खुलेच असतात. एकुण २६ भाग या किल्ल्यात आहेत. जे प्रेक्षणीय आहेत वुईल्यम या विजयी योध्याने १०७८ त प्रथम लाकडाचा किल्ला बांधला — त्याचवेळी टॉवर ऑफ लंडनचे बांधकाम झाले. पण आज या

लाकडी किल्ल्याचे काहीच अवशेष शिल्लक नाहीत कारण नतर पहिल्या हेन्रीचे प्रथम दगडी किल्ल्याचे बाधकाम करवून घेतले. हे इ. स. १११० मध्ये झाले नतर दुसऱ्या हेन्रीने हा किल्ला त्याला काही गच्चीवजा दालने काढून अधिक वाढविला व मजबूत दगडाने बाधूनही घेतला या गच्च्या चौकोन चौकोन अशा आकाराच्या आहेत – 'राऊड टॉवर' हा भाग तिसऱ्या एडवर्डने नतर त्याच्या कारकिर्दीत बाधून घेतला व उत्तरेकडील गच्चीवजा दालन हे पहिल्या एलिझाबेथ राणीच्या काळात तिने करवून घेतले अशी वाढ होत होत किल्ला अवाढव्य वाढतच २६ दालनाइतका मोठा दिसतो–व प्रत्येकाने आपल्या कारकिर्दीत त्याची मजबुतीही वाढवल्याने भक्कमही दिसतो पुढे राजघराण्यातल्या लोकाच्या राहण्याच्या दृष्टीनेही या विडसर किल्ल्यात सोयी व मजबुती दोन्ही गोष्टी करण्यात आल्या पण तरीही आजतागायत राजे मडळी फार क्वचीतच तिथे मुक्कामास राहिली हे खरे आहे. विडसर किल्याचा अगदी प्रवेश द्वाराला आठव्या हेन्रीने त्याचा टयुडर पद्धतीचा पुतळा प्रवेश द्वारापाशीच करवून घेतलेला आढळतो सॅलिस्बरी टॉवर, गारर्टर टॉवर व करफ्यू टॉवर या तीन टॉवरने किल्ल्याचे सरक्षण हे केले जाते, जाडजूड व मजबूत भक्कम भिती हे करफ्यू टॉवरचे वैशिष्टय आढळते हा किल्ला – त्याचा भक्कम दगड, व जाडजूड भिती पाहताना आपोआपच तोंड वासले जाते–इतका तो मजबूत दिसतो किल्ला ही आजवरची मनातली कल्पना इथे प्रत्यक्षात पाहायला आम्हाला मिळाली- काय बिशाद आहे आहे शत्रु मारा करील? इतका हा किल्ला भक्कम भितीचा आहे गेटवेपासून सरळ घोडयाची पागा आहे सेंट जॉर्ज चॅपलचे बाधकाम वैशिष्टयपूर्ण वाटते पश्चिमेकडे एक अवाढव्य खिडकी बाधलेली आहे तिला १६ व्या शतकातला मजबुत काच वापरला आहे किल्ल्याच्या आतील फर्निचर त्या काळाची आठवण करून देणारे ओक झाडापासूनच्या लाकडाचे बनविलेले आहे तत्कालीन राजाचे, लढाईचे असे अनेक देखावे या ठिकाणी भितीवर ओक लाकडात कोरलेले लावलेले आहेत त्यात ८ व्या हेन्रीचा (राजाचा) पुतळा (लाकडी) आहे तसेच आठव्या हेन्रीचे थडगेही कोरीव लाकडाच्या कामानि सजविलेले आढळले. लढाईत पराक्रम केलेल्या तत्कालीन शूर योद्धयाची थडगी सन्मानाने आलबर्ट चॅपेलमध्ये ठेवलेली आहेत. तर

काही राजघराण्यातील मंडळीची थडगी रॉयल टॉवरमध्ये ठेवलेली आहेत. व्हिक्टोरिया राणीनें तिच्या कारकिर्दीत काही आणखी बदल या किल्ल्यातल्या दालनात करवून घेतले, त्यात प्रिन्स आलबर्टचा पुतळा हा व्हिक्टोरिया राणीने करवून घेतल्याचे कळते एकुण २६ वेगवेगळे भाग दर्शनी प्रेक्षणीय चॅपेल पाहण्याजोगे आहेत प्रत्येक भागाला काही राजकीय संदर्भ आहेच व तसाच तो ऐतिहासिकही आहे म्हणूनच त्या त्या भागाचे महत्व आढळते उत्तरेकडील किल्ल्याची की टेरेस (गच्ची) आहे तिथून थेम्स नदीचा सुंदर देखावा दिसतो राजे मंडळी जेव्हा मुक्कामाला किल्ल्यात नसतात तेव्हा ही सगळी दालने व संपूर्ण किल्ला प्रवाशांना दाखविला जातो मुख्य आकर्षण म्हणजे राणीचे बाहुली घर, राजेशाही जिने, कारागिरीचे उत्कृष्ट नमुने – राजेमंडळीचे शयनमंदीर जेवणघर राजेमंडळीचे हरतऱ्हेचे भव्य फोटो – ते प्रसंग सर्व, त्या काळात घेऊन जाते. तिथूनच पुढे ५–५॥ मैलाचा विंडसर पार्क पसरलेले आहे सकाळ मोठी प्रसन्न वाटत होती इंग्लीश माणस अशा पावसातही कसलाही गोंधळ, धावपळ न करता शिस्तबद्ध उत्साहात झपाझप चालत होती. इंग्लंडमध्ये गेल्यानंतर खरच काय पाहू काय नको असं झालं कारण एकतर इतकं पद्धतशीर, स्वच्छ, नियमित असं सगळं नाविण्यपूर्ण आम्ही प्रथमच पाहात होतो मगमग त्याची सवयच झाली म्हणा पण एकूण इंग्लीश साहेबाच सगळच काम रुबाबात एकप्रकारच्या खानदानी ऐटीत भावना व्यक्त करायला, त्याच कौतुक करत बसायला त्यांना फारसा वेळच नाही पण तरीही रस्त्यात त्या शिस्तबद्ध काटेकोर रहदारीतही क्वचित थकलेल्या एखाद्या म्हाताऱ्याच्या आजीच्या डोळ्यात भावनेची भूक दिसली भावनांची मायेची भीक मागणारी आर्जवी थकलेली म्हातारी इंग्लीश स्त्री पाहून मन हेलावलं जगरहाटीच्या शर्यतीत सगळीजण पळत होती कुणालाही थांबायला वेळ नाही. आयुष्य तर आता उतरणीला लागलय. अशा जीवनाच्या संध्याकाळी प्रेमाची मायेची ऊब जणु ती थकलेली नजर मागत होती इंग्लीश माणूस झाला तरी शेवटी तोही एक माणूसच आहे. यंत्र नव्हे. त्यालाही म्हातारवयात भावनांची भूक, मायेची भूक लागते तर.

—००—

# लंडनजवळचा सफारी पार्क

विंडसरसारखा हा जगातला सर्वात जुना मोठा व भक्कम किल्ला पाहिल्यावर आम्ही लंडनजवळचा 'सफारी पार्क' पाहायला गेलो. तसं इंग्लंड, अमेरिका एकूण पाश्चात्य देशात सगळीकडे काही काही गोष्टी सारख्याच आहेत दोन्ही देशात (इंग्लंड,अमेरिका) सफारी पार्कस, आर्ट गॅलरी, मॉन्युमेंटस, किल्ले, स्मारक, कॅथेड्रल्स, चर्चेस वगैरे. अर्थात इंग्लंडमध्ये कॅथेड्रल्सची संख्या अधिक आढळते अमेरिकेत ब्रिजेस, स्मारक अधिक आढळतात सफारी पार्क झु, बोटॅनिकलगार्डन, झुलॉजीकलगार्डन-प्लॅनिटोरिअम, डॉलफीन शो सगळीकडेच आहे. अमेरिकेत हे सगळं अर्थात भव्य प्रमाणावर आढळलं इतकच या सफारीपार्क (लंडन-जवळचा) मध्ये केवळ पाचदहा फूट अंतरावर दहाबारा वाघ (जिवंतखरे) मोठमोठे, (अगदी मवाळ होऊन, तरीही प्रवाशाकडे पाहून विचारात असल्यासारखे) एकत्र बसून विश्रांती घेत होते ते पूर्णपणे मोकळे होते. प्रवाशाकडे (सभ्यपणाने) बघितलं न बघितलं असं करीत होते. कारण ओळखीशिवाय, ओळख करून दिल्याशिवाय फारसं बघायचं नाही. बोलायचं तर नाहीच नाही ही गोऱ्या साहेबाची शिस्त, शिकवण त्यानीही लावून घेतलेली दिसली कांगारू, उंट, जिराफ, सिंह, तसेच मोठमोठे गोरिला सगळेच मुक्तसंचार करीत गुण्यगोविंदाने वावरत होते. आम्ही सर्वच प्रवासी मोटरच्या काचा बंद करून गाडीतून फिरतफिरत त्यांना न्याहाळत होतो ते मोकळे होते. आम्हीच गाडीच्या पिंजऱ्यात अडकलो होतो इथेही पार्कमध्ये सर्वत्र स्वच्छता ठेवलेली दिसली सुंदर हिरवळ, मोकळं रान, राखीव होतं. मला आपली तरीही उगाचच आमची नागपूरची 'महाराज बाग' आठवली आणि अगदी नकळत, मी आठवण येताच नाकाला रुमाल लावला

—००—

# डॉलफिन शो

मग पहिला लंडनचा प्रसिद्ध 'डॉलफिन शो' डॉलफिन हा अवजड मासा आजवर चित्रात पाहिलेला-पण त्याचा तो अजस्त्र देह हरतऱ्हेचे कलात्मक खेळ करततो–शिकवलेल ऐकतो–हे पाहून गमत वाटली. डॉलफिन शो चागला तीन चार तास चालतो. तिकिट काढली आणि शो पाहायला बसलो डॉलफिनच्या भव्य अजस्त्र देहाच्या जोडचा त्यातही नर मादी– मग त्याची पाण्यातली लपाछपी ते एकमेकावर पाणी उडवणं– पाठलाग करण– प्रेमानं एकमेकाच्या अजस्त्र कुशीत निमुटपणे क्षणभर विसावण– हे सगळ मद मधूर सगीताच्या पार्श्वभूमीवर सतत चालुच शो पहायला बरीच गर्दी–विशेषत लहान मुल तर आनदान टाळ्या पिटीत होती हे डॉलफीन तालासुरावर नाचतात–मुके घेतात टागलेला फुगा फोडतात उंचावरुन खाली उडी घेतात आणि पहायला आलेल्या प्रवाशाच्या अगावरही मनसोक्त पाणी उडवतात- डॉलफिन शो पहाताना लहानाप्रमाणं मोठीही रगली इग्लडप्रमाणे अमेरिकेतही सर्वत्र हा डॉलफिन शो चालतो. मुक्या प्राण्यावर ही पाश्चात्य देशातली माणस मनसोक्त प्रेम करतात– त्याना खेळवतात आणि स्वत ही खेळतात डॉलफीनच्या अवाढव्य देहातला लवचिकपणा पाहून आश्चर्य वाटतं अनेकप्रकारचे खेळ, कसरती, रोमान्स सर्व प्रकार या डॉलफीनच्या जोडयानी करुन दाखवले-वाहवा मिळवली.

# लंडनची भुयारी रेल्वे

लडनमधील भुयारी रेल्वे ही जगातील सर्वात जुनी रेल्वे आहे लडनमधील हा भुयारी रल्व पाहायची फार उत्सुकता होती. इग्लड, अमेरिका, युरोप सर्वत्र हा भुयारी (underground) रेल्वेचा प्रकार आहे. फक्त त्याला वेगवेगळी नाव आहेत. जमिनीखाली व्यवस्थित पसरलेल रेल्वे गाडयाच, हे जाळ मजेदार वाटत इग्लडमध्ये त्याला टयुब म्हणतात तर कुठे लूप म्हणतात. फ्रान्समध्ये मेट्रो म्हणतात टनेलही म्हणतात प्रकार तोच. या भुयारी रेल्वेतला प्रवास अत्यत आल्हाददायक वाटतो. स्टेशन आल की गाडीचे (आगगाडी) दरवाजे आपोआप उघडतात-नतर क्षणार्धात आपोआप मिटतात गार्डने बटन दाबताच सर्व दरवाजे एकाच वेळी बद होतात. तेवढया त्या मधल्या वेळात सगळयानी चढायच-गाडीची शिट्टी नाही हिरवे लाल कदील, निषाण, धक्काबुक्की आरडा-ओरडा ढकलण काही नाही गाडी आली आणि निघाली हे कळतही नाही. खडखड धडधड कानठळ्या बसवणार काहीच नाही सगळ दरवाजे लागल्याशिवाय गाडी सुरुच होत नाही पुन्हा स्वच्छता तर विचारूच नका- मला मात्र मुबईच्या लोकल मधली गर्दी- माणसाचा लोंढा आठवला- आणि गुदमरायला झाल- यत्रापासून सुख घ्यायच तेही मन-सोक्त हे मात्र साहेबापासूनच शिकायला हव तर अशी ही इथली भुयारी रेल्वे ही एक सागायचच राहिलं- इथे इग्लडमध्ये रस्त्यावरही मोटारने हॉर्न वाजायचा नाही. तो गुन्हा समजला जातो. हॉर्न वाजवा-यची गरजही पडत नाही सार शिस्तित पद्धतशीरपणे वर्षानुवर्ष चाललं आहे हॉर्न वाजवायचा नाही अशी ताकिदच आहे म्हणे दोन तीन पट्ट्यांवरुन एकाच वेळी असख्य मोटारी अतिशय वेगाने पळत असतात पण जराही हॉर्नचा आवाज नाही. इथले रस्ते फक्त मोटारीसाठी असतात. माणस व्यवस्थितपणे फुटपाथवरुनच चालतात त्यामुळे मोटरीच्या अधेमधे

माणूस सहसा येतच नाही. क्वचित एखाद्याने हॉर्न वाजवलाच तर तो लक्षवेधी ठरतोच पण ती चूकही समजली जाते गाडी चालवताना सीट-वरच्या चालकाने गळ्यातून हाताला पट्टा अडकवलाच पाहिजे असाही नियम आढळला. एकूण काय सगळ शिस्तित व्यवस्थित चालाव हा यामागील हेतू आणि सगळेजण तो नियम इथे पाळतातही

भूयारी रेल्वेच्या जाळयातून तुम्ही विनाश्रम इलेक्ट्रिकच्या जिन्याने वरखाली करता त्याला एक्सकेलेटर म्हणतात हे सरकते जिने पाहून भीती वाटली- आणि शिवाय आपण आपला मगदूर पाहिल्याप्रमाणे आपली पायरी ओळखून चटकन त्या सरकणाऱ्या जिन्याच्या पायरीवर हुषारीने उडी मारायची- धास्तावून उभ राहायच- वरवर अलगद पोचा-यच सुरुवातीला पायरी चुकते–पडायला होत–हात धरला तर पाय सुटतो–चुकतो पाय बरोबर ठेवला तर हात लावबताना गोंधळ होतो व तोल जाऊन पडायलाही होत–भीतीनें चेहऱ्यावर गोंधळ दिसतो–तो दाखबायचीही चोरी वाटते–बाळबटपणा दिसू नये म्हणून आपणही प्रयत्न करतो कधी साधत–तर कधी फिसकटत- तर असे इलेक्ट्रीकचे सरकते जिने, इग्लड, अमेरिका सर्वत्र आहेत- रेल्वेत- मोठमोठ्या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये आहेत तर अनेक मजली इमारतीतही, हॉटेल्समध्येही आहेत. पुढेपुढे त्याचीही सवय या प्रवासात झाली एक मात्र खर- श्रम वाचतात म्हाताऱ्या माणसाना सोईच वाटत- इग्लीश स्त्रिया तर हातात सामान-कडेवर लहान मुल घेऊनही सरकणाऱ्या जिन्यावर अचूक पाय ठेवायच्या त्याच्या त्या अचूक निदानाच कौतुक वाटल-इग्लडमध्ये मोठमोठी डिपार्ट-मेंटल स्टोअर्स मी प्रथमच पाहात होते तिथली सजावटीची पद्धत, अदबीची भाषा, गिऱ्हाईकाना वस्तुविषयी, निवडी विषयी मार्गदर्शन करण्याची तत्परता पाहून समाधान वाटल पाच मजली स्टोअरमध्ये लहान मुलाच्या कपड्यापासून तरुण म्हाताऱ्या सर्व वयाच्या माणसा-करिता एकेक मजला ठेवलेला.

—००—

# स्मरणीय अनुभव

एक गंमत सागते. मी एका गरम कपड्याच्या स्टोअरमधे गेले व तिथे माझ्याकरिता गरम स्वेटर काढायला सागितला माझ्याकडे पाहूनही (मी दोन मुलाची आई, चाळीशी पार केलेली) तिने गळ्याभोवती रिबनचा बो बाधता येईलसा एक छान स्वेटर काढला मी नाक मुरडल आणि म्हटल-छे-मला नाही हे शोभणार, माझ्या वयाच्या बाईला शोभेलस दाखवा-हे मी इग्रजीतून तिला सागताच तिने रागानच मला दटावल-'Age ? what are you talking of age ? you are not old don't say it again सदाउत्साही सदा चिरतरुण राहणाऱ्या त्या म्हाताऱ्या इग्लीश विक्रेतीला मी स्वत ला वयस्क समजते ही कल्पनाच सहन झाली नाही-तर अशी इथली मडळी उत्साही, म्हातारपणातही तरुण मनान जगणारी-वावरणारी.

बसमधे एका खूप म्हाताऱ्या बाईला मी उठून माझी जागा दिली तर तिने कृतज्ञतेने कौतुकान पाहिल आणि माझी हिंदुस्थानी पध्दतीची साडी पाहून व सस्कारीत वागण पाहुन हळुवारपणे माझ्या पाठीवर थोपटल तो स्पर्श मी विसरणार नाही असे काही प्रसग इथे स्पर्शून गेले मनाला इथल्या दुमजली बसेसही मोठ्या छान वाटल्या आपोआप दारं उघडतात वर चढायच समोरच ड्रायव्हरच्या सीटजवळच्या यत्रात अचूक नाणी हिशोबान टाकायची यत्रातून पटक्न तिकिट खाली पडत ते घेऊन सीटवर बसायच-सुखान प्रवास करायचा क्षणभर मी बसमधे डोळे मिटले आणि आठवली आमची नागपूरची बस-खडखडाट करीत रस्त्यावरचे आणि बसमधले धक्के गड्डे चुकवीत-बस् काय तुमच्या बापाची आहे ? 'खाली उतरा'-वगैरे बसमधले सवादही कानावर आदळले आणि मी पटकन डोळे उघडले. छे माझी लडनमधली बस कशी अलगद् हळूवार चालली होती-मी लडनमधे होते-नागपुरात नव्हे आणि हो-आपल उतरायचं ठिकाण आल की आपणच आपल्या सीटजवळ असलेली घटा वाजवायची

की बस थावते-'अहो कडक्टर'-थावबा हो बस-आम्हाला उतरायचय-मग आधी बोलायला काय झाल होत ?" वगैरे चकार शब्द नाही-सार कस शिस्तबद्ध यत्रापासून सुख घ्याव हे इथल्या माणसानीच हे आपल उगाच जाताजाता आठवल म्हणून सागितल

—००—

# पिकॅडली सर्कस

लडनच्या पिकॅडली सर्कस हा प्रसिध्द चौक, चौक तरी कसा म्हणावा? कारण इथे पाच रस्ते एकत्र मिळतात लडनमधला सगळयात जास्त गजबजलेला, व्यापाराची, खरेदी विक्रीची देवाण घेवाण करणारा गर्दीचा गडबडीचा तरीही उत्साहाने, चैतन्याने फुललेला हा पिकॅडली सर्कस विभाग पाहण्याजोगा आहे पाच महामार्ग या ठिकाणी एकत्र भेटतात. भुयारी रेल्वेच पिकॅडली सर्कस हे स्टेशनच आहे रात्रीच्या मौजमजेकरता इथला परिसर सदा फुललेला पाश्चिमात्याना मनापासून आवडणार सारच पिकॅडलीला आहे दिवसा तसाच रात्रीही हा विभाग अतिशय गर्दीने गजबजलेला असतो. इथे सर्वच उलाढाली सतत चाललेल्या असतात माणस, स्त्रिया पुरुष, मुल तरूण, तरुणी सर्वच मनसोक्तपणे आनंद घेत असतात गर्दीत स्वत ला हरवून बसतात खरेदी करीत असतात.चौकाच्या बरोबर मध्ये शॅफ्टस्‌वरी मॉन्युमेंट (पुतळा) स्मारक आहे शॉफ्टवरीच्या सातव्या अर्ल चे हे स्मारक आहे. हे १८९३ त उभारलं-इथे ब्रॉन्झमधील एक भव्य कारजा आहे-त्याचा आकार कमानीप्रमाणे (आर्च) आहे इकडे त्याला सर्वसाधारणपणे इरॉस असे म्हणतात वास्तविक ख्रिस्ती धर्माची उदारता दाखविण्याचा हेतु या इरॉसमधे अभिप्रेत होता तसेच पिकॅडली हे लडनमधील प्रसिध्द असं फॅशन सेटर-फॅशनचे केंद्र-फॅशन्सचे आगर आहे कारण फॅशनेबल स्त्रीपुरुषानी पिकॅडलीचे रस्ते फुललेले दिसतात १८ व्या शतकातील एका शिंप्याने केलेल्या'रफू' वरुन हे नाव पडलेल आहे असा हा पिकॅडली सर्कस विभाग म्हणजे लंडनमधील सर्वांनाच आकर्षण आहे.

इलकी माणस खरेदी करीत होती पण कसलीही घासघीस नाही भांडण,तंटा नाही-वस्तु हाताळण,पाडण नाही ओरडाआरडाही नाही शॉपिंगच एक सुख, समाधान तिथे दिसत होत खरेदीने नेहमीच भूक लागते तेव्हा खाण्यापिण्या-चीही इथे चांगलीच चंगळ दिसली.गमत म्हणजे इथल्या हॉटेलात सगळं आपणच करायच आपणच आपल्याला हव्या असलेल्या पदार्थांचा ट्रे भरून, उचलून आणायचा (self service) दुकानातही आधी यत्रात पैसे टाका-यचे मग ते यत्र तुम्ही ज्या वस्तुकरिता (बाणाने दर्शविलेल्या) पैसे टाकले ते गरम वा थंड (चहा, कॉफी, ज्यूस, आइस्क्रीम,पेपसी),तुम्हाला तात्काळ पुरवत सगळच कस सोईस्कर आणि नाविन्यपूर्ण वाटल आम्हाला यत्र कस बिचार माणसापेक्षाही इमानदारपणे काम करत फक्त त्याच्या पोटाला व्यवस्थित (पैसे, नाणी) वेळच्यावेळी घाला म्हणजे झाल. पिकॅ-डली चौकात असे अनेक नाविन्यपूर्ण प्रकार पाहिले. सुरुवातीला हॉटे-लमधे गेल्यावर आम्ही इथल्या सवयीनुसार ऐटीत बसून राहिलो. पण कुणीच विचारपूस करेना लोक टकमका पाहात होते मात्र म्हटल काय गरम आहे विचाराव-बोट घालून बरबटलेले पाण्याचे ग्लास आणून टेब-लावर फडक मारून ग्लास आदळणार कुणी कळकट पोरगही दिसेना. इथे-भूक तर लागलेली मग लक्षात आल इथे आपला हात जगन्नाथ आहे. उठायच ट्रे घ्यायचा टेबल पकडायच-आणि आम्ही उठलो

—००—

# बिग बेन

पिकॅडली सर्कस नंतर लंडनमधील प्रसिद्ध बिगबेन आम्ही पाहिलं. हा पार्लमेंट हाऊसच्या उत्तरबाजुला असलेला एक उच टॉवर आहे व त्या टॉवरवर एक मोठे घड्याळ बसविलेले आहे. यालाच 'बिगबेन' हें नाव आहे. टॉवर ब्रीज व ट्रॅफलगार स्क्वेअरचा तोडीचे महत्व या बिग बेनला आहे. प्रवासी बिगबेन पाहायला मुद्दाम जात असतात. लडनमधील ही फार जुनी गोष्ट आहे - आठवण आहे. आणि म्हणूनच या बिगबेनला महत्व आहे, हा बिगबेनचा टॉवर ३२० फूट उच आहे - वर जायला याला ३३४ पायऱ्या आहेत इतका हा उच टॉवर लक्षवेधी आहे तो त्याच्या उचीने शिवाय वर असलेल्या मोठ्या थोरल्या घड्याळाने- (बिग बेन) या पायऱ्यावर घड्याळाच्यापर्यंत मनोऱ्याकडे नेतात. या घड्याळाचे काटे २३ फूट लाबीचे आहेत. इतके ते मोठे आहे दुरून - मान उच करून प्रत्येकजण त्याकडे मुद्दाम पहात राहतो - असे हे लक्ष वेधून घेणारे उचचउच मोठेच मोठे थोरले घड्याळ. लडनची पुरानी शोभा आहे. आठवण आहे. मिनिट काटा १४ फूट लाबीचा आहे घड्याळाचे जेव्हा ठोके पडतात ती ठोके देणारी घटाच मुळी १३ टन वजनाची आहे या बिगबेनचा आवाज इतका मोठा व इतका नियमीत व ठराविक आहे की तो जगभर सर्वांच्याच परिचयाचा झाला आहे कारण बी बी सी. रेडिओचे टाईम सिग्नल बीन बेन वरून लावले जाते.

# टॉवर ऑफ लंडन

'टॉवर ऑफ लडन' हे लडनमधील प्रमुख आकर्षण आहे. किंबहुना पहिल्या प्रतीचे आकर्षण आहे. लडनला आलेला प्रवासी टॉवर ऑफ लडन ही इग्लडची प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तु पाहिल्याशिवाय राहात नाही. भुयारी रेल्वेच टॉवर हिल हे रेल्वे स्टेशनच आहे. हे पाहण्याला गर्दी असतेच त्यामुळे वेळा ठरलेल्या आहेत. मार्च ते ऑक्टोबरमध्ये सोमवारी व शनिवारी सकाळी ९।। ते सध्याकाळी ५ पर्यंत (ही वेळ तिकडच्या घड्याळाप्रमाणे) रविवारी दुपारी २ ते ५ पर्यंत. नोव्हेंबर ते फेब्रुवारी पर्यंत शनिवारी ९।। ते दुपारी ४ पर्यंत हे सर्वांकरिता पाहण्याला खुले असते १ जानेवारी (New Year) व गुड फ्रायडे २४ ते २६ डिसेंबर (नाताळ) या दिवशी बद असते इथे टॉवर ऑफ लडन पाहण्यासाठी प्रवेश फी (तिकीट) आकारली जाते या टॉवरमध्ये एकूण ३७ गोष्टी पाहण्याजोग्या आहेत जेम्स (पहिला) राज्याच्या कारकिर्दीपर्यंत इथेच राजघराण्याचे निवासस्थान होते त्यानतर युद्धाच्या वेळात याचा तुरुंग म्हणूनही उपयोग केला गेला. १८१० पर्यंत राजघराण्याच्या छापाची नाणी निघेपर्यंत हा उदयोग चालू राहिला. रूडॉल्फ हेस या नावाचा टाकसाळींतला एकजण राजघराण्याशी परिचीत होता – इथल्या ट्रेझर व्हॉल्टमध्ये आजही राजमुकुटाची रत्ने ठेवलेली आहे याच टॉवरमध्ये एक ऑवझरवेटरी (हवामान वर्तविणे) आहे पण सध्या ती अस्तित्वात नाही कारण ग्रीनविच ऑबझरवेटरी आता कार्यरत आहे. त्यामुळे पूर्वीची ऑवझरवेटरी आत्ता ठेवलेली नाही १६७५ सालापासून आज पर्यंत ग्रीनविच ऑवझरवेटरीचे काम चालू आहे. वुईल्यम दि कॉन्करर याने लडनचे सरक्षण करण्याच्या हेतुने हा टॉवर बाधला. हेस्टिंग्जची लढाई झाल्यानतर हि निकड भासली व म्हणूनच त्यानंतर टॉवरचे बाधकाम झाले तसेच या टॉवरमुळे लडनचे – तेथिल रहिवासियाचे सरक्षण तर झालेच आहे पण थेम्स नदीवर येणाऱ्या बोटीवरही पहारा

ठेवणे, अदाज घेणे या गोष्टींना मदतच झाली आहे. मूळ टॉवर १०७८ साली बाधला आणि त्याच्या भोवती १३ टॉवरसंची एक गोलाकार भितच वाधली. हिलाच 'व्हाईट टॉवर' असे नाव आहे १२ व्या व १३ व्या शतकात हा टॉवरचा किल्ला अधिक प्रशस्त करून वाढविला व अधिक मजबूतही करण्यात आला – १९ व्या शतकात तो पुन्हा व्यवस्थीत करून घेतला गेला किल्लेवजा असलेला हा टॉवर ऑफ लडन हे एक ऐतिहासिक आकर्षण व भूषण आहे

या टॉवरचा इतिहास म्हणजेच इग्लडचा इतिहास आहे मोठमोठ्या प्रसिद्ध व्यक्ती या टॉवरमध्ये एकेकाळी बदीवान म्हणून होत्या त्यात दुसरा डेव्हिड (स्कॉटलडचा) जॉन दि गुड ऑफ फ्रान्स, (१३५६ ते ६०) स्कॉटलडचा पहिला राजा किंग जेम्स चार्लस हा आर्लिन्सचा ड्युक, वॉल्टर रॅले, पहिली राणी एलिझाबेथ, ड्युक ऑफ यॉर्क, थॉमस क्रॉम्वेटड, जेन मॉन्मथ- दुसऱ्या महायुध्दात या टॉवर ऑफ लडनने हेराना याठिकाणीच गोळ्या घालून ठार केले - अनेकाना युध्दकैदी म्हणून, हेर म्हणून बदीवान केले त्या दृष्टीने टॉवरचा इतिहास फारच लक्षात घेण्याजोगा आहे. ऐतिहासिक गॅलरी या इथल्या नव्याने उघडलेल्या गॅलरीत (दालन) तो व्यवस्थित दर्शविला आहे जतन केला आहे

लडन टॉवरने बराच मोठा भाग व्यापला आहे आतला भाग व बाहेरचा टॉवरचा भाग म्हणजे अदाजे अठरा एकर जमिनीने विस्तृत व्यापलेला आहे यात काही ऐतिहासिक इमारती (वास्तु) आहेत. बाहेरचा भाग सहा भिंतींनी गोलाकार असा व्यापला आहे त्यात सहा टॉवर आहेत. हे १४ व्या शतकात बाधले गेले आहेत आतला टॉवरचा भाग बाहेरच्या भागापासून १३ टॉवरची एक गोलाकार भित बांधून तिसऱ्या हेन्रीने वेगळा करुन घेतला त्यामुळे आतला भाग व बाहेरचा भाग अशा दोन विभागात लडन टॉवरची विभागणी झाली आहे.

लडन टॉवरचे प्रवेशद्वार दक्षिण पश्चिम कोपऱ्याकडून आहे पूर्वी या भागात लायन टॉवर होता. ज्यात १४ व्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत राजेशाही कारभार चालत होता. प्रवेशद्वारापलिकडेच मिडल टॉवर आहे. इ. स १३०७ मध्ये पहिल्या एडवर्डने हा बाधून घेतला. १९ व्या शतकात पुन्हा याचे नवे स्वरुप बाधले गेले. पूर्वी या टॉवरला

पुलावरुन जाता येत असे-आज तो रस्ता बंद झाला आहे वायवर्ड टॉवर या भागात बंदराच्या दृष्टीने आवश्यक अवजारे व मशीनरी साठवली आहे आतल्या व बाहेरच्या लडन टॉवरला विभागणाऱ्या अरुद भिंतीला बेल टॉवर नाव आहे पहिल्या रिचर्डने हे बाधकाम करवून घेतल. १९ व्या शतकात पुन्हा नव्याने यात बदल करुन घेण्यात आले आहेत. एकदरीत लडन टॉवरमध्ये इतके टॉवर व इतकी दालनं आहेत आणि त्या प्रत्येकामागे अनेक ऐतिहासिक कारणे आहेत त्या त्या वेळची परिस्थिती, त्या त्या वेळच्या राजाची आवड, लहर, गरज अशी अनेक कारणे आहेत होता होता १९ व्या शतकापर्यंत लडन टॉवर बराच विस्तृत झाला असून आज त्यात ३७ दालन (Towers) आहेत यातच प्रिन्सेस एलिझाबेथच्या फिरण्याकरिता उत्तरेकडून बीचकॅम्प टॉवरपर्यंत रस्ता काढलेला आहे त्या काळात युद्धबदी, कैदी याना वेस्टमिनिस्टर मधून थेम्सकडे आणल्यानतर 'ट्रेटर गेट' मधून ते सगळे या टॉवरमध्ये आणले जात

लडन टॉवरमध्ये एक चॅपेलही आहे. तसेच 'ब्लडी टॉवर' या नावाचाही एक टॉवर आहे जिथे अनेक कृष्ण कृत्ये घडली आहेत व ज्यात राजकन्येच्या खुनाचाही समावेश आहे त्यादृष्टीने 'ब्लडी टॉवर' हे नाव या भागाला समर्पकच वाटले 'वेकफिल्ड टॉवर' भागात राजमुकुटातील जडजवाहीर ठेवलेले आहे. १९६८ पर्यंत त्या ठिकाणी हे रत्नभाडार ठेवले होते पण त्यानतर अधिक मजबूत अशी 'जुअेल हाऊस' ही जागा ग्रेट हॉलमध्ये बाधण्यात आली - 'व्हाईट टॉवर' मध्ये सध्या युद्धसामुग्री ठेवलेली आहे. व्हाईट टॉवरला चार मजले आहेत. व १५ फुटी अशा भिंती बाधल्या आहेत. उत्तरेकडील विभागाला असणारा वर जाण्याचा जिना हा नॉर्मन किल्ले बाधणीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. त्या काळाची आठवण करुन देणारे हे काम आहे- तीन मजल्याबर युद्धसामुग्री रचून तयार ठेवलेली असते पहिल्या मजल्याबर शिकारीच्या व खेळाच्या बंदुका.आहेत- यात मध्ययुगापासून १९ व्या शतकापर्यंत सर्व नमुने आहेत दुसऱ्या मजल्यावर युरोपिअन पद्धतीची खास युध्दसामुग्री ठेवली आहे. यात १४ व्या शतकापासून १६ व्या शतकापर्यंत सर्व प्रकारची हत्यारे, सामान आढळते. हे सारे ऐकताना व पाहताना आपण अवाक् होऊन

जातो व हरवल्यासारखे होतो. त्या त्या काळाचे वैशिष्टय ती अवजारे दाखवितात. आज असे प्रकार पहायलाही मिळत नाहीत पण इंग्लीश राज्यात परपरा, जुने ते सारे व्यवस्थित जतन करुन ठेवण्याची पध्दत आहे. आवड आहे आणि गुणही आहे किल्ले व स्मारक ही तर उदाहरणे आहेतच पण टॉवर ऑफ लंडन हे एक जबरदस्त असे लंडनचे ऐतिहासिक वैभव आहे व प्रवाशांना आकर्षणही आहे हे खरे.

—००—

# आलबर्ट हॉल

त्यानतर आम्ही आलो आलबर्ट हॉल पहायला—कारण या हालची ख्याती व नाव दरेच दिवसापसून ऐकलेले होते. आपल्या भारताच्या लता मगेशकर (स्वर सम्राज्ञी) यान्चा खास गाण्याचा कार्यक्रम या हॉल-मध्येच झाला होता व अनेक बडयाबडया कलावतानी आजवर या हॉलला भेट देऊन कार्यक्रमही या ठिकाणी सादर केल्याचे ऐकून होतो. तेव्हा हा आलबर्ट हॉल पहायची फार उत्सुकता वाटत होती. इथे केन्सीग्टन स्टेशन (भुयारी रेल्वेचे) वर उतरल्यावर हॉलला जाणे सोईचे ठरते हा आलबर्ट हॉल एरव्ही जाहीर सभा व व्याख्याने आणि नृत्यादी कार्यक्रमाना वापरला जातो. या हॉलचे पूर्ण नाव 'रॉयल आलबर्ट हॉल ऑफ आर्टस अॅण्ड सायन्सेस-' या नावावरुनच पूर्ण कल्पना येते की इथे कोणते कार्यक्रम होत असतील. राणी व्हिक्टोरीयाच्या स्मरणार्थ हा हॉल बाधला गेला. अंडाकृती असा हा हॉल दिसतो व अदाजे ६५० फूट क्षेत्रफळ असावे इतका तो मोठा आहे. रोमच्या वैभवकाळातला एक नमुना- उत्कृष्ट नमुना—वैभवशाली खानदानी वास्तु असे वर्णन करता येईल- याला वर काचेचा डोम असलेले छत आह, लडनमधील महत्वाच्या कार्यक्रमाकरिता हा हॉल हमखास वापरला जातो त्यामुळे हा अतिशय लोकप्रिय ठरला आहे. दरवर्षी इथे सुप्रसिध्द कलावंताचे कार्यक्रम तर होतातच शिवाय 'प्रॉम्पस्' होतात

—००—

# टेन डाऊनिंग स्ट्रीट

यानंतर आम्ही इथल्या पतप्रधानाचे निवासस्थान म्हणून ज्याची ख्याती आहे ते टेन डाऊनिंग स्ट्रीट घर पाहिले. इंग्लंडच्या पहिल्या महिला पतप्रधान मार्गारेट थॅचर यांचे हे निवासस्थान आहे सध्या त्या या वास्तुत राहतात हा रस्ता ज्यावर ही पतप्रधानाची निवासवास्तु आहे तो अतिशय शांत गल्लीवजा रस्ता आहे बाहेरुन वाटणारही नाही की हे पतप्रधानाचे निवासस्थान आहे इ स १७३२ पासून इंग्लंडच्या (ब्रिटनच्या) पतप्रधानाच्या निवासाकरिता टेन डाऊनिंग स्ट्रीटवरील या वास्तुची योजना झाली. तेव्हापासून त्या त्या वेळेचे पतप्रधान इथे राहिले. सध्या थॅचरबाई ब्रिटनच्या पहिल्या महिला पतप्रधान इथे राहत आहेत. सर रॉबर्ट वॉलपोल जे त्याकाळात पतप्रधानाच्या दर्जाचे होते-पण ज्यांना, पंतप्रधान ही उपाधी मात्र नव्हती-तरीही ब्रिटनचे पहिले पतप्रधान असं, ज्यांना समजण्यात येत होत ते रॉबर्ट वॉलपोल यांच्या वेळपासून या वास्तूची ह्या कामाकरिता योजना केली गेली. डाऊनिंग स्ट्रीट हा सर जॉर्ज डाऊनिंग यांनी बांधला जॉर्ज डाऊनिंग हा दुसऱ्या चार्लसच्या व क्रॉम्वेलच्या वेळी सरदार होता. आज टेन डाऊनिंग स्ट्रीटवर बाहेर अष्टौपहर खास वेषातले पोलीस पहारा देत सदैव खडे उभेच असतात. महत्वाचे निर्णय आजवर या वस्तूतच घेतले गेले आहेत

# पार्लमेंट हाऊस

पार्लमेंट हाऊस हे लंडनचं जबरदस्त प्रस्थ भारताच्या स्वातंत्र्याचा सल ज्या इमारतीत लंडनमधे चालत असे ते हे पार्लमेंट हाऊस हाऊस ऑफ पार्लमेंट म्हणजे वेस्टमिनिस्टरचा राजवाडा असे म्हटले जाते वेस्ट-मिनिस्टर हे भुयारी रेल्वेचे स्टेशन आहे आणि पार्लमेंट स्क्वेअर ह्या रस्त्यावर थेम्सच्या सुंदर पार्श्वभूमीवर ही इमारत देखणी वाटते. थेम्स नदीमुळे पार्लमेंटची शोभा निःसंशय वाढवलेली आहे. या अवाढव्य पसरलेल्या वास्तुत महत्वाची अशी अठरा दालन आहेत. राजरस्ता (सर्वसामान्य या अर्थाने नव्हे) म्हणजे राजे मंडळींनी येण्याचे प्रवेश द्वार-नंतर पार्लमेंट हाऊसला भेट देण्याकरिता आलेल्याकरिता प्रवेशद्वार–व्हिक्टोरिया टॉवर,रॉयल गॅलरी, प्रिन्स चेम्बर, हाऊस ऑफ लॉर्डस,हाऊस ऑफ कॉमन्स, सर्वसामान्याकरिता कॉरिडॉर (लॉबी) वेस्ट मिनिस्टर हॉल ही त्यातली काही महत्वाची दालन आहेत पूर्वीच्या काळात या वास्तुत राजेमंडळीचा वास असे–उठबस असे त्यामुळे यात काही दालनं त्याच्याकरिता आहेत. आजही ती नाव तशीच आहेत यातला वेस्ट-मिनिस्टर हॉल मात्र लॉर्ड विलयम रिफस यानी बांधला आहे.

एकेकाळचा हा राजवाडा इ सन १५१२ त लागलेल्या आगीत पूर्णपणे जळून गेला होता फक्त वेस्टमिनिस्टर हॉल व स्टीफन चॅपेल शिल्लक राहिले होते, बचावले होते इ सन १५२९ पर्यंत यात परि-स्थीतीचा बदल झाला नाही. मात्र त्यानंतर आठव्या हेन्रीने व्हाईटहॉल पॅलेसवर (जवळच्याच) ताबा मिळवला आणि तेव्हापासून वेस्टमिनिस्टर पॅलेस येथे राजे मंडळी रहायला लागली. इ सन. १५४७ पासून याला पार्लमेंट हाऊस असे संबोधण्यात येऊ लागले हाऊस ऑफ कॉमन्सच्या सभा त्या काळात स्टीफन चॅपेलमधे होत आणि हाऊस ऑफ लॉर्डच्या सभा दक्षिणेकडील जुन्या राजवाड्यात होत असत इ. सन १६०५ मधे

रोमन कॅथॉलिकानी पार्लमेंट हाऊस उडवून देण्याचा, नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे तेव्हापासून आजतगायात पार्लमेंटला सभेच्या सुरुवातीला आधी,सर्व दालनांची कसून तपासणी केली जाते व मगच पार्ल-मेंट सुरू होते. ही तपासणी खास पारपारिक गणवेषधारी तपासनीसा मार्फतच होते व काळजी घेतली जाते

सध्याचे पार्लमेंट हाऊसचे स्वरुप व वेस्टमिनिस्टर अॅबेचे स्वरुप यात साम्य आढळते. ते तसे मुद्यामच राखले आहे. हा बदल अठराव्या शत-काच्या मध्यात करण्यात आला दुसऱ्या महायुद्धानतर हाऊस ऑफ कॉमन्सकरिताचे दालन व इतर काही दालने याचे पुनराजीवन करण्यात आले. आज दिसणारे हे स्वरुप अठराव्या शतकाच्या मध्यात बांधण्यात आलेले आहे. पार्लमेंट हाऊसमधे येण्याकरिता खास राजेमंडळींकरिता जो राजमार्ग आहे तो पन्नास फूट लांबीचा असून फक्त राजाकरिताच तो राखीव आहे. व दरवेळेला नोव्हेंबर महिन्यात जेव्हा पार्लमेंट भरते तेव्हा पहिल्या दिवशी या राजमार्गाचे, राजरस्त्याचे उद्‌घाटन होते

यातला 'व्हिक्टोरिया टॉवर' हा १८५८मध्ये बांधण्यात आला याची ख्याती अशी की जगातला सर्वांत मोठा व सर्वात उच्च असा हा टॉवर आहे. जेव्हा पार्लमेंट चालु राहते तेव्हा ब्रिटीशाचा युनिअन जॅक या टॉवरवरुन उंचीवरुन डौलात फडकत असतो. राजेमंडळींकरता वर चढून येण्यास असा-णारा जीना हा खास नॉर्मन कलाकुसरीने तयार केलेला आहे हा त्या विशिष्ठ काळाची आठवण करुन देणारा आहे राजाकरिता बसण्याची खास खोली (पार्लमेंट काळात) ही व्हिक्टोरिअन काळाप्रमाणे सजवलेली आहे. ही चौपन्न फूट लांबीची प्रशस्त अशी आहे. या खोलीतील सजावट खास आहे. त्यात भिंतीवरील शूर वीराची चित्रे, खास ओक जातीच्या लाक-लाकडाचे फर्निचर, परपरागत राजाचे छायाचित्राचे दर्शन आणि सगमरवरी फायरप्लेस—अशी ही खास व्हिक्टोरिअन काळातली सजावट या राज-दालनाला केलेली आहे रॉयल गॅलरी या दालनात इंग्रज व स्कॉटिश राजांची स्मारके नेल्सनच्या मृत्युचे स्मारक व वॉटर्लुच्या लढाईच्या वेळचे चित्र आहे 'प्रिन्स चेंबर' या दालनात विश्राती स्थान (राजाचे) आहे. तिथेही राजघराण्यातील ट्युडर राजाची तैलचित्रे, छायाचित्रे, पेंटिंग्ज,

लावली आहेत. समोरच राणी व्हिक्टोरिया हिचा सगमवरातला मोठा पुतळा आहे. त्यावर न्याय व दया याचे प्रतीक असे दर्शविलेली चिन्हे आहेत

प्रवाशानी अगोदर भेटीकरता पार्लमेंट हाऊसला आलेल्याना स्टीफन प्रवेशद्वारातून यावे लागते त्याकरिता परवानगी व ओळखपत्र परवाना हे सगळे घेतल्यानतरच आत प्रवेश मिळतो एकूण पार्लमेंट हाऊस हे अतिशय शिस्तबध्द सावधान इग्रजी सत्तेचा नमुना आहे आणि अर्थात हे असणेही स्वाभाविक आहे लॉर्डस व कॉमन्सच्या मधली लॉबी (गॅलरीवजा जागा) अष्टकोनी असून ती विशेष प्रकारे सजवलेली आहे या ठिकाणचे छत ७५ फूट (पचाहत्तर फूट) उचीचे आहे चॅपेल (राजा स्टीफनचे) सर्व मार्बलनें सजवलेले आहे स्टीफन चॅपेलमध्ये १७ ते १९ व्या शतकातले ब्रिटीश नेते पुढारी योद्धे याचे पुतळे आहेत दक्षिणेकडे वेस्टमिनिस्टर हॉल आहे मागे लागलेल्या आगीतून हा हॉल बचावला हे सुदैवच. याचे छत मौल्यवान अशा ओक वृक्षापासून बनवल्याने ते उची व महागडे आहे

पार्लमेंट हाऊसच्या उत्तरेकडील टोकाला क्लॉक टॉवर आहे ज्याची बरोबरी ट्राफलगार स्क्वेअर व टॉवर ब्रीज या लडनच्या ऐतिहासिक वैभवशाली वास्तु बरोबरीने होते असे हे पार्लमेंट हाऊस आहे. पहाल तितके कमीच–तरीही पहाण्याजोगे हाऊस ऑफ कॉमन्सचा मागील युध्दात बॉम्ब पडल्यानें सत्यानाश झाला. पण तरीही त्याची पुन्हा पूर्ववत बाधणी करण्यात आली व पूर्वीइतकेच आजही ते सजवून शोभिवत ठेवलेले दिसते

उत्तरेकडच्या टोकाला एक काळी ऑस्ट्रेलियन लाकडाची खूर्ची ठेवलेली आहे ती खुर्ची म्हणजे स्पीकरची खुर्ची पार्लमेंट हाऊसवर सभापती ( Speaker) म्हणून अध्यक्ष म्हणून त्याची नियुक्ती असते तो त्या खुर्चीवर विराजमान झाल्यावरच सभा सुरु होते–पूर्वीच्या पद्धतीनुसार राजाशी त्याने बोलायचे व सगळा वृत्ताता कथन करायचा अशी पद्धत होती त्यामुळे आजही त्याला Speaker (बोलणारा) स्पीकर हीच सज्ञा आहे.

विरुद्ध पक्षाच्या लोकांची बसण्याची सोय आमनेसामने आहे. समातर अशी बसण्याची ही पद्धत मुद्दामच केलेली आहे. कारण त्यामुळे त्याना एकमेकाशी चर्चा करता यावी. दोन्ही विरुद्ध पार्टीच्या मध्ये दोन लाल रेषा आखलेल्या दिसतात व त्या ठिकाणी एक गालीचा आथरलेला असतो, ही जणु लक्ष्मण रेषा आहे असे समजून चालायचे कारण विरूद्ध पक्षानी बोलण्याच्या नादात मुद्द्यावरून गुद्द्यावर आल्यास मध्ये रेषा — कारपेट — हद्द असावी हे सोईचे ठरते तेव्हा दूरदर्शीपणा हा साहेबाचा गुण इथे लक्षात घ्यावा 'टॉवर ऑफ लडन' — लडनची प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तु — जवळच असणारी प्रसिद्ध 'थेम्स' नदी — जिने आजवर ब्रीटनचे अनेक चढउतार पाहिले इतिहास घडविला ती थेम्स नदी — आणि या नदीच्या पुलावरुनच समोर दिसणार 'हाऊस ऑफ पार्लमेंट' — जे लडनमधील एक विशाल विस्तृत अस प्रस्थ आहे - ज्या ठिकाणी भारताला स्वातत्र्य देण्याचा (१९४७) खल, काथ्याकुट, वादविवाद सतत झाला ते पार्लमेंट हाऊस — तसच प्रसिद्ध कलावताचा (यात देशी परदेशी सर्वच) कार्यक्रम, सत्कार, सन्मान करणारी आलबर्ट हॉल ही अडाकृती आकाराची वास्तु आणि त्यानतर ब्रिटनच्या पतप्रधानाचे निवासस्थान म्हणून ओळखली जाणारी 'टेन डाऊनिंग स्ट्रीट' ही वास्तु हे सगळ पाहिल्यावर वाटल इग्लीश माणूस अगदी व्यवस्थित आहे. काटेकोर शिस्तबद्ध आहे. आणि मुख्य म्हणजे त्याला आपल्या इतिहासाचा, देशाचा, परपरेचा — वैभवाचा फार अभिमान आहे जे जे पुरातन आहे ते ब्रिटनमध्ये काळजीपूर्वक जतन केल आहे. ती स्मारक, ते किल्ले, ती कॅथेड्रल्स आणि या सगळ्यावर पारपारिक पद्धतीने कडक पहारा देणारे ते पोलीस पहारेकरी - प्रवाशाना कौतुक वाटाव अस हे सगळ स्वच्छ व्यवस्थित ठेवलेल हे आणखीनच विशेष. हे सगळ पाहून आम्ही पुन्हा विंडसर कॅसेलला आलो. तिथे बाहेर दरवाजावर दोन्ही बाजूना पहाऱ्यावर उभे असणारे पहारेकरी ('बॉबी, पोलीस') दिसले ते सपूर्ण सरजामी पोषाख करुन अगदी सज्ज होते- नजर निश्चल आणि निर्विकार होती - हालचाल तर अजिबात नव्हती. डोळ्यांची पापणीही हालताना दिसेना क्षणभर वाटल - हे पुतळेच आहेत वाटल हात लावून पहावा — म्हणून जवळ गेले तरीही निश्चलच. पण मग माझ्याच लक्षात आल ड्युटीवर

असताना ते पोलीस पहारेकरी तासनतास असेच शिस्तीत उभेच रहातात. ड्युटी म्हणजे ड्युटी - मनस्वीपणाने करायची - इमानेइतबारे त्यात टगळमगळ नाही - चेहऱ्यावरचा करडा भाव जराही बदलणार नाही. पुतळ्याप्रमाणे उभं राहून जिवत माणस इतका शिस्तबद्ध कडक पहारा दिवसरात्र करतात याच कौतुक वाटलं. इंग्लंडचा हा बॉबी - त्याचा तो पोषाख ती उंचउंच टोपी - डोळे फक्त उघडे आणि अत्यत जागरुक विशिष्ट तऱ्हेचे ते कपडे - एकूण ही पाहण्याजोगी खास चीज आहे. इंग्लडचा बॉबी हा एक स्वतंत्र विषयच होईल. एकूण लक्षात राहणारा.

—००—

# बकिंग हॅम पॅलेस

शेवटी लडनदर्शन बसने प्रवास करीत आम्ही आलो ते प्रसिद्ध "बकींग हॅम पॅलेसला, इग्लडच्या राणीचा हा राजवाडा पण मला हा राजवाडा वाटलाच नाही. एकूण सर्वच वातावरण-इमारत-शात-फिक्कट वाटली राजेशाहीपणाचा झगमगाट कुठेही आढळला नाही राजा आणि राणी – राजपुत्र – राजकन्या – राजवाडा या सर्वाबद्दल आपल्या बालपणापासून झालेल्या विशिष्ट कल्पना आहेत त्यातल मला काहीच 'बकींग हॅम पॅलेस' पाहून वाटलं नाही पहारेकरी दरवाजावर सज्ज होते– तसेच निर्विकार, निश्चल उभे. लाबच लाब पसरलेली ही दगडी इमारत असंख्य दरवाजे – खिडक्या, गॅलऱ्या यानी अवाढव्य पण सुस्त वाटली – सुनासुना वाटणारा हा बकिंगहॅम पॅलेस आहे आतमध्ये प्रवाशाना जाऊ देत नाहीत. गेटबाहेर उभ राहूनच प्रवासी – चाहते राणीचं दर्शन घेतात. बऱ्याच वेळ उभ राहूनही राणी दिसलीच नाही. कुठल्याही गॅलरीत तिनं दर्शन दिल नाही कशी दिसणार ? कदाचित ती महत्वाच्या कामात असावी असं वाटलं.

—००—

# चेंजिंग ऑफ गार्डस्

Changing of guards म्हणजे राणीच्या राजवाड्यावरील पहारेकरी रोज बदलत असतात तो समारंभ हा समारंभ पाहण्याजोगा असतो. अत्यंत शिस्तीत मोठ्या शाही इतमामाने हा सगळा सोहळा नेहमी चालतो. घोडे व माणस सगळी निमूटपणे शिस्तीत आणि शिवाय रुबाबात हा सोहळा साजरा करतात पहारेकऱ्याची ड्युटी बदलणे हा याचा मुख्य भाग तोही सांगरसंगीत पद्धतशीरपणे. त्याचे ते सजवलेले घोडे - त्यावर बसलेले ते सरंजामी पोषाखातले शिपाई - मोठ्या रुबाबात आपल्या कामात ही सगळी परेड करतात प्रवासीजन दुरुन दुरुन हा सोहळा पाहायला येतात 'बकिंगहॅम पॅलेस' समोर विस्तीर्ण हिरवागार - असंख्य रंगीत फुलांचा सुंदर बगीचा आहे - तसेच मनोहारी कोरीव काम केलेला पुतळा व कारंजी आहेत राणी व्हिक्टोरिया यांच्या काळापासून चालत आलेलं हे सगळं वैभव या ठिकाणी आजवर पद्धतशीरपणाने जोपासलं आहे पण राजवाडा म्हणून म्हटलं तर मला तर सुनासुना वाटला.

—००—

# 'वॉरविक कॅसल'

'बकिंगहॅम पॅलेस' पाहिल्यानतर आम्ही ॲव्हॉन नदीवरील 'वॉरविक कॅसल' पाहायला गेलो उंचच उच - कोरीव दगडी बांधकाम असलेला हा किल्लाही पाहण्याजोगा आहे. या वॉरविक कॅसलसमोरही विस्तीर्ण हिरवेगार गवताचा गालीचा जणु पसरलेला त्या हिरव्या पार्श्वभूमीवर मागे उभा असलेला हा दगडी किल्ला भक्कम आहे. मागे ॲव्हान नदी वाहते याही किल्ल्याच्या ठिकाणी स्वच्छता आढळली. कितीही वर्षे लोटली तरी ती स्वच्छता आज टिकवलेली दिसते. कुठेही कचरा, घाण, विलब, अडाणीपणा प्रवाशांची गैरसोय नाही. दरवाजावर पहारेकरी माहिती सागणारे गाईड – प्रवाशाना माहिती व्हावी म्हणून सचित्र पुस्तकांची तिथेच असणारी सोय सार व्यवस्थित. एकुण परदेशात सर्वत्र अशीच व्यवस्था आढळते. जिथे जिथे किल्ले व स्मारके आहेत तिथे या सचित्र माहितीपुस्तिका ठेवलेल्या आहेत - पोस्टकार्डेहि सचित्र अशी विकली जातात. आठवण म्हणून या गोष्टी उपयुक्त वाटल्या. त्या किल्ल्याची माहिती फोटोच्या कार्डाच्या मागील बाजूस थोडक्यात पण महत्वाची अशी लिहीलेली दिसते आपल्या भूतकाळातल्या इतिहासाबद्दल वैभवाबद्दल इथली मंडळी अतिशय जागरुक - अभिमानी आढळतात. तसेच या किल्ल्यातून – स्मारकातून फिरतानाही एक पद्धतशीर शांतता पाळण्याचा, रिवाज आढळतो हेही शिकण्याजोगे वाटले.

—००—

# लंडनमध्ये महाराष्ट्र मंडळ

लडनच्या महाराष्ट्र मडळात माझा कथाकथनाचा कार्यक्रम ठरला होता म्हणून लडनला मुद्दाम या खास कामाकरिता आम्ही काही तास मुक्काम केला सगळी मराठी मडळी भेटली परदेश प्रवासात बऱ्याच दिवसानी मराठी भाषा ऐकायला मिळाल्याने मोकळ वाटल - माणसात आल्यासारख वाटल - शिस्तबध्द शिष्टाचार झटकून टाकल्याने कस हलक वाटल – साहेबाच्या शिस्तबद्ध वातावरणात जीव जरा गुदमरतच होता नाहीतरी - कारण आपल्या मराठी माणसाला अशी सवयच कुठे असते चोवीस तास शिस्तीची ? लडनला आल्यावर सगळ्या महाराष्ट्रीय मडळीना एकत्र बघून खूप बर वाटल आपल्या भाईबधाची ओळख, महत्व या अशा परदेश प्रवासात विशेषच जाणवत

लडनच्या 'महाराष्ट्र मडळाला' अजून स्वत ची अशी इमारत नाही. त्यामुळे ठरवून मंडळी एकत्र एखाद्याच्या घरी जमतात गेली काही वर्षं ही मराठी मडळी लडनला आपल्या विदर्भाच्या आजीबाई वनारसे याच्या जावयाच्या श्री. जिरापुरे याच्या निवासस्थानी जमत आहेत त्याच मोठ प्रशस्त घर त्यातच आपले मराठी सणवार ही मडळी एकत्र जमून उत्साहाने साजरी करतात. परदेशात आलेल्या मराठी कलाकारांचे कार्यक्रम मोठ्या उत्साहाने याच वास्तुत साजरे होतात आजीबाई वनारसेंच्या या घरात 'माहेरी' आल्यासारख वाटल. घरातच प्रशस्त हॉलमध्ये आपल्या देवदेवताच्या मूर्ती आहेत फोटो आहेत वातावरण प्रसन्न अशी ही श्री. जिरापुरे याची वास्तु आढळली. या सगळ्या मडळीनी मराठी कथा ऐकायला त्यादिवशी एकच गर्दी केली होती. मला व माझ्या सोबतच्या कुटुबियाना भेटून त्या सगळ्यांना अतिशय आनद झाला मी दोन कथा सागितल्या आणखीही ऐकायला मडळी तयारीने बसली होती. पण रात्र फार झालेली म्हणून कार्यक्रम सपविण्याकरिता मी विनती केली. लंडनपासून दुरून-दूरून दोन दोनशे मैलावरून मराठी माणसं

जोडप्याने कुटुंबियासमवेत मराठी कथा ऐकायला मोटरी घेऊन धावत आली हे पाहून मन भरून आलं कार्यक्रमाच्या पसंतीची पावती घेऊन खास महाराष्ट्रीय पद्धतीचे सागरसंगीत भोजन सर्वांसमवेत झाल्या-वर मी सर्वांचा निरोप घेऊन परतले पण कार्यक्रमाला गेल्यापासून परत निघेपर्यंत एका मनसोक्त वातावरणात मी वावरले कारण मला तिथे जाणवलेला उत्साह, आपलेपणा, आपली मराठी भाषा, त्यातलं साहित्य आणि विशेषत. आपली संस्कृती याचा आस्वाद घ्यायला इथला मराठी माणूस आसुसलेला दिसला कार्यक्रमाला सुरुवात होण्याआधी माझ्या कानावर जवळच्याच खोलीत चाललेला मातृभाषेतला संवाद पडत होता. 'अय्या तू नवा कुकर घेतलास ? 'ए शेव फारच छान लागतेय न ?' 'बघ न त्या दुकानात साड्या आणि टेबलकव्हर छान आलेयत'

—००—

# लंडनमध्ये माझं मराठी कथाकथन

'अहो'जरा शंकरपाळी इकडे येऊ द्यात चव तरी बघु 'हे सारे संवाद तसे निरुपद्रवी- युरोपीय संस्कृतीशी तर अगदी न जुळणारे. पण एक मोकळ, भारतीय मराठी मन त्यामागे जाणवत होत. या संवादातून मला जाण-वलं एक दूर राहिलेलं 'आपलं जग' जवळ करण्याची धडपड भारतीय बैठकीवर मांडी घालून आरामात बसलेली ती सर्व मंडळी पाहून मला तर क्षणभर वाटलं आपण नागपुरातच आहोत हो सांगायचच राहिलं. या सगळ्या कार्यक्रमाच्या उत्साहाचं प्रेरणास्थान असणारे श्री. जिरापुरे हे आपल्या विदर्भाचेच आहेत. तर असं हे लंडनमध्ये नागपूर जाणवलं कथाकथानाचा कार्यक्रम छान रंगला. आणि त्यानंतरचा भारतीय पंग-तीचा. पातळभाजी, भात, भाजीपोळी (शेवटून दही) पंगतीतली धावपळ गडबड, धांदल आणि आग्रह करकरून वाढण सारं कसं आपल्याकडलंच

निमित्त कथाकथनाचं पण बाकी ही सारी धडपड हरविलेले हरव-णारे 'आपले जीवन' पुन्हा जगून घेणेच की ! माझ्या तर स्मरणात हा

कार्यक्रम कोरलाच गेला. सारी मडळी फाटकापर्यंत निरोप द्यायला आली. मन भरून आल. लडनमधील, एकूण इग्लडमधील सर्वच प्रेक्षणीय स्थळे अतिशय स्वच्छ ठेवलेली आहेत ठिकठिकाणी खाण्यापिण्याच्या सुखसोई आहेत. पण कुठेही कागदाचा कपटा- बोळा पाण्याची साडलवड–कचरा काही जराही नाही. या स्वच्छते बद्दल कौतुक वाटत तसेच सर्वजागी. कानाकोपऱ्यात, घराबाहेर, रस्त्यावर, गावाबाहेर ट्युलिप्सची कपाच्या आकाराची गुलाबी, पिवळी, लाल-लाल रगाची फुल अगदी ताटवेच्या ताटवे रस्त्याच्या दोन्ही बाजुनी तुमच्या स्वागताला हजर आहेत तसाच बहरून ओसडणारा चेरीब्लॉसम रस्त्याच्या कडेकडेने सज्ज आहे एक मात्र फार जाणवल. इथे पिण्याला पाणी मात्र कुठेच फारस मिळत नाही कारण पाणी कुणीच पीत नाही त्या थडगार हवेला पाणी कुणी मागतही नाही. आम्ही एकदोन ठिकाणी खाण्यानतर प्यायला पाणी मागितल तर तिथल्या विक्रेत्यान आमच्याकडे आश्चर्याने व चमत्कारिकपणे बघितल पाण्याची तहान आम्हाला ऑरेंज ज्यूसवर भागवावी लागली फळाचे रसमात्र इथे अगदी ताजे आणि मनाला तृप्त करणारे मिळतात आणि एरव्ही लोक हरतऱ्हेची दारू पितात मद्यामुळे पाणी कुणी मागतच नाही तशी पद्धतच आढळली नाही

—००—

# शेक्सपिअरच्या गावी

लडनमधील अनेक प्रेक्षणीय स्थळ पाहून आम्ही त्यानतर जगप्रसिद्ध असलेल्या शेक्सपिअरच्या गावी– स्ट्रॅटफोर्डला गेलो हे शेक्सपिअरचे जन्मगाव

निवासगाव– या गावी त्याचे घर आहे आजही ते अतिशय स्वच्छ-टापटिपीने व्यवस्थित ठेवले आहे. हे विशेषच कौतुकाचे स्ट्रॅटफोर्ड हे गाव प्रसिध्द ॲव्हॉन या नदीवर वसलेले आहे. म्हणून या गावाला स्ट्रॅटफोर्ड अपॉन ॲव्हॉन' असेच म्हणण्याचा प्रघात दिसला. ॲव्हॉन नदीचे पाणी उचावरून पाहताना माझ्या मनाची तद्री लागली कारण शेक्सपिअर त्याची नाटके, त्यातली स्वगत हा माझा पीएच् डी च्या प्रबधाचा अभ्यासविषय त्यामुळे एका पवित्र वास्तुत आल्याचे मला जाणवत राहिले

—००—

# रॉयल शेक्सपिरीअन कंपनी

या ॲव्हॉन नदीने, तिथल्या निसर्गरम्य सौंदर्याने शेक्सपिअरला अधिकच स्फूर्ती दिली असणार. हे ठिकाण- हा नदीकाठचा सगळाच परिसर अतिशय नयनरम्य आहे ॲव्हॉन नदीच्या पात्रातून प्रवासी मजेने नौकाविहार करीत होते मला मात्र बोटिंगपेक्षा शेक्सपिअरलाच भेटायची घाई झाली. ॲव्हॉन नदीच्या तीरावर बाधलेले शेक्सपिअरचे स्मारक तिथले त्याच्या नाटकाच्या प्रयोगाचे त्या वेळचे बाधलेले रॉयल शेक्सपिरीअन कपनीचे थिएटर (RSC) हे सगळे पाहाण्याला मी उतावीळ होते, उत्सुक होते. थिएटर कधी उघडते याचीच

मी वाट पहात होते स्वाभाविकच माझ्या मनात शेक्सपिअरची स्वगते (माझा अभ्यास प्रबंध विषय) सुरू झाली. मन एकाग्र झाल वेळ सकाळची पावणेदहा वाजताची (तिकडचे पावणे दहा) बरोब्बर दहा वाजता थिएटर उघडते एक मिनीटही आधी नाही उशीरही नाही असं कळल सारे प्रवासी– दूरून-दूरून या जगप्रसिध्द नाटककाराला, त्याच्या स्मारकाला, घराला, थिएटरला पाहायला बाहेर ताटकळत उभे होते. बसेस प्रवाशानी भरभरून येत होत्या बरोब्बर दहा वाजता थिएटरचे दरवाजे उघडले इथेही साहेबाची वेळेबाबतची काटेकोर शिस्त लक्षात आली आणि कौतुक वाटल टाईम पाळावा तर इंग्रज साहेबानेच आम्ही मात्र त्याने हिंदुस्थान सोडून जाताना दिलेल घड्याळ फक्त बाळगतोय. टाईम मात्र नाही या थिएटरबद्दल पुढे सविस्तर लिहीणार आहेच पण आधी ते घर स्ट्रॅटफोर्डला शेक्सपिअरच्या घरापासून थोड्या अंतरावर आमची प्रवासी बस थांबली सगळे प्रवासी भराभर खाली उतरले भुरभुरणारा बर्फाच्या तुषाराचा वर्षाव एकाएकी सुरू झाला त्यातही कोवळे नाजूक ऊन आपली नजाकत दाखवीत राहीले आणि हळुहळू बारीक बारीक पाऊस सुरू झाला प्रवाशानी बरोबर आणलेल्या घडीच्या छत्र्या उघडल्या रंगीबेरंगी सुंदर आकाराच्या छत्र्यांचा तांडाच्या तांडा शेक्सपिअरच्या घराच्या दिशेने निघाला ते दृष्यच विलोभनीय होते.

—००—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८८७ २५२५० ३०/९२८८
(स्थळ प्रत)

# शेक्सपिअरच्या घरात आम्ही

अगदी प्रथमदर्शनी घरासमोरच सुदर हिरवळ व रगीबेरगी फुलाचा बगिचा बहरला होता शेक्सपिअरच्या आठवणीइतकी ताजी टवटवीत फुल पाहून मन प्रसन्न झाल. मृत शेक्सपिअरला त्याच्या स्मारकाना आपण भेटायला आलो नसून जिवत जागत्या ओळखीच्या शेक्सपिअरला आपण थोड्याच वेळात भेटणार असा उत्साह त्या वातावरणाने, फुलानी हवामानाने निर्माण करुन दिला—मन प्रसन्न झाल आणि त्या जगप्रसिद्ध नाटककाराच घर दृष्टीपथात आल या घरात हा महान नाटककार लहानाचा मोठा झाला हे घर अतिशय निटनेटके उत्तम स्थितीत आणि स्वच्छ निगा राखून ठेवलेले दिसले (माझ्या डोळ्यात आपल्या नाटककार गडकऱ्याचे सावनेरचे स्मारक आठवून पाणी तरळले )

लाल रगाच्या विटाची जुडाई घराला शोभा आणत होती—घराबाहेर सर्वत्र गुलाबी ट्युलिप्सच्या फुलाचे ताटवे पसरलेले आतून हे घर अत्यत सामान्य परिस्थीतीतल्या माणसाच्या घराप्रमाणे आहे. पण या घरात राहणारा मात्र असामान्य प्रतिभेचा, असामान्य नाटककार होऊन गेला हे सत्य. शेक्सपिअरची खोली, त्याचा झोपण्याचा पलग, बिछाना आजही स्वच्छ ठेवले आहे शेक्सपिअरचे जेवणघर, तो बसत असे ती चटई त्याची ती उबदार खोली (fire place) तसेच ज्या टेबलावर तो शाळेत असताना लेखन, अभ्यास करीत असे ते तत्कालीन लाकडी टेबल—जुनाट पण नीट ठेवलेले आढळले—जेवणघरातली भाडीही लाकडाची कालनिदर्शक अशी विशिष्ट प्रकारची होती. इतका काळ लोटला, शतक लोटली तरीही हे सगळ वैभव—राष्ट्रधन अतिशय श्रद्धेने, निष्ठेनें इग्रजानी अभिमानाने बाळगले आहे हे कौतुक करण्याजोगे आहे काळाबरोबर कल्पना बदलतात, निष्ठा बदलत, श्रद्धास्थान बदलतात—पण इथे मात्र 'आमचा शेक्सपिअर' ही भावना पक्की रुजलेली आहे.

शेक्सपिअरच्या घरातून फिरताना घरात शिरल्यापासून मनाला एक प्रकारची स्तब्धता आली कौतुकमिश्रीत आदराची तरीही गूढ अशी भावना मनाला जाणवत राहिली सार मनात साठवून ठेवाव–डोळयानी भरभरून घ्याव अस वाटल–(त्यातून माझा पीएच्. डी. चा अभ्यासाचा विषय त्यात शेक्सपिअर–त्याची नाटक–त्यातली स्वगत हेही कारण) पण तरीही एक आपुलकी या घरात फिरताना वाटत होती. कुठल्याही क्षणी एखाद्या खोलीतून शेक्सपिअर बाहेर येईल आणि 'हॅलो' म्हणेल असेही वाटत राहिले–एकप्रकारची जवळीक इथे वावरताना वाटत होती

शेक्सपिअरचे राहते घर पाहून झाल्यावर बसकडे परतताना हळूवार आवाजात स्तब्धपणे घराकडे पुन्हा पुन्हा मागे वळून पाहात प्रत्येकजण दुसऱ्याशी काहीतरी बोलताना दिसला एका जगप्रसिद्ध नाटककाराच्या घरी आपण जाऊन आलो ही ती जाणीव होती प्रवाशात सर्व देशाचे अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, ग्रीस व इंग्लड आणि इंडिया अशा अनेक देशांचे लोक होते एकूण शेक्सपिअर सगळयाच्याच मनात रेंगाळत राहिला–बस आता RSC (रॉयल शेक्सपिरीअन कपनीच्या) थिएटरकडे निघाली

आम्ही ॲव्हॉन नदीच्या काठावर वसलेल्या या थिएटरकडे आलो–स्ट्रॅटफोर्डच्या या थिएटरला या नदीची पार्श्वभूमी फारच छान लाभलेली आहे सुरुवातीलाच येथे शेक्सपिअरचा पुतळा उंच गोलाकार घुमटावर दिसतो प्रथमदर्शनी दिसणारा हा दगडी पुतळा लक्ष वेधून घेतो.

—००—

# शेक्सपिअरची पात्रे

शेक्सपिअरची बसण्याची ती विशिष्ट पोझ आहे त्याच्या जन्मघरी-निवासस्थानीही पुतळयावर ती आढळली अॅव्हॉन नदीवरील या पुतळयाच्या सभोवार गोलाकार फेर धरुन उभी आहेत ती शेक्सपिअरची नाटकातली गाजलेली पात्रे जणु काही दिवसरात्र शेक्सपिअरच्या भोवती राहून त्याचा त्याच्याशी आणि त्याच्या आपल्या या पात्राशी संवाद चालु आहे त्याच्या रोमारोमात ती पात्रे बसली आहेत या पात्राचे भव्य दगडी पुतळे सभोवार लावलेले आहेत या कोरलेल्या पुतळयात आपल्याला भेटतात तो 'किंग लिअर', ती 'लेडी मॅकबेथ', तो 'हॅम्लेट', तो 'ऑथेल्लो' – 'सीझर' – आणि इतरही या सगळ्या पात्राना त्या ठिकाणी सभोवार शेक्सपिअरभोवती पहारा करीत ठेवल्याप्रमाणे वाटल ही पात्र स्तब्ध तसेच आपणही हे सार प्रथमदर्शनी दिसताच स्तब्ध होऊन जातो हेच खरे मन विचारात गढून जाते - ती ती नाटक आठवायला लागतात. ते प्रसग मनात नाचायला लागतात आणि अस वाटत आता ही पात्र केव्हाही आपली स्वगत म्हणायला लागतील - मन वेडयासारख आतुरत कान चाहूल घेतात गोलाकार फिरून पायऱ्या चढून त्या पात्राकडे शेक्शपिअरच्या उचावर आरूढ असलेल्या पुतळयाकडे वळून पुन्हा पहात पहात आपण हिरवळीवर पाय टेकतो आणि मगच मन सावरत - शात स्थिर होत, नाहीतर त्या पात्राच्या स्वगतानी RSC चा अॅव्हॉन नदीचा तो शात भासणारा परिसर एकदम भारून गजबजून जायचा एकूण सगळयाच दृष्टीने या शेक्सपिअर थिएटरला वातावरणाची एक खास छान अशी पार्श्वभूमी लाभली आहे. जवळच लायब्ररीही आहे. यात शेक्सपिअरचे सर्व साहित्य आहे. ही लायब्ररी पाहून माझी तर आधाशा-सारखी स्थिती झाली. इतक सगळ अभ्यासविषयक साहित्य एकदम जवळ आल्यावर काय घेऊ नि काय नको, काय पाहू नी काय नको, अशी जत्रेत फिरणाऱ्या खेडवळ मुलासारखी माझी अवस्था झाली सगळ विकत

ध्यावसही वेडयाप्रमाण वाटल लायब्ररीही अतिशय स्वच्छ निटनेटकी ठेवलेली. साहित्याची दुर्मिळ अशा साहित्याची, जपणूक याच लोकानी करावी तितकी श्रद्धा पाहिजे तसाच नेटही हवा - मनुष्यबळही हवे आणि स्वाभिमानही तसाच जाज्वल हवा इग्रज माणूस एकवेळ आपल साम्राज्यही देईल - पण तो आपला शेक्सपिअर कधीही गमवायला तयार होणार नाही म्हणतात ते खरे आहे शेक्सपिअरला इकडे फारच मानतात असे एकूण दिसले आणि ते स्वाभाविकच आहे

—००—

# शेक्सपिअर : इग्लंडचे वैभव

शेक्सपिअरच्या नाटकाचे आजही या थिएटरात प्रयोग होत असताना RSC. म्हणजे रॉयल शेक्सपिरीअन कपनी हे प्रयोग करते सगळ्या प्रयोगाची तिकिटे सहासहा महिने आधीच पूर्ण खपलेली असतात इतकी आजही लोकप्रियता या नाटकाना लाभलेली आहे. आम्ही मे महिन्यात तिथे होतो सहज आलोच आहोत तर शेक्सपिअरच नाटक पाहूनच जाव असा विचार केला व तिकीटाची चौकशी केली तर सहा महिने आधीच पूर्ण बुकीग झालेल होत-आणि पुढील सहा महिने आम्हाला व्हिसा अभावी राहण शक्य नव्हत तर तो विचार बाजुला ठेवावा लागला. पाहिलेला शेक्सपिअर मनात भरुन पुढे चालण भाग होत या नाटकाच दिग्दर्शन कुणी केल त्यात काम कुणी कुणी केली ? त्याच सगीत दिग्दर्शन, नेपथ्य कुणी केल होत- हे त्यात्या काळातलं सगळ व्यवस्थित नोद करुन ठेवलेल आढळल-पोशाख, सजावट, मुख्य भूमिका त्याची त्याची नाव सगळ समोरच नाटकाबरोबर जाहिरातील लिहून ठेवण्याची त्या ठिकाणची पद्धत वाखाणण्याजोगी वाटली

—००—

# शेक्सपिरीअन थिएटर

स्ट्रॅटफोर्डला R S C. ला आम्ही जेव्हा गेलो त्यावेळी तिथे 'मच अँडो अबाउट नथिंग' 'किंग लिअर' अँन्थनी क्लिओपात्रा ही शेक्सपिअरची नाटके लागली होती तसेच प्रसिद्ध नाटककार इब्सेन याचे 'पिर जायंट' हेही नाटक लागल होत समोरच बाहेरच्या बाजूला गर्दी दिसली तर लक्षात आल इथ गोलाकार पद्धतीन नाटकाच्या प्रयोगाचा तपशील तारीखवार लागलेला होता येत्या तीन महिन्यात होणारे प्रयोग त्या नाटकाची नाव, त्यातील प्रमुख भूमिका करणाऱ्या नटाची नाव-संगितकार दिग्दर्शक, नेपथ्य सजावटकार सगळ्याची ही पद्धतशीर व्यवस्थित नामावली होती-मला ही पद्धत फार आवडली-नाटकाची नाव वाचून तोंडाला पाणी सुटल. पण इंग्लंडचा मुक्काम वाढवण शक्य नव्हत व्हिसाही अधिक मिळण कठीण होत–तेव्हा R S C कडून मिळालेल्या शेक्सपिअरच्या नाटकाच्या यादीनेच समाधान मानण भाग पडल नटाच्या यादीत बऱ्याच नाटकात पॉल मुनी या प्रसिद्ध नटाचा उल्लेख आढळला

'ज्युलिअस सीझर' मला पहायला मिळाल नाही पण या झालेल्या प्रयोगाच्या अनेक गोष्टी मला तिथे जवळून पाहायला मिळाल्या हेही नसे थोडके. त्यावेळचे पोशाख, रगमच प्रेक्षकाची बसण्याची सोय. तत्कालीन नाट्यप्रयोगातल्या वस्तु आज या जुन्यावस्तु पाहायलाही मिळणे दुरापास्त आहे इ सन १८८१ ल ऑथेल्लो या शेक्सपिअरच्या प्रसिद्ध नाटकाचा तिथे प्रयोग झाला त्या प्रजोगात ऑथेल्लोने (नायक) घातलेले कपडे, विशिष्ट तऱ्हेचे त्याकाळचे झगे (गाऊन) तसेच नाटकातल्या इआगोने (खलनायक) वापरलेले प्रयोगातले कपडे हेही पहायला मिळाले क्षणभर ते पाहूनच त्याकाळात गेल्यासारखं वाटल-हे विशिष्ठ तऱ्हेचे गाऊन बनविणाऱ्याची नावेही तिथे लावलेली आहेत. हे विशेष संशोधन-तेही नाट्यविषयक संशोधन करणाऱ्या माझ्यासारख्या अभ्यासकाला R S C. ने दिलेली ही अपूर्व मेजवानीच वाटली

काही काही कपड्यावर विशेषत राजाच्या, राणीच्या ( किंग लिअर किंवा लेडी मॅकबेथ ) त्यावेळी वापरत असणारे चमकणारे मोठ-मोठे खड्याचे दागिनेही आज तसेच लावून ठेवलेले आहेत. काचेच्या कपाटात बंद असणारे हे पोशाख- (यावेळच्या वैभवशाली प्रयोगाची आठवण व जाणीव करुन देतात मुख्य म्हणजे हे सर्व स्वच्छ व अतिशय नीटनेटके ठेवले आहे

शेक्सपिअर काळाच्या पडद्याआड गेला पण रंगभूमीच्या पड्यावर अजून तो ठामपणे उभा आहे तसेच तिकडे दूरदर्शनवर (TV) आजही त्याच्या नाटकाचे तडाखेबंद प्रयोग होत असतात त्या प्रयोगाचे (टी. व्ही वरील) फोटोही या ठिकाणी लावलेले आढळतात शेक्सपिअरमय असं सगळं वातावरण याठिकाणी जाणवलं रॉयल शेक्सपिरीअन कंपनीच्या थिएटरात नाटकाची त्यातील प्रसंगाची भव्य अशी पेंटीग्ज सर्वत्र लावलेली आहेत शेक्सपिअरच्या नाटकाचा अभ्यास, संशोधन करणाऱ्या पुढच्या पिढीची ही केवढी सोय या देशाने करुन ठेवली आहे असं हे सगळं पाहून वाटलं शेक्सपिअरच्या साहित्याबरोबर त्याच्या दुर्मिळ वस्तुचे संग्रहालय, माहितीपुस्तिका सर्व या वास्तुच्या कारणाने या थिएटर व लायब्ररीने व्यवस्थित मांडले आहे

एखाद्या गावामुळे एखाद्या मनुष्याला मोठेपण मिळले पण एखाद्या माणसामुळे एखादे गाव जगाचा इतिहासात प्रामुख्याने अजरामर व्हावे असा योग क्वचितच,तो या गावाला मिळाला. शेक्सपिअरमुळे स्ट्रॅटफोर्डला ॲव्हान नदीला महत्व आले–नाव मिळाले स्ट्रॅटफोर्ड इतके शेक्सपिअरमय झाले आहे की बाजारातल्या दुकानाना शेक्सपिअरचा नाटकाची नावे दिलेली दिसली–वाचून गमत वाटली ही खरी श्रद्धा आपल्याकडे मात्र तुकाराम कटिंग सलून किंवा रामभरोसे हॉटेल हे प्रकार वाचून माझ्या मनाला वैताग येतो–मोठ्या माणसाची केवळ नावे देऊन मोठेपणा येत नाही–तिथे मनापासूनच श्रध्दा हवी, प्रयत्न हवा बाजारपेठेत फिरताना मला एका दुकानाचे नाव 'मच ॲडो अबाऊट नथिंग' हे दिसले तर दुसरीकडे, मिडसमर नाईट ड्रीम व 'रोमिओ ॲण्ड ज्युलिएट,' ॲज यु लाईक इट' हेही आढळले केवढी ही लोकप्रियता शेक्सपिअरचा नावाच्या किल्ल्याही त्याच्या फोटोसह तिथे विक्रीला ठेवलेल्या दिसल्या मीही

स्ट्रॅटफोर्डची ट्रीपची आठवण म्हणून आणि शेक्सपिअरचीही आठवण म्हणून एक अशी किल्ली विकत घेतली

शेक्सपिअरच्या या RSC च्या थिएटरची एक लहानशी प्रतिकृती (Model) बाहेर लावली आहे. नाटककपनीनेही शेक्सपिअरच्या नाटकाना आणि त्याला अक्षरश उचलून धरले आहे शेक्सपिअरच्या काळात नाटकाचे थिएटर कसे असे ? हा स्वतत्र अभ्यासाचा व सशोधनाचा विषय आहे अनेकांनी यासबधी लिहिले आहे या मॉडेलवरुन त्याकाळातल्या थिएटरची कल्पना येते चारी बाजुनी प्रेक्षकाच्या बसण्याच्या गॅलऱ्या (बाल्कनी) आणि मधोमध प्रयोगाचे स्टेज (हल्ली अस कुठे पहायला मिळत नाही चौथी भित प्रेक्षक असतात–पण त्याकाळात सगळा प्रकार अगदी निराळा होता हेच खरे) बाहेरच्या एका खोलीत ड्रेपरी (नेपथ्य सजावटी इतर सामान) व इतर आवश्यक सामान जपून ठेवलेले दिसले त्यात प्रसिध्द 'किंग लिअर' नाटकातल्या किंग लिअरचा रत्नजडीत लाब झगा (गाऊन) ज्यावर खरोखरीच हिरे, माणेक बसवली आहेत असा होता तसेच हॅम्लेटच्या कपड्याचा, चिलखताचा नमुना–शिरस्त्राणाचे प्रकार-मॅकबेथमधील भुसा भरलेली ती भयानक धुवडे–मानवी सागाडे तलवारी, जिलखते–पायातील बुटाचे काही तत्कालीन प्रकार सर्व पाहून मनात नाटक सजीव झाले–त्या त्या काळात गेल्यासारखे हे सर्व पाहून वाटते तसेच रोमिओ–ज्युलिएटचे पुतळे ऑफिलियाच्या गळ्यातील मोत्याची माळ, हॅम्लेटचा निरागस पण चिताक्रांत चेहरा–भयानक दिसणारा हबशी, ऑथेल्लो आणि तितकीच देखणी निष्पाप डेस्डिमोना, कावेबाज चतुर 'इयागो, (खलनायक) विदुषकी दिसणारा 'फॉलस्टाफ' सगळी पात्रे इथे जिवत झाली आहेत

शेक्सपिअरचा काळ हा असा स्ट्रॅटफोर्डने अलगदपणे आपल्या अकावर सभाळला आहे आणि ॲव्हान नदीने तो ताजा टवटवीत ठेवला आहे हे सगळे पहात असताना असे जाणवते की काळाची मधली सगळी वर्षे पुसली गेली आहेत आणि आपण साक्षात त्या शेक्सपिअरलाच भेटत आहोत.

–००–

# न्युयॉर्कला प्रयाण : पॅन ॲम

इंग्लंड मध्ये बरीच मुख्य मुख्य स्थळ पाहिली-अजून पाहण्याजोगीही तशी बरीच आहेत पण आता आम्हाला एक तर अमेरिकेला जाण्याचे वेध लागले होते आणि पुन्हा सुट्टीचा हिशोब ध्यानात घेऊन सर्व प्रवास वेळेवर संपवण भाग होत-तस व्हिसा सहा महिन्याचा होता पण रजा फक्त दोन महिन्याची घेतलेली होती म्हणून आम्ही इंग्लंडचा प्रवास आटोपता घ्यायच ठरवल-तस आजूबाजूला छोट्या मोठ्या सहली काढून इतरही काही ठिकाण पाहिली. ' स्कारबरा बीच ' ला खूप मजा आली अशी आणखी काही स्थळ पाहून मग थोडी विश्रांती घेतली. आणि नंतर अमेरिकेच्या प्रवासाच्या तयारीला लागलो. नागपूरहून निघताना इंग्लंड-हून अमेरिकेला जायच अस थोडफार मनान निश्चित केलेल होतच. त्यामुळे पुन्हा अमेरिकेचा व्हिसा मिळविण्याची खटपट रोज वेगवेगळ्या प्रवासी कंपनीच्या ऑफिसात जाणं-त्यांचेकडून साहित्य व आवश्यक माहिती घेण सुरू केल. तो प्रवासाचा खास मोसम-सीझन असल्यान अशा सगळ्या ऑफिसातून रोज गर्दीच आढळली तरीही नेट सोडला नाही 'थॉमस कुक' या प्रसिद्ध कंपनीत गेलो अद्यावत असलेल्या या ऑफि-सात दोन तीन वेळा जाऊनही आमच्या रेजेच्या वेळात बसणारी योग्य अशी एकही ट्रीप जमेना-सगळ्या तारखा पूर्ण भरलेल्या आगाऊ तीन तीन महिने रिझर्वेशनस् झालेली कळल्यावर निराश झालो. पण पुन्हा इतर कुठल्या नावाजलेल्या कंपनीचा शोध घेतला तर तिथली मदतनीस स्वभा-वानें बरीच बोलकी उत्साही व खरोखरीची मदतनीस निघाली W. H. Smith च्या टूरमध्ये तिने आमची व्यवस्थित सोय जमवून दिली. चला अमेरिकेला जायला मिळणार हे निश्चित झाले-प्रश्न होता व्हिसा मिळ-ण्याचा स्वित्झरलंडचा व्हिसा मोठ्या मुष्किलीनें मिळाला पण मला अगोदर अमेरिकेला जायची इच्छा होती. अमेरिकन एम्बसीच्या ऑफीसात व्हिसाकरता गेलो तर व्हिसाकरिता लाईन लागलेली-इकडे सगळ काम कर-

रांगेत लाइनमध्ये उभे राहिलो-सकाळी ८ (आठ तिकडचे) पासून तर एक वाजेपर्यंत त्या हॉलमधली गर्दी कमी होईना. काय करावे समजेना अखेर दुपारचा लंच टाईम झाला. ऑफीसर मंडळी लंच करिता निघ-ण्याच्या तयारीला लागली हॉलमधील मंडळीही हळुहळु पांगु लागली अमेरिकेचा व्हिसा बहुतेकांना मिळाला नव्हता-थांबण्यात अर्थ नाही म्हणून आपोआप गर्दी ओसरली. आमचा नंबर लाईनमध्ये शेवटचा होता उगाचच जाताजाता शेवटचा प्रयत्न करावा म्हणून सफाईदार इंग्रजी बोलून आम्ही अमेरिकेचा व्हिसा मागितला-तर चमत्कार झाला. आमच्या व्हिसाच्या पुस्तकावर तिथल्या ऑफिसरने एकदम १९८८ पर्यंतचा शिक्का मारला व पाच वर्षांचा व्हिसा दिला आम्हाला खूप आनंद झाला. त्याचे आभार मानून आम्ही घरी परतलो व अमेरिकेच्या डब्ल्यु. एच् स्मिथच्या टूरच्या तयारीला लागलो. आवश्यक सामान (अमेरि-केला दोन बॅगा प्रत्येकी) व आवश्यक सूचना घेऊन लंडनच्या हिथ्रोवि-रून आमचे विमान जे उडाले ते एकदम न्ययॉर्कला.

—००—

# पॅनअॅमचा अनुभव

अमेरिकेच्या प्रसिद्ध पॅन अॅम विमानात मी प्रथमच बसत होते. ब्रिटीश एअरवेजच्या सर्वच सोयी इथे होत्याच पण शिवाय अधिक आपुलकी व मोकळेपणा प्रवाशाची जातीने सेवा करणे वगैरे गोष्टी अनुभवाला आल्या आमच्या विमानाने लंडनपासून न्युयॉर्कपर्यंत सातत्याने मध्ये जराही न थाबता प्रवास केला दोन जेवणी (lunch) तीन खाणी (Breakfasts) असा हा प्रवास मोठा सुखद झाला वाटेत सगळीकडून समुद्रच असल्याने विमान कुठेही थावत नाही-प्रसिद्ध पॅसिफिक महासागरावरून (आजपर्यंत जो भुगोलातच पाठ केला व ऐकला होता) आमचे पॅन अॅम ऐटबाजपणे उडत होते ४५०० मैल उचीवरून आपण आता प्रवास करतो आहोत हे एअरहोस्टेसने कितीही गोड आवाजात सागितले तरी तो आकडा ऐकून पोटात गोळाच आला-आणि डोळे गपकन मिटून घेतले. अखेर ज्याची नागपूरपासून वाट व स्वप्ने पाहात होते ते न्युयॉर्क आले. आणि अफाट असणारा न्युयॉर्कचा तो ' केनेडी एअरपोर्ट ' पाहून त्वरित अमेरिकेच्या भव्यतेची पावती मिळाली. इथून अमेरिकेच्या भव्यतेची सुरूवात झाली-मनाने नोद केली आणि मग पुढे सातत्याने प्रत्येक ठिकाणी प्रत्येक बाबतीत इग्लंड व अमेरिका याची तुलना मनात सुरूच राहिली एकूण अमेरिकेचे सर्वच काम भव्य, दिव्य आहे-ऐश्वर्य, झगझगाट, आधुनिकता धाडस अशा अनेक गोष्टीत अमेरिका अग्रेसर आहे हे जाणवले

—००—

# केनेडी एअर पोर्ट

न्युयॉर्कचा एअरपोर्ट फारच मोठा आहे असंख्य विमाने उभी होती. आणि तरीही प्रत्येक क्षणाला एकएक विमान आकाशात झेप घेत होते. पतंगाप्रमाणे आकाशात एकाचवेळी विमानाची गर्दी दिसत होती

या केनेडी विमानतळावर नवख्या व एकट्या माणसाला सगळ्या गोष्टी एकदम लक्षात येणे कठीण आहे इतका हा विमानतळ मोठा आहे कुठून बाहेर पडायचे सामान कुठे मिळणार-कोणत्या बसने कुठे कसे पोचायचे सगळेच नवीन होते-मनातल्या मनात थोडे घाबरल्यासारखे झाले पण अजिबात चेहऱ्यावर दिसू न देता (इंग्लंडच्या वास्तव्यात सवय झाल्याने) सराईताप्रमाणे निघालो-सर्व व्यवस्थित जमले आमच्या टूरची व्यवस्था वॉशिंगटन पासून होणार होती त्यामुळे लंडन ते न्यूयॉर्क व न्युयॉर्कमधील वास्तव्य हे सगळे आम्हाला आमच्याच हुषारीने सभाळायचे होते. चार दिवसाच्या अमेरिकेच्या वास्तव्यानंतर न्युयॉर्कहून आमची ही टूर आम्हाला ताब्यात घेणार होती मग मात्र सगळी व्यवस्था (भोजन, निवास, प्रवासभेटी) कंपनीकडून होणार होती. आमची काळजी चार दिवसानंतर संपणारच होती त्या चार दिवसात, नागपूरहून प्रथमच अमेरिकेच्या भव्य न्युयॉर्क शहरी पाय ठेवल्यामुळे जरा दबल्या सारखे वाटणे स्वाभाविक होते पण अनुभवाने एक जाणवले ते असे, आपला पासपोर्ट, व्हिसा व एक्सचेंज हे सांभाळले आणि जागरूक सावधानतेने वागलो तर जगाच्या कुठल्याही प्रवासाला एकटे जाणेही कठीण नाही. मात्र आवश्यकता आहे ती जागरूक राहण्याची इथे कुणी कुणाचे सामान चोरीत नाही (सहसा) सगळे सामान व्यवस्थित तुमचे तुम्हाला मिळते-क्वचित अपवाद सोडून द्या. मात्र परदेश प्रवासाचे सगळे सोपस्कार कागदपत्रे, वेषभूषा, पैशाची सोय-भाषेवर प्रभुत्व आणि थोडेसे हुषारीने वागणे हे सभाळणे आवश्यक ठरते.

--००--

# न्युयॉर्कदर्शन

लंडनहून अमेरिकेला निघताना आम्हाला मित्रमंडळी, आप्तमंडळी सगळ्यांनी बऱ्याच धोक्याच्या सूचना दिल्या होत्या निग्रोंच्या बसमधे बसू नका टॅक्सीत तर मुळीच बसू नका रात्री एकटे बाहेर हिंडू नका वगैरे-अर्थात हे सगळे आपलेपणातून सांगितले होते हे खरे-पण प्रत्यक्षात आम्हाला अमेरिकेन निग्रो बस ड्रायव्हरने मदत केली आम्ही परदेशचे प्रवासी आहोत-अमेरिका पाहायला आलो आहोत, नवखे आहोत हे ओळखून आमच्या निवासस्थानी-त्या पंचतारांकित 'रूझवेल्ट' हॉटेलमध्ये मॅनहटन वस्तीत, ४५ व्या रस्त्यावर त्याने बस उभी केली-एका माणसाला बरोबर देऊन हॉटेलपर्यंत पोचवले-हे सगळे कसे विसरता येईल !

न्युयॉर्केला पंचतारांकित रूझवेल्ट हॉटेलमध्ये आमचा मुक्काम चार दिवस होता-स्वर्गीय सुखाच्या सगळ्याच सोयी अमेरिकेत सहज उपलब्ध. त्यातही हे पंचतारांकित हॉटेल-तेव्हा या सुखसाहळ्याचा पूर पाहिला आणि स्मरणात राहिला तो सगळा हॉटेलचा इंतजाम

आम्ही चौतिसाव्या मजल्यावर राहणार हे कळताच आश्चर्ययुक्त भीती वाटली, पण अमेरिकेत मजल्यांना तोटा नाही इथल्या एक एक गगनचुंबी (skykrepers) इमारती पाहिल्या म्हणजे डोळेच फिरतात. मजल्यावर मजले चढविण्याची चढाओढ लागलेली दिसते आमच्या हॉटेलसमोरच 'पॅन अॅम' ची ९४ मजली इमारत होती. वेड्यासारखी तोंड उघडं टाकून मी क्षणभर बघतच राहिले. खालून वर इमारतीची उंची अजमावताना मानच मोडायची इतक्या उंच इमारतींचे आम्ही आमच्या कॅमेराने फोटोही घेतले अशा उंचच उंच-सुळक्या सारख्या, उभ्याउभ्या आकाशात पोचलेल्या अनेक इमारती इथल्या वास्तव्यात दिसल्या, अमेरिकेचे ते वैशिष्ट्यच आहे. इंग्लंडमध्ये अशा इमारती एकूण दुर्मिळच-अपवादानेच आढळतात. बसकी-बुटकी बैठी आणि टुमदार लाल विटांची लाकडी काटकोनातली

रेखीव घरे हे इंग्लंडचे वैशिष्टय दिसले तर कमी जागेत जास्तीत जास्त मजले वर चढविणे हे अमेरिकेतच आढळले तसेच या उच इमारती सगळ्या सुखसोयींनी (वरपर्यंत पाणी, वीज, विजेचे पाळणे) परिपूर्ण आहेत. (नाहीतर नागपूरला आमच्या तिसऱ्या मजल्यावर पाणीच चढत नाही ही सदैव ओरड आठवली )

—००—

# अमेरिकेचे प्रथम दर्शन

शेवटी चौतिसाव्या मजल्यावरच्या आमच्या खोलीच्या किल्ल्या घेऊन आम्ही लिफ्टने वर आलो खोली उघडली तर आम्ही वर पोचायच्या आधीच खोलीत आमचे सामान आणून व्यवस्थित लावुन ठेवलेले आढळले अमेरिकेची स्वागतातली ही तत्परता पाहून आश्चर्य आणि कौतुक वाटले-एकूण साहेबावरही ताण केलेली दिसली

या पचतारांकित हॉटेलात भोजन. निवासाबरोबरच पोस्ट ऑफीस, सेफ डिपॉझिट लॉकरर्स, हेअर कटिंग सलून, ब्युटी पार्लर, नृत्याचा हॉल, व्याख्याने, भाषण या करिता हॉल-कॉफी हाऊस, दुर्मिळ व देखण्या देशोदेशींच्या वस्तुचे दुकान अशी अनेक प्रकारची सोय आढळते. तसेच पोहण्याकरिता अतिशय सुंदर स्वच्छ निळ्याशार पाण्याचे तलाव आढळतात आणि मुख्य म्हणजे सर्वत्र मऊशार, ऊंची, खोलवर पाय रूतणारा उनी गालिचा (Woolen Carpets) आथरलेला व सगळीकडे स्वच्छता तत्पर निग्रो सेवक तुमच्या तैनातीला प्रत्येक खोलीत छत्तीस चॅनेलचा टि. व्ही (मी सगळी बटने फिरवून पाहिली) फ्रीज, टेलिफोन कपड्याकरिता वॉर्डरोब, त्यात हँगर, मोरीत गरम-थंड पाण्याचे नळ. बेसीनस् आणि आघोळीचे टब-टॉवेल्स वगैरे सुख कसं घ्यावं हे इथे शिकावं इतके विविध प्रकार होते. प्रवेशद्वाराजवळ रंगीबेरंगी सुंदर फुलांच्या पितळी मोठमोठ्या कुंड्या. ज्या पितळेत आपला चेहरा दिसावा इतक्या लकाकणाऱ्या, रोज फुलांची रचना करणारा स्वतंत्र स्पेशल शिक्षण

घेतलेला कारागीर सकाळी येऊन तो आपल्या कामात मग्न असे रोजची बदलणारी कुंड्याची फुलाची फेररचना पाहून मन प्रसन्न होई अमेरिकेत प्रत्येकच गोष्टीत स्पेशलायझेशन आढळते आणि स्पर्धेचे निकोप वातावरण आढळते. जीवनात आनंद उपभोगणे आलेला प्रत्येक क्षण उपभोगणे, त्याचा पूर्ण उपयोग करून घेणे मग तो क्षण साहसाचा असला तरी! आणि जीवनात प्रयत्नपूर्वक पुढेपुढे सतत जात राहणे हे अमेरिकेत दिसले सगळीकडे तसेच वातावरण आहे मग ते न्युयॉर्क असो की वॉशिंग्टन असो. सतत पाऊल पुढे टाकण्याची धडपड

न्युयॉर्क पाहायला बाहेर पडलो तर न्युयॉर्कचा प्रसिद्ध 'टाईम स्क्वेअर' (Square) चौक पाहिला रहदारीने अतिशय गजबजलेला, गर्दीलाही शिस्त होती. पण ती इंग्लंड इतकी कडक इस्त्रीची शिस्त वाटली नाही खळखळणारं प्रसन्न मोकळं हसु सर्वत्र आढळलं निळयाशार डोळयाचे उंचच उंच गोऱ्यालाल रंगाचे स्त्रीपुरूष मुलं सुंदर उंची कपडयात सर्वत्र वावरताना दिसले एकूण सुख त्याच्या चेहऱ्यावरच दिसलं दृष्टी फाटून जाईल अशी न्युयॉर्कची एकूण मांडणी, ठेवण तर वॉशिंग्टन साधे पण नीटस,ठेंगणे ठुसके पण उबदार वाटले,एक अवखळ तर दुसरे काहीसे गंभीर एकूण प्रत्येक शहराला आपला असा एक चेहरा असतो ना तसे वॉशिंग्टन मला आवडले ही अमेरिकेची एके काळची राजधानी एकेकाळची म्हणण्याचे कारण न्युयॉर्क तयार झाले आणि झपाट्याने वाढत गेले. त्या झपाट्यात वॉशिंग्टन जणु झाकले गेले आहे. म्हणूनच आज ते राजधानीचे शहर वाटतच नाही 'व्हाईट हाऊस' वॉशिंग्टन मेमोरिअल, आर्ट गॅलरी या किंवा अशा प्रसिद्ध इमारती तशा भव्यच आहेत पण त्याचा विस्तार क्षितीजसमांतर आहे त्यामुळे डोळे फाटत नाहीत तर निवतात-जागेवर येतात व जागेवर राहतात वॉशिंग्टनला इमारतींची भीती वाटत नाही!

वॉशिंग्टनचा उल्लेख सर्वत्र वॉशिंग्टन डी सी असाच केला जातो. याचं कारण घडलं अमेरिकेतल्या एका वेळच्या दोन प्रसिद्ध नेत्याच्या चर्चेतून राजधानी, फेडरलराजधानी म्हणून वॉशिंग्टनला ठेवण्याचेठरवल्यानंतर असूया,मतभेद अशा अनेक तत्कालिक कारणानी ही गोष्ट अशक्य झाली. आणि मुक्त संचार, मनमोकळं बोलणं,वागणं अमेरिकन माणसाच

वैशिष्टय जाणवलं अनुभवालाही आलं तसं पाहिलं तर अमेरिकेला परंपरा नाही कुणाच्या पावलावर पाऊल टाकायचं कसलंच बंधन नाही. आणि जर नको असलेलं बंधन पडलंच तर अमेरिकन माणूस स्वातंत्र्य-प्रेमी, व्यक्तिवादी, व्यक्तिस्वातंत्र्याचा भोक्ता असल्याने ही अनावश्यक बंधनं मुक्ततेच्या हव्यासामुळे झुगारून देईल इथे कुणी कुणाचा बांध-लेला नाही 'टाईम स्क्वेअर' चौक हा इंग्लंडच्या पिकॅडली सर्कस प्रमाणे गजबजलेला रहदारीचा चौक हरतऱ्हेची दुकानं, खरेदी या ठिकाणी होत असते म्हणूनच रंगीबेरंगी पोषाखातले उत्साही अमेरिकन तरूण, तरूणी मुलं यांनी चौक गजबजलेला संध्याकाळी तर मुंग्याप्रमाणे इथे माण-साची गर्दी आढळते विद्युतदीपांनी मोठमोठ्या सरकत्या हलणाऱ्या, विझणाऱ्या दिव्यांची रोषणाई मन मोहून टाकते. जाहिरातबाजीचा उच्चांक अमेरिकेने गाठला आहे जाहिरात करावी तर अमेरिकेनेच. अत्याधुनिकता, ऐश्वर्य, साहस, वैभव सगळ्याच गोष्टीत हे राष्ट्र आपल्या गुणांनी पुढेपुढेच जातय

—००—

## टाईम स्क्वेअर

टाईम स्क्वेअर ह्याच नावाने इथे रेल्वेचं स्टेशन आहे. मोठं भव्य असं हे स्टेशन दिसलं. भुयारी रेल्वे ज्याला इकडे 'टनेल' असं म्हणतात त्याचं रेखीव जाळंच पसरलं आहे अमेरिकेत. या टाईम स्क्वेअर वरून अनेक गाड्या जा ये करतात. सुटत असतात. इंग्लंडला जसं 'व्हिक्टोरिया' रेल्वे स्टेशन तसं इकडलं टाईम स्क्वेअर वाटलं अर्थात हे अधिक गजबजलेलं, भव्य, मोठं

न्युयॉर्कला खूपच पाहण्याजोग्या गोष्टी आहेत. तशी न्युयॉर्क दर्शन बसही प्रवाशांना प्रेक्षणीय स्थळे दाखवून आणते. पण या दर्शनात वेळ कमी. ठिकाणं खूप त्यामुळं माहिती फार गडबडीने सांगितली जाते. हातात सर्व माहितीची पत्रके, सुंदर कागदावरची रंगीत चित्रे, त्या त्या ठिकाणाबद्दल थोडक्यात माहिती पुरवतात.

अशा ठिकाणाची यादीच करायची तर खूपच लाबलचक होईल. पण तरीही, मॅनहटन स्कायलाईन, अमेरिकन स्वातन्त्र्य देवतेचा पुतळा (लिबर्टी स्टॅच्यु)– 'ब्रुकलिन ब्रीज', 'रॉकफेलर सेंटर' (ज्याच्या नावे स्कॉलरशिप आहे) याकी स्टेडियम आणि मुख्य म्हणजे 'एपायर स्टेट बिल्डिग'– तसे पूल तर अनेक आहेत जसे जॉर्ज वॉशिग्टन ब्रीज, वुईल्यमसवर्ग ब्रीज, अमेरिकेत ब्रीजेस, पार्कस्, फोर्टस्, मॉन्युमेंटस्, युनि-व्हर्सिटीज, स्टॅच्युज (पुतळे) उंच इमारती (युनायटेड नेशन बिल्डिग) स्टेडियमस् सेंटरर्स आर्ट गॅलरीज आणि आयलडस् (बेटे) व झू (प्राणी सग्रहालय) किती म्हणून पाहणार ! आणि किती डोळयात साठवलेलं वर्णन करणार ! गणतीच नाही

## खास अमेरिकन टच

पण एक मात्र अनुभवाला आल की अमेरिकेतल कुठलही एक मोठं शहर पाहिल (न्युयॉर्क, वॉशिग्टन, सनफ्रासिको ला व्हेगास कोणतही) की बाकी प्रत्येक नतर पाहिलेल शहर तसच वाटत सगळया गोष्टी तशाच त्याच त्याच. इथे शहराच प्लॅनिग मात्र अतिशय व्यवस्थित व वाखाणण्याजोग आहे नुसत हातात नकाशा घेऊन नवख्या माणसालाही एकट सगळीकडे फिरता येईल नकाशा हाच तुमचा सोबती व मार्गदर्शक इतका तोही व्यवस्थित बनविलेला तुमच्याकरिता सगळी सुख हात जोडून उभी असतात अमेरिकेत. फक्त तुमच्याजवळ पैसे तयार हवेत

अमेरिकेतल्या सगळया प्रेक्षणीय स्थळाबद्दल लिहीण जागेअभावी जमणार नाही तरीपण काही महत्वाच्या स्थळाचा उल्लेख करायलाच हवा. जस एम्पायर स्टेट बिल्डीग ही अमेरिकेतली जगप्रसिद्ध उच इमारत इथे ८६ व्या मजल्यावर व १०२ व्या मजल्यावर ऑबझरवेटरी आहे सतत प्रवासी मुद्दाम ही इमारत, तिची उची, मजले, बाधणी पाहायला दूरून दूरून येतच असतात सकाळी साडे नऊ पासून तर मध्यरात्रीपर्यंत ही ये जा चालूच राहते ही इमारत म्हणजे जगातले एक आश्चर्य वाटते प्रवासी कपन्या अनेक आहेत त्यामुळे येणारे प्रवासीही अनेक सतत सर्व प्रेक्षणीय स्थळापाशी गर्दीचा लोढा येतच राहतो –००–

# न्युयॉर्क न्युयॉर्क....

NY असा न्युयॉर्कचा थोडक्यात उल्लेख सर्वत्र आढळतो अमेरिकेत एकाच वेळी तिन्ही ठिकाणी रहदारी चाललेली पाहून थक्क व्हायला झाल.आकाशात मिनिटा मिनिटाला विमान झेपावत होती-डाव्या उजव्या अंगाला रस्त्यावरून मोटारीची रांगच रांग धावत होती तर त्याचवेळी दूर अंतरावर जहाजातून माणसे प्रवास करीत होती जमीन, पाणी व आकाश अशा तीन्ही ठिकाणी एकाच वेळी माणसाची रहदारी व प्रवास पाहून अमेरिकेच्या विज्ञानाच्या प्रगतीचे कौतुक वाटल हा सगळा प्रवास कमी पडला म्हणुनच की काय आता अमेरिका चंद्र सूर्याला काबीज करायला तिथे वस्ती करायला प्रयत्नाला लागलीय–रोज नव धाडस, प्रयत्न पुढे पाऊल चाललय इंग्लंडच्या प्रवासात अनेक किल्ले, पुतळे, म्युझियम्स व चर्चेस आणि डॉलफीन शो व झू पाहिल्याने अमेरिकेत पुन्हा तोच प्रकार पाहण्याल स्वारस्य वाटल नाही हे खर आकाशाला भिडणाऱ्या उंचउंच इमारती भव्य केनडी एअरपोर्ट आणि हातात खाणं (हॅम्बरगर) घेऊन हसत खेळत दिवसरात्र फिरणारे अमेरिकन तरूण तरूणी याना मनात साठवून आम्ही न्युयॉर्क सोडल अमेरिकेचे प्रथमदर्शन आम्हाला न्युयॉर्क मध्ये घडल्याने ते मनावर बिंबल ती भव्यता, ती दिव्यता, तो मोकळेपणा, प्रसन्नपणा, उत्साह, श्रीमंती, ऐश्वर्य आणि इतर अनेक गोष्टी मनात राहिल्या.

—००—

## धीरगंभीर खानदानी वॉशिंग्टन

पण न्युयॉर्कहून आम्ही वॉशिंग्टनला आलो तर सगळाच ट्रान्सफ-रसीन झाल्यासारखा वाटला त्या गगनचुंबी इमारती नाहीत-ती गडबड, धादल, गर्दी, हसण, सार बदलल बैठ, शात, सोज्वळ तरीही खानदानी व शानदार अस वॉशिंग्टनच दर्शन आम्हाला घडल न्युयॉर्क म्हणजे आपली मुबईच वाटली-पण वॉशिंग्टनला मात्र आदब जाणवली

इ. सन १७९० नतर अधिक अधिकच कठीण जाऊ लागले म्हणूनच या वादावादीत अखेर पोटोमॅक नदीच्या आसपासचा दहा एकराचा परिसर राजधानीकरता निवडला गेला व त्याला ' डिस्ट्रीक्ट कोलबिया असे म्हटले गेले तेव्हापासून वॉशिग्टनचा उल्लेख वॉशिग्टन डी. सी. असाच आजतगायात केला जात आहे आज वॉशिग्टन डी सी चा परिसर जवळ जवळ ७० चौरस मैलाचा असून यात मेरीलँड व्हर्जिनी-याचा भाग येतो लोकसख्या जवळजवळ दोन कोटी आहे अशी ही वॉशिग्टन राजधानीची कुळकथा आढळते-वॉशिग्टन डी सी

—००—

## व्हाईट हाऊस

वॉशिग्टनमध्ये पाहण्याजोग्या काही प्रसिद्ध इमारती,ज्यात ' व्हाईट हाऊस ' वॉशिग्टन मेमोरियल,

' लिकन मेमोरिअल ' ' केनेडी ग्रेव्ह ' (आर्लींग्टन सेमीटरी) आर्ट गॅलरी, झू--वगैरे.

व्हाईट हाऊस नावाप्रमाणे पाढरी शुभ्र इमारत जी राष्ट्राध्यक्षाचे निवासस्थान म्हणून ओळखली जाते पाढऱ्या स्वच्छ रगातल्या सँडस्टो-नची ही इमारत भव्य पसरलेली व लक्षवेधी आहे या ' व्हाईट हाऊसची बाधणी इटालियन काळातली इटालियन पद्धतीची आहे

व्हाईट हाऊसच्या दक्षिणेकडे वॉशिंग्टनचे मेमोरिअल आहे. जॉर्ज वॉशिंग्टन हा अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष जगात सर्वांत अधिक ऊंचच उंच असे बांधकाम केलेले हे एक स्मारक आहे हा सुळक्या प्रमाणे उंचचउंच असा एक पीलर आहे याला ८९८ पायऱ्या असून जवळ-पासचा ४५ मैलाचा भव्य परिसर शुभ्र निरभ्र वातावरणात वरून पहाता येतो

—oo—

## लिंकन मेमोरिअल

तसेच अमेरिकेचा १६ वा अध्यक्ष आब्राहाम लिंकन यांचेही स्मारक देखणे आहे ग्रीकदेवालयाच्या धाटणीवर ३६ मोठे रेखीव खांब असलेले हे स्मारक असून आत लिंकनचा पुतळा आहे. या राष्ट्राध्यक्षाचा त्याच्या वयाच्या ५६ व्या वर्षी वॉशिंग्टन थिएटर मध्ये खून करण्यात आला प्रत्येक वर्षाची एक पायरी या हिशोबाने जणु आत ५६ पायऱ्या आहेत स्मारकाला पांढऱ्या संगमरमरी पायऱ्या भव्यता आणतात. वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी ची इमारत अगदी लहान व साधी वाटली

—oo—

## राष्ट्राध्यक्ष केनेडींची समाधी

आर्लिंग्टन नॅशनल सिमेटरी इथे ही राष्ट्राध्यक्ष जॉन एफ् केनेडी यांची समाधी आहे मृत्युपूर्वी त्यांनी प्रदर्शित केलेल्या इच्छेनुसार ही समाधी अत्यंत साधी बांधली आहे दगडी चौकोन, त्यात कोवळ्या गवताची चौफेर हिरवळ व अष्टौप्रहर तेवत राहणारी अखंड ज्योत हें या स्मारकाचे विशेष वाटले. अतिशय शांत, साधेपणाने बांधलेल्या या समाधीत अमेरिकेचा सदासतेज, हसरा, उत्साही ३५ वा राष्ट्राध्यक्ष विश्रांती घेत आहे.

जवळच वॉशिंग्टनला जर्मन योद्धाचा सामूहिक पुतळा लक्ष वेधून घेतो. आणि तिथेच असलेला जगप्रसिद्ध वैज्ञानिक, संशोधक आईनस्टाईन याचाही पुतळा लक्षात राहतो

आम्ही गेलो त्या दिवशी वॉशिंग्टनच्या व्हाईट हाऊस जवळील रस्त्यावर गर्दी दिसली आम्हाला वाटले काहीतरी गडबड झाली असेल. तर रस्त्यावर हॉलिवूडचे सितारे सिनेमाचे शूटिंग करीत होते सिताऱ्यांना पाहायला ही गर्दी होती आपल्या देशातल्या प्रमाणेच इथलेही लोक सितारेप्रेमी आहेत पण पृथ्वीवरच्या सिताऱ्याप्रमाणेच अवकाशातल्या सिताऱ्यांचेही त्यांना आकर्षण आहे हा फरक आहे परदेशी पाहुणे (आम्ही नाही हं) यायचे असल्याने त्या दिवशी 'व्हाईट हाऊस' बंद होते पांढरी शुभ्र इमारत मात्र लक्षात राहिली व्हाईट हाऊसपासून जवळच इथे एक लेडिज क्लब दिसला अमेरिका हे स्त्रीमुक्तीचे केंद्र आहे. म्हणून इथल्या अमेरिकन स्त्रिया, त्यांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार ऐकावे म्हणून मी मुद्दाम त्या लेडिज क्लब मध्ये गेले तर सर्व मुक्त स्त्रिया जवळच असलेल्या पुरूषांच्या कुंवात गेल्याचे कळले. (स्त्री मुक्तीची धावपळ) आणि म्हणूनच त्यांचा लेडिज क्लब बंद होता. मला आपले उगाचच नागपुरचे दर मंगळवारी व शुक्रवारी उघडे असणारे भगिनीमंडळ आठवले आणि तिथला गोड चिवचिवाट (कलकलाट नव्हे हं) आठवला आणि सदैव हसऱ्या चेहऱ्याने स्वागत करणाऱ्या माझ्या नागपूरकर भगिनीही आठवल्या

—००—

# लिबर्टी बेल

'लिबर्टी बेल' ही एक भव्य अशी घटा आहे.अतिभव्य व जड अशी-ही घटा हालणे व हालवणे कठीण आहे त्यावर मजकूर कोरलेला आढळला. नतर आम्ही केनेडी 'स्पेस सेंटरला' गेलो चद्रावर माणूस जिथून पाठवला गेला ते हे 'स्पेस सेंटर' व तिथे चद्रयानही होते. इथला सगळा परिसर गावापासून दूर, गावाबाहेर व राखीव एरिया म्हणून ओळखला जातो. सगळ्या गोष्टीची इथे प्रथम तपासणी केली जाते-मग प्रवेश मिळतो.

या सेंटरला येताच वाळुचा नवाच प्रकार दिसतो बारिक आणि नरम अशा वाळुवरुन मोटरी सहज धाऊ शकतात एरव्ही वाळुवरुन मोटार चालविणे अशक्य होते.

—७०—

# केनेडी स्पेस सेंटर

केनेडी स्पेस सेंटरचा परिसर भव्य आहे रस्ता झाडीझाडीतून आत गेलेला. या झाडीतून दोन हजार प्रकारचे पक्षी राहतात. आज अनेक वर्षापासून त्याची तिथे झाडीत वस्ती आहे जवळच्या पाण्यातून क्वचित मगरी आणि सुसरी आहेत त्या एखादेवेळी चाहूल घेत सावधपणे पाण्याबाहेर येतात इथले वातावरण पावसाळी आणि थडीही तशी बरीच वाटली यापासून बचाव करण्याकरिता खास स्पेसमध्ये जाण्यास लागणारे मुद्दाम बनविलेले टी शर्ट तसेच थर्मो ब्लँकेटस् विक्रीला ठेवलेले दिसले. स्पेस सेटरला सतत प्रयोग चाललेले असतात. रॉकेटच्या आवाजाने इथले पक्षी जीवन सतत दडपलेले आहे जवळच वाहणारी कोलंबिया नदी समुद्रा-

प्रमाणे अफाट आहे चंद्रयानासंबंधी सर्व माहिती प्रवाशांना सांगितली जाते. मानवाने चंद्रावर उड्डाण केले. व यशस्वी स्वारी करून तो परतला. मानवाचा अवकाशातला हा पहिला घवघवीत विजय आहे. या विजयाची रोमांचकारी माहिती व रोमांचक दृष्य चित्रे, छाया चित्रे इथे पाहायला मिळतात. अत्यंत शांत व गंभीर वातावरणात आल्याप्रमाणे मनावर नकळत दडपण येते गुडूप अंधारात विजेरीच्या सहाय्याने ही मानवाच्या चंद्र-विजयाची दृष्ये दाखवली जातात तसेच मानवाला झालेले पृथ्वीचे दर्शन एका वेगळ्याच विश्वात प्रवाशांना घेऊन जाते

—००—

## चंद्रावर माणूस

चंद्रावरील जमीन या जमिनीचा खडबडीतपणा, उंच सखलपणा, चंद्रपृष्ठावरील खाच खळगे, खड्डे, दऱ्या, तिथल्या जमिनीचा, मातीचा विशिष्ठ रंग-सारेच त्या वातावरणात विलक्षण वाटते ही छाया चित्रे इतकी बोलकी आहेत स्पेस सेंटरमध्ये काचेच्या मोठमोठ्या [illegible] या साऱ्याचे अदभूत दर्शन घडते तिथली मंडळी ते कामात गढलेले [illegible], त्यांच्या हालचाली त्यांच्या चेहऱ्यावरील भाव यातून एक वातावरण निर्माण होत राहते-ही वातावरण निर्मितीही विलक्षणच आपल्या समोर आताच हे सारे घडते आहे असे वाटायला लावणारे पहिली चंद्रस्वारी आपल्यासमोरच घडले आहे असे जाणवते त्या मानवाचे यानात चढून बसणे-वर उंच जाणे तिथुन अलगद चंद्रावर उतरणे-चाचपणे-विजयी मुद्रेने, आत्मविश्वासाने राष्ट्रध्वज रोवणे-सारे इथे बोलके केले आहे जिवंत केले आहे केनेडी स्पेस सेंटरला जाऊन आल्यावर पाहूनच मन काही काळ स्तब्ध होते विज्ञानाच्या साहाय्याने मानवाने निसर्गावर-चंद्रावर मिळवलेला हा विजय मनाला थक्क करून सोडतो.

'फिलाडेल्फीया' 'येथे भारतीय मंडळी भेटली. एकदम चमत्कार झाल्यासारखे वाटले आर्ट गॅलरीच्या पाचव्या मजल्यावर भारतीय पद्धतीचे (वरण भात, पोळी भाजी, बुंदीलाडू) जेवण मिळाले. हैद्राबादहून

आलेल्या दोघा भावंडानी (बहीण भाऊ) हे चालविलेलें उपहारगृह आहे. दरवाजावरील पडद्यावरचा श्री शंकराचा नंदी तुमच स्वागत करतो-मन भरून पावते परदेशात या अशा सगळ्या गोष्टीचे विशेषच कौतुक वाटते

फिलाडेल्फीया येथील इमारतीतील फर्निचर हे अठराव्या शतकातले आहे बेंजामिन फ्रॅंकलिनची आठवण करून देणारे हे शहर इथला इंडिपेण्डस हॉल आजवर होऊन गेलेल्या राष्ट्राध्यक्षाचे ओळीने लावलेले पुतळे असा सगळा बाज आहे

बाल्टीमोर ते वॉशिंग्टन हा प्रवास लांबच लांब बोगद्यातून आहे अमेरिकेत भुयारी रेल्वे प्रमाणे भुयारी रहदारीही आढळते लांबचलांब अशा बोगद्यातून विद्युत झोत खेळविलेले असतात आणि मोटारीची रांगच रांग व्यवस्थित धावत असते-त्याच वेळी या टनेलच्या (बोगद्याच्या) वरही व्यवस्थित इतर रहदारी चालू असते

—००—

# मोटरीचे ग्रेव्हयार्ड

पाश्चात्य देशात नाविन्याचे वेड पराकोटीला गेलेलें दिसते इतके की कोणतीही गोष्ट जुनी झाली, थोडीशी बिघडली, खराब झाली, तुटफूट झाली की लगेच फेकून द्यायची. त्याची दुरूस्ती (repairs) अजिबात करायची नाही-मग ती गोष्ट कितीही महागाईची असू दे-फेकून द्यायची व नवीन घ्यायची—फ्रीज, टी व्ही. मोटर गाडी बिघडली, पोचा आला की दे फेकून (माझी चप्पल परदेश प्रवासात तुटली व पर्संचा पट्टाही तुटला तर मोचीकाम कुठे आढळला नाही नवीन घेणे भाग पडले.) अशा फेकून दिलेल्या मोटरीचा रचलेला एके ठिकाणी ढीग दिसला बाल्टीमोरला आम्ही प्रवास करीत असताना असा दुरून सुंदर दिसणाऱ्या नव्या वाटणाऱ्या मोटारीचा ढीग पडला होता-त्याला इकडे grave yard

of Motor cars 'मोटारीचे स्मशानघर' असे म्हणतात-अमेरिकेचे नावि-
न्याचे वेड व ते जोपासणारे वैभव, श्रीमती व ऐश्वर्य इथे पाहून ध्यानात
येते केवढा हा पैशाचा अपव्यय रस्त्यावर मधोमध अनेक गावातून फर्निचर
अद्यावत वस्तु, कपडे याचे ढीग विक्रीसाठी दिसत–हे असेच थोडेसे वाप-
रून, जुने झाले, कटाळा आला म्हणून लिलावाकरता फेकून दिलेले गरज-
वताला अक्कल नसते म्हणतात तेच खर-सगळेच श्रीमत तरीही एखादा
गरजवत असणारच म्हणूनच हे असे प्रकार माडून ठेवलेले

इतक्या साऱ्या अमेरिकेच्या प्रवासात मला एकदाही भिकारी
दिसला नाही-सगळेच श्रीमत जसे उत्तम पोशाखात सदैव वावरणारे
त्यामुळे इकडे श्रीमत कोण व त्यापेक्षा गरीब कोण हे कळणे कठीण आहे
घरातला गालिच्यावरील कचरा साफ करायला यत्र घेऊन (व्हॅक्युम
क्लीनर) यणारा कचरा साफ काढणारी बाई मोटारीतून येते. बेबी-
सीटर (आया, मुल साभाळणारी दाई) म्हणून काम मागायला, मुलाखत
द्यायला आलेली बाई स्वत.च्या मोटारीतून नोकरी मागायला येते-मी
तर थक्कच झाले हे सगळे पाहून वॉशिंग्टन ते बाल्टीमोर या प्रवासाचा
पूल ३६ मैल लाबीचा आहे रस्त्याचे अक्षरश जाळे विणल्याप्रमाणे
बाल्टीमोर शहर आहे (बाल्टीमोरची लढाई इतिहास आठवा) हा ३६
मैल लाबीचा भुयारी बोगदा, त्यावरचा पूल चेपलेल्या मोटारीचा खच
(Grave yard of motor cars) हे विशेष लक्षात राहिले

# सॅव्हानाबीच

त्यानतर आम्ही व्हर्जिनियाला आलो इथली तबाखु प्रसिद्ध आहे. निसर्गाने निर्माण केलेले हे बदराचे ठिकाण सोबतीला इथे पिवळा ताप व मलेरियाही आहे म्हणतात. उचच उच वृक्ष, वाळूचे रस्ते अठराव्या शतकातील धर्तीवरच अजून त्याच पद्धतीने चाललेला लाकूड कटाईचा व्यवसाय ही इथली वैशिष्ठ्ये दिसली चार्लसटन, जॉर्जिया असा फेर-फटका करीत आम्ही आलो सॅव्हॅना बीचला इथे सॅव्हाना नदी आहे खूप सुंदर बीच आहे लोखडाचे कोरीव काम केलेली घरे ते कोरीव दरवाजे. कमानी जिने हे सॅव्हानाचे खास वैशिष्ठ्य. घर उचावर उभारलेली कारण नदीपासून सरक्षण जवळच अवाढव्य पसरलेला समुद्र प्रत्येकाचे घर उच खाली उतरणारा जिना घरासमोर मऊ हिरवळ जिना मात्र रस्त्याला कडेला उतरणारा सॅव्हाना बीचवर गोदीमध्ये बाजार भरतो. अनेक सुदर-सुदर इपोर्टेड गोष्टी या बाजारात मला दिसल्या भावही जास्ती कमी करतात. इपोर्टेड वस्तुची ही बाजारपेठ जवळ मोठी रेस्टॉ-रटस् त्यात ताज्या रसरशीत खेकड्याची, झिग्याची (Promz Shrumps) रेलचेल पकडायचा, उचलायचा आणि खायचा इतका ताजा (Seafood) तसेच खास वनस्पती घालून कडक केलेली दारू (mint) मस्त बेत होता. मला कल्पना नव्हती हे नवे पेय काय आहे. एक घोट आधाशीपणाने घेतला आणि डोक्यात झिणझिण्या आल्या. मग कळल ही मिंट दारू आणि कीती वाटली तावडतोब पेय बाजूला सारल. सत्र्याचे सरबत (ज्यूस) मागवल. मग जरा वेळाने बरं वाटल इथे अनेकदा अशी फजिती होते सावधतेने खाण पिण कराव लागत समोर खास मिंट असून आम्ही लेमोनेडवाले बावळट ठरलो. झिंग येण्याकरिता ही मिंट पितात म्हणे मला आपली उगाचच पोळीभाजी (निदान शेवचिवडा-चणे कुरमुरे- काहीच कसं नाही ईकडे मिळत) आठवली

—००—

## फजिती

समुद्री चहुकडे पाणी पिण्याला थेंबही नाही अशी आमची अवस्था, पण हे अगदी सत्य होत कविकल्पना नव्हे फ्लोरिडा, ऑरलँडो हा आमच्या प्रवासाचा पुढचा टप्पा सुरू झाला फ्लोरिडा शहर हे अत्यंत देखणे शहर या शहरात येताच मनाला प्रसन्नता वाटावी अशी छानदार हवा मुलायम हिरवळ, सुंदर रूसो देखणी टापटिपीची माणस उत्साही वातावरण मला हे शहर फार आवडले फ्लोरिडाची सत्री फारच ताजी वाटली. एकूण सर्वच फळफळावळ ताजी वाटली. डिकास्टो किल्ल्यावरून तोफडागण्याचे प्रात्यक्षीक करून दाखवले ते पाहताना त्या कारागिराचे ते विशिष्ट पद्धतीचे झगे, कपडे, आभूषणे पाहून क्षणभर त्या काळात गेल्यासारखे वाटले आणि नतर आम्ही आलो ऑरलँडोला तर नृत्य नृत्य नृत्य हे शहर तर सतत नाचतच असावे असे उत्साही वातावरण जाणवले.

—००—

## डिस्को डान्स शहर ऑरलँडो

'डिस्को डान्स' शहर म्हणून ऑरलँडो शहर ओळखले जाते तिथल्या 'कंट्री म्युझिक' करिता ते विशेष प्रसिध्द आहे झणझणीतपणा हा या कंट्रीचा एकूण गुणच असावा. खाण, पिण, नाचण आणि गाण बनावण ही खास वैशिष्ठ्ये. सगळे तरूण-तरूणी उत्साहात जणु झुमत घुमत राहतात. यामुळे इथे उत्साहाचा फेस भरभरून वाहतो. सगळ्या गोष्टीत मनसोक्तपणा दिसला. इथे सर्वत्र सतत नृत्याचा जल्लोश चालु असतो नृत्यही विशिष्ट प्रकारचे असते. सहा सहा तरूण तरूणींचा

जोडया करायच्या आणि त्यानी 'कंट्री' च्या तालावर नाचत राहायच. या नृत्यात मधोमध मुख्य स्त्री (सूत्रधार) नाचत राहते. तिला 'ममा' म्हणतात ती ममा अशी तशी असून चालत नाही दिसायला अत्यंत सेक्सी (Sexy) असावी लागते तिच्याभोवती सर्व स्त्रीपुरूष जोडयानी फेर धरायचा व फेर धरीत धमाल नाचायच अगदी झींग येईस्तवर नाच चालतो मग मध्येच 'ममा' ने खास पुरुषी आवाज काढायचा. वेगात नाचाला अधिकच गती मिळते चेकाळल्याप्रमाणे सर्व नाचत राहतात. कंट्री सगीताची झिंग पकडायची आणि फेर धरायचा हा सारा प्रकारच अफलातून वाटला एकदम वेगळाच. असा नाच पाहून मग प्रेक्षक, दर्शक का थिरकु नयेत ? तर अस हे ऑरलँडोच दर्शन. तालासुरात मनाला नाचत ठेवणार या सगळयाच शहरात पाहण्याचा तशा अनेक गोष्टी आहेत. जशी स्मारक, पुतळे, झू, गार्डन, जगल (पॅरट, मकी) पण हे सगळीकडे साधारणपणे एकाच पद्धतीचे दिसले म्हणून पुनरावृत्ती होऊ नये म्हणून त्याचे वर्णन टाळणे भाग आहे. शहरातली वेगळी वैशिष्ठचे वाखाणण्याजोगी वऱ्याच वर्षापासून ज्याची ख्याती ऐकत होते, ते डिस्नेलँड पाहण्याची मला फार उत्सुकता व घाई होती. मानवी प्रतिभा, पराक्रम, मानवाची उपक्रमशीलता, उद्यमशीलता. नाविण्याची आवड शोध व हौस मानवाची जिद्द या सगळयाचा अलौकिक आविष्कार म्हणजे वॉल्ट डिस्ने यानी अमेरिकेत निर्माण केलेली प्रतिसृष्टी डिस्नेलँड.

—००—

# डिस्नेलँडचा भूलभुलैय्या

डिस्नेलँड म्हणजे एक भुलभुलैयाच कुठून सुरू झाले कुठे संपले, आपण कुठे आलो कशाचाच पत्ता लागत नाही गिरक्या खाल्ल्याप्रमाणे मन भ्रमण करू लागते डिस्नेलँडचा परिसर खूप विशाल, अवाढव्य आहे पायी फिरून पाय दुखतात पण तरीही पाऊल पुढेच पडत राहत असा भुलभुलैया डिस्नेलँड ही एक चित्तथरारक, आश्चर्यकारक स्वप्न नगरीच. पण याला स्वप्ननगरी तरी कसे म्हणायचे ? कारण सगळ प्रत्यक्ष जागेपणी समोर दिसतय ना

मानवी मनाला अद्‌भूताचे एक आदिम आकर्षण असते परिकथा वाङमयातून त्याचे विविध आविष्कार आपण वाचतो बालवयात कल्पनेने अनुभवतो. डिस्नेलँडला हे सारे आविष्कार आपण प्रत्यक्ष अनुभवतो. हे सगळे अद्‌भूत इथे जिवत होतात, जाणवतात. अधार आणि प्रकाश याच्या सरमिसळ लीलानी इथे एक वेगळेच जग उभे झाले आहे (जपान कडे असेच डिस्नेवर्ल्ड) आहे

—०○—

# नागपूरची आठवण

डिस्नेलँडला आल्यापासूनच या अदभूताला, आकर्षणाला सुरूवात होते प्रथमदर्शनी दरवाजातच एक 'मॅजिकबोट' उभी असते त्यात बसून तुम्ही समुद्रातून प्रवास करता पाण्यातून एकदम एक विदूषक उपटतो तुम्ही अवाढव्य समुद्र पाहून भांबावलेले-घाबरून दडपलेले असता विदूषक तुमच्या बोटीला साखळदडाने लोबकळत राहून तुमच मनोरजन करतो- तुम्हाला रिझवतो, हसवतो पाण्याखालच्या अधारातून तो मधेच

गडप होतो 'मॅजिक बोट' तुम्हाला डिस्नेलॅंडच्या मायाजालात आणून सोडते.

इथे आतमध्ये तिकिट लावून प्रवेश आहे तिकिटे आधीच काढून ठेवावी लागतात विलक्षण गर्दी असते पण इतकी अफाट गर्दी असूनही कुणीचेही लहान मूल हरवले आहे-चुकले आहे. आई बाबा करुन रडते आहे अशी एकदाही अनाउसमेंट कानावर आली नाही नाहीतर आमच्या नागपूरला भरणारे दरवर्षीचे दुर्गापूजा प्रदर्शन-हटकून रोज माईकवरून ऐकू येईल एकदोन मुले हरवली आहेत टॉवरपाशी यावे डिस्नेलॅंडला तीन दिवस सतत फिरत मजा करीत राहाल तरी कमीच वाटेल अशी विविध प्रकारची आकर्षणे आहेत छोटयासाठी 'मोनोरेल' ही सुंदर सजविलेली पण खरीखुरी गाडी—अनेक प्रकारचे मजेदार खेळ-तर तरूण तरुणीसाठी रोमान्सकरण्याकरिता अनेक जागा-कधी ट्रॉलीत-तर कधी अंधारलेल्या गुहेत तर क्षणार्धात टेकडीच्या टोकावर तर कुठे 'रोप वे' (Rope way) ने अधांतरी लटकून दऱ्याखोऱ्यावरील प्रवास-कधी पाण्या-खालून तरी कुठे पाण्यावरून-अगदी-चंद्रतारे याच्या भेटी सुद्धा तुम्हाला घेता येतील. अशी भूलभुलैय्या करणारी साधने व साया आहेत वृद्धा—साठी—अपंगासाठी वाहून नेण्याची खुर्ची आदी साधने आहेतच पण सगळी मजा पायी फिरून इथले प्रत्येक आकर्षण पाहण्यात आहे हे तितकेच खरे बस एकदा तिकिट काढले म्हणजे झाले मग पुन्हा बाहेर पडण्याचा रस्ता देखील एकदम लक्षात येत नाही तुम्ही पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणी गोलगोल फिरत शोधत राहता

आम्ही डिस्नेलॅंडला गेलो तव्हा विविध देशातली अकरा जोडपी (तरुण-म्हातारी) आमच्या बरोबर होती आम्ही सर्वजण आपापल्या जोडीदाराबरोबर वेगवेगळ्या ठिकाणी गेलो व सर्वांनी शेवटी पुन्हा कुठे किती तासानंतर भेटायचं हे आधीच ठरवून घेतले त्यामुळे ज्याला जे जे बघायचे होते त्या त्या ठिकाणी ते गेले व भेटल्यावर प्रत्येकाने आपण काय काय पाहिले-कुठे कुठे गेलो-कुठे फजिती झाली-कुठे भीती वाटली हे सगळे एकमेकाना परतीच्या प्रवासात मोकळेपणाने सांगितले भाषा सगळ्याच्या सोईची म्हणून इंग्रजी ही असल्याने इंडिया, ग्रीस, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, बांगला देश अशा वेगवेगळ्या देशातून

आलेल्या आम्हा सर्व मडळींना एकमेकाशी बोलणे सोपे गेले सारे प्रवासी घडीचे ही एक मैत्रीची भावनाही त्यात होतीच तर अशी ही डिस्नेलँडची करामत

—००—

# भारताची संत मीराबाई

इथे डोंगराच्या आतून अधारातून तुम्ही बोटीतून प्रवास करीत एकदम झगझगीत उजेडात येता आणि लागलीच रात्र सपून पहाट झाल्याचे जाणवते कारण सभोवताली पशुपक्षाचे चित्रविचित्र आवाज ऐकू येतात डोंगराच्या आतून वीज खेळवली आहे. त्यामुळे या अधार उजेडाच्या बोटीतील प्रवासात माईकच्या सहाय्याने तुमच्या कानाना हे पक्षाचे आवाज ऐकायला येतात. तर थोड्याच वेळात मुमधूर नृत्याच्या लयींचा ठेका कानावर येतो–सगीत सुरु राहत-प्रवासात नृत्यसगीताची सोबत पाण्यावर बोट चालली आहे-आणि शेजारी प्रियसखी मग आन–दाला काय तोटा ! अनेक देशाचे नृत्यप्रकार त्या देशातली विशिष्ट अशी वेषभूषा केलेल्या नृत्यांगना (बाहुल्या) आणि त्या विशिष्ठ देशातील सगीताची धून व लय असा हा प्रवास अनेक रगछटाच्या विद्युतदीपानी झळाळलेला-आपण स्वर्गसुख घेत असल्याप्रमाणे मनाला आनदून टाकणारा हा मॅजिक बोटचा बोगद्याखालून होणारा प्रवास दिग्मूढ करून टाकतो. डोंगरात डोंगरा खालून, आतून वीज खेळवली आहे नृत्यागना बाहुल्याना हरतऱ्हेने सजवून डोळ्याची उघडझाप करीत,हालचाली नृत्य करीत करायला लावले आहे आणि त्याचवेळी करमणुकीबरोबरच अनेक देशाच्या नृत्यप्रकाराचे ज्ञानही दिले आहे इंग्लड, अमेरिका, आफ्रिका, रशिया या सगळ्या देशाच्या बाहुल्या (छोटया मोठ्या आकाराच्या) नाचत होत्या. या सगळ्यात भारताची भजन गाणारी मीरा पाहून मन भरून पावल. हातात एकतारी घेतलेली शुभ्रवस्त्र परिधान केलेली गिरीधराच्या भक्तीने देहभान हरपून नृत्य करीत होती–होती बाहुलीच–पण त्या विशिष्ट

गडप होतो 'मॅजिक बोट' तुम्हाला डिस्नेलॅंडच्या मायाजालात आणून सोडते.

इथे आतमध्ये तिकिट लावून प्रवेश आहे तिकिटे आधीच काढून ठेवावी लागतात विलक्षण गर्दी असते पण इतकी अफाट गर्दी असूनही कुणीचेही लहान मूल हरवले आहे-चुकले आहे. आई बाबा करून रडते आहे अशी एकदाही अनाउसमेंट कानावर आली नाही नाहीतर आमच्या नागपूरला भरणारे दरवर्षीचे दुर्गापूजा प्रदर्शन-हटकून रोज माईकवरून ऐकू येईल एकदोन मुले हरवली आहेत टॉवरपाशी यावे डिस्नेलॅंडला तीन दिवस सतत फिरत मजा करीत राहाल तरी कमीच वाटेल अशी विविध प्रकारची आकर्षणे आहेत छोटयासाठी 'मोनोरेल' ही सुंदर सजविलेली पण खरीखुरी गाडी–अनेक प्रकारचे मजेदार खेळ-तर तरूण तरुणीसाठी रोमान्सकरण्याकरिता अनेक जागा-कधी ट्रॉलीत-तर कधी अधारलेल्या गुहेत तर क्षणार्धात टेकडीच्या टोकावर तर कुठे 'रोप वे' (Rope way) ने अधातंरी लटकून दऱ्याखोऱ्यावरील प्रवास-कधी पाण्या-खालून तरी कुठे पाण्यावरून-अगदी-चद्रतारे याच्या भेटी सुद्धा तुम्हाला घेता येतील. अशी भूलभुलैय्या करणारी साधने व साधा आहेत वृद्धा–साठी–अपगासाठी वाहून नेण्याची खुर्ची आदी साधने आहेतच पण सगळी मजा पायी फिरून इथले प्रत्येक आकर्षण पाहण्यात आहे हे तितकेच खरे बस एकदा तिकिट काढले म्हणजे झाले मग पुन्हा बाहेर पडण्याचा रस्ता देखील एकदम लक्षात येत नाही तुम्ही पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणी गोलगोल फिरत शोधत राहता

आम्ही डिस्नेलॅंडला गेलो तेव्हा विविध देशातली अकरा जोडपी (तरुण-म्हातारी) आमच्या बरोबर होती आम्ही सर्वजण आपापल्या जोडीदाराबरोबर वेगवेगळया ठिकाणी गेलो व सर्वांनी शेवटी पुन्हा कुठे किती तासानतर भेटायचे हे आधीच ठरवून घेतले त्यामुळे ज्याला जे जे बघायचे होते त्या त्या ठिकाणी ते गेले व भेटल्यावर प्रत्येकाने आपण काय काय पाहिले-कुठे कुठे गेलो-कुठे फजिती झाली-कुठे भीती वाटली हे सगळे एकमेकाना परतीच्या प्रवासात मोकळेपणाने सांगितले भाषा सगळयाच्या सोईची म्हणून इग्रजी ही असल्याने इडिया, ग्रीस, इग्लड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, बागला देश अशा वेगवेगळया देशातून

आलेल्या आम्हा सर्व मडळीना एकमेकाशी बोलणे सोपे गेले. सारे प्रवासी घडीचे ही एक मैत्रीची भावनाही त्यात होतीच. तर अशी ही डिस्नेलॅंडची करामत

—००—

# भारताची संत मीराबाई

इथे डोगराच्या आतून अधारातून तुम्ही बोटीतून प्रवास करीत एकदम झगझगीत उजेडात येता आणि लागलीच रात्र सपून पहाट झाल्याचे जाणवते कारण सभोवताली पशुपक्षाचे चित्रविचित्र आवाज ऐकू येतात. डोगराच्या आतून वीज खेळवली आहे. त्यामुळे या अधार उजेडाच्या बोटीतील प्रवासात माईकच्या सहाय्याने तुमच्या कानाना हे पक्षाचे आवाज ऐकायला येतात. तर थोडयाच वेळात सुमधूर नृत्याच्या लयीचा ठेका कानावर येतो—सगीत सुरु राहत-प्रवासात नृत्यसगीताची सोबत पाण्यावर बोट चालली आहे-आणि शेजारी प्रियसखी मग आन-दाला काय तोटा ! अनेक देशाचे नृत्यप्रकार त्या देशातली विशिष्ट अशी वेषभूषा केलेल्या नृत्यांगना (बाहुल्या) आणि त्या विशिष्ठ देशातील सगीताची धून व लय असा हा प्रवास अनेक रगछटाच्या विद्युतदीपानी झळाळलेला-आपण स्वर्गसुख घेत असल्याप्रमाणे मनाला आनदून टाकणारा हा मॅजिक बोटचा बोगद्याखालून होणारा प्रवास दिग्मूढ करून टाकतो. डोगरात डोगरा खालून, आतून वीज खेळवली आहे नृत्यांगना बाहुल्याना हरतऱ्हेने सजवून डोळयाची उघडझाप करीत,हालचाली नृत्य करीत करा-यला लावले आहे आणि त्याचवेळी करमणुकीबरोबरच अनेक देशाच्या नृत्यप्रकाराचे ज्ञानही दिले आहे इंग्लड, अमेरिका, आफ्रिका, रशिया या सगळया देशाच्या बाहुल्या (छोटया मोठया आकाराच्या) नाचत होत्या. या सगळयात भारताची भजन गाणारी मीरा पाहून मन भरून पावल. हातात एकतारी घेतलेली शुभ्रवस्त्र परिधान केलेली गिरीधराच्या भक्तीने देहभान हरपून नृत्य करीत होती—होती बाहुलीच—पण त्या विशिष्ट

वातावरणात, पार्श्वभूमीवर ती आपल्या साधेपणाने छाप पाडून गेली. हा नृत्यप्रकार सपतो तोच कथा प्रकार सुरु–तोही संगीताच्या ताला–सुरानी नटलेला–हिमगौरी आणि सातबुटके याची कथा तर फारच छान वाटते-छोटी छोटी मुल डोळे मोठ्ठे करून डोळयात जणु ती कथा साठवून घेताना दिसली. या कथेतल्या चेटकिणीही किती हुबेहुब उभ्या केल्या आहेत snow white and seven dwarfs ही कथा सर्वच देशात लहान मुलाना आवडलेली माहिती असलेली आणि म्हणूनच ही अमरकथा इथे अशी जिवत केली आहे–केवढे हे कल्पना वैभव–

—००—

## फॅण्टसी फॅण्टसी

डिस्नेलॅडमधील हा फॅण्टसी विभाग म्हणजे अगदी अदभूतच आहे. अद्भुतातून अद्भूताकडे होणारा हा प्रवास चित्तथरारक वाटला. या प्रवासात स्मशानभूमी थडगे, सागाडेभूत–त्याचे रडणे, हसणे, भाडणे अगदी थरकाप उडविणारे वाटले- मोठ असूनही भीती वाटली हे खरे. मानवी सागाडे-त्याचे थरकाप उडविणारे किचाळणे, मधेच भयाण (स्मशान शातता) शातता-भूत पिशाच्च, हास्याचा गडगडाट आणि असे अनेक प्रकार दिसतात, ऐकू येतात आणि शरिर मनाला गोठवून टाक–तात-बधीर करतात हे सगळे कल्पनेतले नसून आपल्या समोर खरोखरच घडत असते त्यामुळे बसलेल्या ट्रॉलीचे बार नकळत आपण घट्ट धरून ठेवतो. आजुबाजुला भयाण मिट्ट काळोख-शेजारचे जवळचे काहीही दिसत नाही इलेक्ट्रीकच्या साहाय्याने व फोटोच्या कमालीच्या कौशल्याने हे देखावे हुबेहुब साधले आहेत आणि अद्भूतारम्य वातावरण निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत काही ठिकाणी तर जमिनीत दगडाखाली पुरलेले सागाडे दगड हालवून बाहेर येतात हे पाहून बोबडीच वळली.

—००—

# अवकाश यात्रा

'अवकाश यात्रा' ही आजवर नुसतीच वाचनात आलेली होती. त्याबद्दल बरच ऐकल होत मनाला फार उत्सुकता होती. डिस्नेलँडला ही 'अवकाश यात्रा' प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली आम्ही ट्रॉलीत बसलो. बसताना केवळ उत्साह, उत्सुकता होती पण ट्रॉली जसजशी पुढेपुढे जायला लागली अधार वाढत गेला मागे पुढे काहीच दिसेना आणि रूळाचा गडगडाट करीत ट्रॉली आकाशाच्या दिशेने वरवर उचउच धावायला लागली तेव्हा मात्र भीती वाटली. तशात तारे, चादण्या दिसायला लागल्या. चद्रही डोकावला आणि मग मात्र अवकाशात आपण वरवरच चाललो आहे आता मागे फिरता येणार नाही थाबता उतरताही येणार नाही हे कळून चुकले. कुठून या फदात पडलो असेही वाटले सगळे अवसान गळाले. ट्रॉली वरवर जातच होती आता स्वर्ग केवळ दोनच बोटे राहिला होता आणि आमचे हात स्वर्गाला टेकलेच. केवढा विलक्षण अनुभव हा अवकाश यात्रेचा मला तर भीतीच वाटली. पण पाश्चात्य देशात खरोखरच्या 'अवकाश यात्रेला' सामिल व्हायला अहमहिका लागलीय कमाल आहे इथल्या साहसी लोकाची. त्याच्या उत्साहाची आणि कल्पना चातुर्याची डिस्नेलँडला चद्रताऱ्याची. ही प्रति-सृष्टीच पाहायला मिळाली लहानापासून थोरापर्यंत सर्वांना आनद देणारी ही डिस्नेलँडची अद्‌भूतरम्य नगरी आहे हेच खरे

अनेक प्रकारचे खेळ खाणे पिणे, मौज मजा याचा सुदर मिलाफ या प्रवासात इथे जाणवला. कारण जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेक प्रवासी लाखोच्या सख्येने डिस्नेलँड पाहायला सतत गर्दी करतात

या सगळ्या गर्दीत पाश्चात्य देशाचे वैशिष्ठ्य जाणवलेच. सर्वत्र अगत्य, मार्गदर्शन, शिस्त आणि उत्साह तशीच स्वच्छता कुठेही कागदाचे बोळे नाहीत गमत अशी की इथे सुरूवातीला गेल्याबरोबर फळाचा ताजा रस (सत्री, पाईन ॲपल, सफरचद, द्राक्ष) सर्व प्रवाशाना फुकट

देताना दिसले हे पाहून मात्र खरंच आश्चर्य वाटले. केवढी ही सुबत्ता व केवढे हे अगत्य, आतिथ्यशीलता, या, खा, प्या मजा करा तुमचे स्वागत असो अशी जणु ग्वाही मिळाली या प्रवासात फळाचा रस प्लास्टीकच्या सुदर ग्लासमधून फुकट पिऊन ग्लास फेकून द्यायचा ही इथे पद्धत होती इथूनच मला सारेच अद्भूतच वाटले असो तर हा एक नवा अनुभवच

या एवढ्या अफाट गर्दीत कुणीही हरवल्याचे एकदाही कानावर आले आही - एकदाही कुठे निवेदकाने सांगितले नाही - कारण व्यवस्थाच चोख होती.

—००—

# माझी भारतीय साडी

या सगळ्या गर्दीत भारतीय पद्धतीती साडी नेसलेली गळ्यात मगळसुत्र घातलेली मी एकटीच होते त्यामुळे अनेकजण मोठ्या उत्सुकतेने पाहात कुणी ओळख करायला पुढे येत - स्त्रिया साडी निरखून पहात आणि विचारत – “ तुम्ही इंडियातून इतक्या लाब आमच्या देशात आलात केवळ साईट सीईंग आठी ? आश्चर्य आहे इंडियाबद्दल आम्हाला फार उत्सुकता आहे पाहण्याची.आमचा देश तुम्हाला प्रवासी म्हणून कसा वाटला ? तुम्ही इग्रजी इतक छान कसं बोलता ? (डोंवल) हे मगळसूत्र इडियात रोज घालाव लागत का ? असे अनेक प्रश्न झाले - अनेकजणीनी माझ्याबरोबर फोटो काढून घेतले. जगाच्या पाठीवर पुन्हा कधी भेटी होतील कोण जाणे ? पण सारे मनावर कोरले गेले माणूस हा शेवटी माणूसच आहे - जगाच्या पाठीवर कुठेही राहिला तरी - आणि हाच धागा महत्वाचा.

—००—

# माणूस आणि अफाट जग

डिस्नेलँडला खरेदी करण्याकरिता अनेक दुकानेही थाटलेली आहेत. या दुकानातून स्पेस सुटपर्यंत अनेक छोटयामोठया गोष्टी मिळतात. तसेच स्पेस ब्लँकेट म्हणूनही खास प्रकारची गरम पांघरूणे (पातळ पण गरम) ब्लँकेटस् विक्रीसाठी ठेवलेली आढळली वेगवेगळया प्रकारचे सुंदर काचेचे रंगीबेरंगी ग्लासेस, भांडी कपबशा आदी अनेक प्रकार मन मोहून टाकणारे होते लाकडी कोरीव काम केलेली छोटीमोठी भांडी, टेबललॅम्पही होते पण हे सगळे परतीच्या प्रवासात संभाळून आणणे फार कठीण होते. म्हणून नुसत्या दृष्टीसुखावरच समाधान मानले. मात्र एक छानसा डिझाईन काढलेला बाऊल (भांडे) डिस्नेलँडची आठवण म्हणून विकत घेतला.

खूप हिंडण्याने आणि डोक्यात खूप साठविण्यानें भूकही खूप लागते. हे जाणूनच खाद्यप्रकाराची विविधताही इथे होतीच. सर्वत्र हॉटेल गर्दीने भरलेली - नंबराप्रमाणे क्यु मध्ये उभे राहून जागा रिकामी होताच जेवण घेतले. आईस्क्रीम, केक, व हरतऱ्हेची पेय याचे अनेक प्रकार होते. हे सर्वत्र पाटया लावून वेगवेगळया विभागात मांडलेले असल्याने सोयीचे झाले. खूप खा – खूप फिरा - मजा करा - आनंद उपभोगा असं जणु डिस्नेलँडच वातावरण सांगत होतं.

परतीची वेळ झाली - सकाळपासून आम्ही डिस्नेलॅंड पहात पायी फिरत होतो – संध्याकाळ केंव्हा झाली कळलेही नाही. पण आता परतणे भाग होते. आणखी दोन दिवस डिस्नेलँडचा मुक्काम वाढवला सगळी मौज मजा लुटली आणि आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. परतीच्या बसेस प्रवाशानी भरभरून निघाल्या. आम्हीही डिस्नेलँडला टा टा करून निघालो. डिस्नेलॅन्ड पाहणे हा एक खरोखरीच अविस्मरणीय अनुभव आहे. मुलांकरिता - मोठयांकरिताही जगातली अनेक आश्चर्ये या ठिकाणी एकवटली आहेत. ती थक्क करून सोडतात.

# एपकॉट सेंटर, उद्याचे जग

डिस्नेलॅन्डच्या स्मृती मनात घोळवीत आम्ही पुढे निघालो तो 'एपकॉट सेटरला' या एपकॉट सेटरमध्येही मती गुग होते कारण इथे उद्याच्या जगाचा विचार प्रत्यक्षात आणलेला आहे भावी जग – भावी काळ – भविष्यकाळ जाणण्याची माणसाला स्वाभाविकच जिज्ञासा असते. पुढील पचवीस वर्षांनी हे जग आजचे जग कसे असेल ? काय काय नव्या नव्या गोष्टी, सोयी या नव्या जगात असतील अशी जिज्ञासा प्रत्येकालाच असते इथे तर विज्ञानाची दिग्मूढ करणारी वेगवान प्रगती आकडेवारी निशी व नकाशे, साधने, उपकरणे, प्रात्यक्षिक व प्रयोगासह तुमच्यापुढे माडलेली आहे. एपकॉट सेटर आपल्याला उद्याच्या जगात आणून सोडते. 'युनिव्हर्स ऑफ एनर्जी' 'वर्ल्ड ऑफ मोशन' – जर्नी इन टु इमॅजिनेशन – पृथ्वी अवकाश, आकाश या सर्वत्र ठिकाणी विज्ञानाच्या सहाय्याने केलेली व होणारी भविष्यकाळातली प्रगती दाखवली आहे. पुढले युग हे यत्रयुग – विज्ञानयुग – – गतीयुग – ज्याला सतत वाढणारा व वाढतच जाणारा वेग राहील असे आहे तेव्हा दमछाक होईपर्यंत यत्रा-बरोबर सतत धावपळ करायची आहे. सुखासोबत साहसी करायचे आहे. विज्ञान हा मानवाला वर ठरणार की शाप ठरणार आहे पुढील काही वर्षातच स्पेसशिप अर्थ (Spaceship Earth) या ठिकाणी इथे १८० फूट उच अशा जिओस्पिअरमधून मनाला फिरवून आणतात मानवी घडपड – दळणवळणाची कालच्या भूतकाळापासून उद्या भविष्यकाळा-पर्यंती सर्वप्रकारची साधने माहीतीपूर्वक इथे दाखवली आहेत – भूत भविष्य जोडणारा हा विज्ञानाचा पूल पाहून मनाला भविष्यातल्या पहाटेचे सुखद स्वप्न पडते ते इथेच. तसेच 'युनिव्हर्स ऑफ एनर्जी' या ठिकाणी सूर्यप्रकाशातली सहल आहे. सुर्याकडे झेपावणारा उद्याचा मानव रानावनात जगली प्राण्यासोबत राहणारा कालचा मानव यातूनही विज्ञानाची प्रगती दाखवली आहे. तसेच World of Motion – या ठिकाणी

भविष्यकाळात, पुढच्या युगात प्रवास कसा राहील, प्रवासाची साधने कसीकशी व कोणती राहतील याचे गणिती वेळापत्रक सचित्र माहिती देते – आजवरच्या दळणवळण साधनाचा पूर्वइतिहास व उद्याच्या युगात घडणारा भविष्यातला प्रवास साधनाचा इतिहास माहितीसह भूत भविष्याना जोडणारा असा हा प्रवास आपल मन पाहतापाहता भरूनही जात – आणि मग जाणवते ती विज्ञानाची झेप – ट्रान्ससेटरमध्ये हे सर्व दाखवितात. 'जर्नी इन टु इमॅजिनेशन (Journev into Imagination) या ठिकाणी तर कृतीशील आणि गतीशील याची कल्पनेने घातलेली सागड पुन्हा भूतभविष्याचा साधा जोडसाना आढळली–भुतकाळाकडून भविष्य-काळाकडे – विज्ञानाच्या सहाय्याने मनाला गरगर गिरक्या घेत एपकॉट सेटर फिरवून आणते असा हा मॅजिक जर्नी (Majic Journey) आहे. याशिवाय इतर अनेक गोष्टी एपकॉट सेटरमध्ये पाहण्याजोग्या आहेत. उद्याची शेती पीकपाणी कसे राहील ? माणसाचे मातीशी नाते कसे व कितपत राहील – पूर्वी पासून माणूस व त्याचे मातीशी नाते – त्याचे मातीतून जन्म घेणे व मातीत मिळून जाणे – सपणे या सगळ्याची आपल्याला असणारी माहिती व सवय याचेही दर्शन इथे घडते कालची शेतीप्रधान सस्कृती उद्याची भविष्यातली भावी सस्कृती याचे दर्शन विविधतेने माणूस आणि त्याचे मातीशी असणारे नाते या सदर्भात उद्याची शेती पिकपाणी (Kitchen Kabaret) या दृष्टीने एपकॉट सेटरमध्ये दर्शन घडविले आहे एपकॉट सेटर म्हणजे उद्याचे नवे जग – नवे युग – नव्या कल्पना याचा मनाला गुग करून टाकणारा हा प्रवास चित्राचत पाहून मनाला थकवा येतो.

—००—

# गमतीदार लंच डिनर

आणि साहाजिकच मनाला थकवा आला की भूकही लागणारच. त्याचीही सोय तात्काळ इथे आढळली ठिकठिकाणी मार्गदर्शन -तत्पर सेवा – फिश, चिकन सूप, आईसक्रीम, सँडवीच ऑमलेट, पिझा, हॅम्बरगर – ब्रेकफास्ट, लच, डिनर – काय म्हणाल ते तय्यार प्रत्यक्षात हे – केवळ भविष्यात वा चित्रात नव्हे इथेही बसण्यासाठी (थकवा आल्यास) छान व्यवस्था आहे अपगाना वाहून नेणाऱ्या सोयी आहेत खास खुर्च्या आहेत इथे सर्वच व्यवस्था अद्ययावत आहे रेस्टॉरटमध्येही व्हील-चेअरवर सरकणारे – तरगणारे रेस्टॉरट आहे सगळेच अजब आहे – मती गुगविणारे विज्ञानाची प्रगती दाखवणारे भविष्याचा वेध घेणारे सुखसमाधानाची मानवाची धडपड दाखविणारे – निसर्गावर झेप घेऊन त्याला काबूत आणणारे हे विज्ञान आणि हा मानव – चद्रसूर्यांची बटने करून खमिसाला लावण्याची इर्ष्या बाळगणारा हा धडपडचा साहसी मानव – त्याचे अदभूत दर्शन या ठिकाणी एपकॉट सेटर मध्ये घडविले आहे.भविष्यातील जग (Future world) असाच याचा इथे उल्लेख आहे. अभ्यासकाना विज्ञानाच्या अभ्यासकानी सर्वसामान्य प्रवाशानी अवश्य पाहण्याजोगे असे हे एपकॉट सेटरचे दर्शन आहे कायकाय पाहू कायकाय डोक्यात ठेवू – कोणते ठेवू आणि कोणते सोडून देऊ – विसरून जाऊ ? कळतच नाही अशी विविधता या ठिकाणी आहे – खरच माणसाच मन ही एक अजब चीज आहे हेच खरे मनात आणिल तर माणूस काय करील आणि काय नाही, सागता येणार नाही इकडचे जग तिकडे सुद्धा तो उचलून ठेवील असे हे सगळे पाहून मनात आले माणसाचा माणसाला अभिमान वाटावा असे एपकॉट सेटरचे दर्शन आहे.

एपकॉट सेंटर 'भावी जग' याची ओळख या ठिकाणी पटते. मानवी सस्कृतीच्या आजवरच्या वाटचालीचे व पुढे होणाऱ्या त्याच्या प्रवासाचे, मानवाच्या जगज्जेत्या आकाक्षेचे एक एक गड काबीज करणारे हे सेंटर

आहे–पुढे ? पुढे आणखी पुढे ? लोकसंख्येची प्रचंड वाढ, पानावरील किडयांप्रमाणे वळवळणारा माणूस, यांत्रिकता–यांत्रिक युगाने जवळ आलेले जग व तेवढाच एकमेकापासून दूर गेलेला माणूस, माणूसकीला दुरावलेला, विसरलेला माणूस आणि शेवटी निसर्गाचे श्रेष्ठत्व.

—००—

# 'कसा झाला रे मानूस'

मला आपल्या विदर्भातला कवी विठ्ठलवाघाची कविता आठवत राहिली. कसा झाला रे मानूस ? कळुंलिबाचा रे पाला । याच्या अगा–अगावर सायलीचे काटे । माणूसकी विसरलेला– मनुष्यत्व सपलेला माणसाच्याच जीवावर उठलेला–सत्तेकरिता, स्पर्धा करणारा विज्ञानाच्या सहाय्याने विनाश घडविणारा–'नरेरचि केला हीन' किती नर विज्ञान हा शाप की वर ? असा प्रश्न आपल्यापुढे टाकणारा हा माणूस! छे एपकॉट सेंटर पाहून मन विचारात गुरफटल-प्रवासापुढे सुरु झाला पण मन मात्र मागे मागे रेंगाळत राहिल-एपकॉट सेंटर भोवतीच आमच्या प्रवासाचा आता अखेरचा टप्पा सुरु झाला. होता सारा प्रवास अनेक गोष्टी पाहून मन भरून गेलेवे फ्लॉरिडाच्या प्रसन्न दर्शनात मन सुखावलं-त्याहीपेक्षा मीयामिचा समुद्रकिनारा, समुद्र पाहून मन तृप्त झाल, शांत शांत झालं.

—००—

# मिआमिचा समुद्र

अफाट-अपार, अक्षितीज पसरलेला हा मिआमिचा (मायामि) समुद्र पाहिला आणि मन स्तब्ध झाल-गारेगार झाल मिआमीच्या हवेतच उत्साह जाणवला सुदर रस्ते, मोठमोठी पचताराकित हॉटेल्स, रगीबेरंगी कपडे केलेले आधुनिक, अत्याधुनिक फॅशनचे नमुनें असणारे स्त्रीपुरुष सर्वत्र सुदर हिरवीगार लॉन आणि गावातून पुलाखालून दिसणाऱ्या प्रवाशाना वाहुन नेणाऱ्या नाजूक रगीत बोटी या बोटीत बसून मजेत पाण्यात हात घालून फिरत रहाव एखाद्या छोटयाशा बेटावर याव, चोफेर हिरव निळसर चमकणार स्वच्छ पाणी, कोवळ ऊन आणि जाग यावी तस काहीस छान वाटल मिआमिला आल्यावर हे शहर आम्हाला फार आवडल आम्ही मिआमिला येऊन पोचलो.

—००—

# पंचताराकितमधला अनुभव

तेव्हा सध्याकाळचे पाच (तिकडचे) वाजत होते 'डोव्हिल' या पंचताराकित हॉटेलात चोविसाव्या मजल्यावर आमची खोली होती. ते हॉटेल, त्याच्या दर्शनी भागाना असणाऱ्या सुदर जाळीच्या कमानी. त्यानतर दिसणाऱ्या पाढऱ्या शुभ्र सगमरवरी लाबच लाब पसरलेल्या पायऱ्या. काचेची दर्शनी दार आणि पुढे पाऊल टाकताच मऊशार गालिच्यात गडप होणारे आपले पाय कुठे लक्ष देऊ नी कुठे नको अस झाल-'डोव्हिल' अक्षर आमच स्वागत करीत होती अदबशीर चटपटीत नोकर वर्ग लगेच सामानाच्या व्यवस्थेला हजर झाला इथे अमेरिकेत हॉटेलमध्ये नोकरवर्ग दिसतो. एरव्ही रस्त्यावर कुठेही हमाल दिसणार नाही.

आमची प्राथमिक ओळख, व्यवस्थापकाशी होईपर्यंत आमच सामान वर चोविसाव्या मजल्यावर खोलीत गेलही-आम्ही मात्र उगाचच आमचं सामान आमच सामान करीत कावरेबावरे-इथल्या मायमिच्या उत्साहाचा, चटपटीतपणाचा ताबडतोब प्रत्यय आला. वर खोलीकडे लिफ्टनें पोचलो.

हो लिफ्टची गमत सागायचीच राहीली. इथे लिफ्ट आपली आपणच सुरु करायची-उतरल्यावर खाली पाठवायची लिफ्टमधें इतक्या तऱ्हेच्या सोयी होत्या-बटन होती आणि रंगीबेरगी छोटे लुकलुकणारे दिवे आणि मजला कोणता आला हे दर्शविणारे आकडे. आम्ही ऐटीत आत लिफ्टमधे चढलो दार ओढून बटन दाबले रगीत दिवा लागून लिफ्ट सुरुही झाली गमत म्हणून आत्मविश्वासाने एकमेकाकडे पाहिपर्यंत चोविसावा मजला केव्हाच निघून गेला आता मात्र भीती वाटली लिफ्ट वरवर मजल्यावर मजले करीत चालुच काय कराव कळेना-कोणती बटन दाबावी कळेना थाबवा थाबवा म्हणून ओरडूनही काही जमेना-सरसर काटे-रगीत दिवे फिरत होते वरवर चाललो-५२,५३,५४ मग मात्र फारच भीती वाटली अखेर एक बटनदाबल-लिफ्टथाबली आधी भ्यायलेले आम्ही बाहेर पडलो अमेरिकेतल्या या सगळ्या अत्याधुनिक यत्राची माहिती नसली म्हणजे खूपच फाजती होते-जवळपास सगळ्या खाल्याचा दार बद. कुणी माणूस डोळ्याना दिसेना ५४ वा मजला खाली जायचा जिनाहीकुठेमिळेना-काही वेळ तसेच थाबलो इतक्यात एक खोली उघडली व तो माणूस खाली जाण्याकरिता लिफ्टमध्ये बसतो आहे पाहताच आम्हीही लिफ्टमध्ये घुसलो त्याला ऐटीत हॅलो,गुडइव्हिनीग वगैरे म्हणून नबर २४ अस सागितलं-त्याने चोविस आकड्यावर लिफ्ट थाबवली. लिफ्टबाहेर पडून त्याला थँक्स म्हटल तर लिफ्टने तो पार खालच्या मजल्यावर पोचलेला. आम्ही सुटकेचा श्वास घेतला. पुन्हा म्हणून एकट लिफ्टमध्ये बसायच नाही अस ठरवल पण हे शिकून घेण आवश्यक होत. दुसऱ्या दिवशीपासून सगळी व्यवस्थित माहिती घेतली आणि तरबेज झालो. आपल्याच फजितीला हसत राहिलो.अज्ञानामुळे परदेशात अनेकदा फजिती होते गमतीदार अनुभवही येतात.

असाच एक अनुभव डाऊन टाऊनला आला जेवण कोणत घ्यावं आपल्या सवयीनुसार भूक भागेल आणि आवडेलही अस सगळ आधीच

ठरवून ठेवाव लागे आम्ही त्यानुसार बेत ठरवीत असू. पाश्चात्य देशात फळफळावळ व फळाचे रस फार छान व अगदी ताजे असतात त्यानुसार आम्ही रात्रीचे जेवण बऱ्याच अंशी फळावर भागवत असू अगदी पोटभर व मन तृप्त करणारी सत्री, केळी, पाईनॲपलज्युस व सफरचंद रोज संध्याकाळी पायी फिरत गावातील मार्केट शोधत जायच फळाचा विभाग शोधायचा आणि मग सगळे प्राथमिक सोपस्कार करुन फळाची प्लास्टिक थैली घेऊन हॉटेलवर परतायचे रुममध्ये ब्रेड बटर, जॅम ठेवलेलेच असे. व्यवस्थित जेवण होई पण एकदा मात्र गमत झाली

—००—

## फजितीतून ज्ञान

मिआमिला आम्ही मार्केट शोधत निघालो. ऐका ठिकाणी माणसं आत बाहेर येतजात होती आतून पिशव्या सामान भरभरुन आणित होती काहींच्या हातात ताज्या फळाच्या पिशव्या दिसल्या—सापडल मार्केट इथली मार्केटही अद्यावत व दोन दोन मजली—अतिशय स्वच्छ काचेचे पारदर्शक दरवाजे लावलेले—तेही स्प्रिंगचे—आपोआप बंद होणारे बाहेर जीवजिवाणु नसतच—पण असल तर ते दार उघड राहिल्याने आत मार्केट-मध्ये शिरायला नको म्हणून किती काळजी घेतलेली. आम्ही गेलो आणि काचेच्या दरवाजा जवळ बाहेरच उभे. दार उघडायच्या आधीच फुटभर अंतरावरच मुख्य दार फटकन् आपोआप उघडल—दार कस उघडल काही कळेना पण आपल्याला माहित असल्याचा आव आणून निरिक्षण करीतच फळ खरेदी केली. तर मग लक्षात आल कि आधीच्या दाराजवळ (जिथं सुरुवातीला आम्ही उभे होतो) आपण येताच पुढल दार आपोआप आपल्या समोर स्वागताला जणू उघडत अशी सोयच केलेली. मग हातात सामान—लहान मूल कडेवर असलं तरी दार उघडायला हात नकोत—पायाच वजन ठराविक जागी पडल की समोरच पुढचं दार उघडत. हॉटेलात परतल्यावर आपल्या फजितीला आम्ही खूप हसलो.

तशा फजितीच्या गोष्टी परदेशात खूपच होतात-पण निभाऊन न्यायचे Show must go on चटपटीतपणा, हुषारी, सफाईदारपणा हे तिथे हवच, कुणीकुणाला सागायला रिकाम नाही हेच खर

तर मिआमिला विशाल समुद्र किनारा सुखदायी हवामान–सदैव भूक लागणारी आणि भागवणारी सोय यामुळें खूपच मजा आली. सकाळीच हॉटेलमध्ये जाग आल्यावर समुद्रस्नानाकरिता आलेली फिरायला आलेली रगीबेरगी पोशाखातील मंडळी काचेतून दिसायची. एवढ्या उचीवरून खिडकीतून ती माणस रगीत बाहुल्याप्रमाणे दिसत, मजा येई. रोज रुम-मध्ये नॅपकीन्स, टॉवेल्स–ग्लासेस बदलले जात व परीट घडीचे टॉवेल्स नवेनवे साबण ठेवले जात पाणी पिऊन ते सुदर ग्लासेस (प्लास्टिकचे) फेकून देण जिवावर येई पण तिकडे तशी पद्धतच–पचतारांकित हॉटेला-तली ती पचतारांकित माणस Do in Rome as Romans do असं म्हटलच आहे

मिआमिला अमेरिकेतच्या इतर मोठ्या शहराप्रमाणे उचउच इमारती लाबलचक स्वच्छ रस्ते 'सफारी पार्क '-' वॅक्स म्युझिअम '-' सिक्वेरिअम ' गार्डन्स–' ट्रॉपिकल गार्डन्स ' ' मकी जगल '–' पॅरट जगल '–टूर ट्रेन असे सगळे प्रकार आहेत. जे या आधी न्युयॉर्क, वॉशिंग्टन, फ्लोरिडा, डिस्ने-लँडला व इग्लडलाही आम्ही पाहिलेले होते. त्यामुळे पुनरावृत्ती करीत नाही पण इथे सगळ्या मोठ्या शहरातून ही आकर्षण आहेतच.

मात्र मिआमिच्या मकी जगलमध्ये माणस पिजऱ्यातून पहातात आणि माकड मोकळी मुक्तपणे फिरतात उत्तर अमेरिकेतील माकडाची सर्वात जुनी जात इथल्या माकडामध्ये आढळते ती फारच जगली आहेत. अजून माणसाळली नाहीत भयानक वाटतात ती पोहतात–खेळ करतात मकी थिएटर आहे गोरिल्ला मिट्झी,, बबून, एप्स अनेक जाती आहेत शेवटी सर्व माकडेच. मिआमिच्या सिक्वेरिअममध्ये व्हेल जातीच्या माशाचे चित्तथरारक खेळ पाहिले–तसेच डॉलफीन्, सीलायन्, शार्कस असे अनेक जातीचे धिप्पाड मासे त्याचे खेळ–कवायती नाचणे पाहिले तसेच दुर्मिळ असे पक्षी, मगरी, सुसरी, कासव हे प्राणीही इथे ठेवले आहेत पॅरट जंगलमध्ये तर हरप्रकारचे सुदर पोपट आहेत कुठे पाहु कुठे नको असे

वाटते–त्याचे स्वच्छद वागडणे–उडणे–गाणे–समूहगीत – त्यावरहुकूम झुलणे त्याच्या शर्यती, सर्व प्रकार पाहून मजा वाटली.

इथले लोक एकूण फारच सधन आहेत पैसा खर्च कसा करावा–संपवावा असाच त्याना प्रश्न पडत असतो– सकाळपासून रात्रीपर्यंत ते हरत-हेच्या सुखाना विकत घेतात व त्याकरिता मनमानी मुक्तपणे पैसा खर्च करतात पण महत्वाचे हे की हा पैसा ते कष्टाने–स्वकष्टाने मेहनत करून–धाडस–साहस करुन मिळवतात पैसा मिळवायचा कष्ट करून आणि मगच त्याचा उपभोग घ्यायचा मुक्तपणे ही इथली पद्धत-म्हणूनच ते सुख त्याच्या अगी लागत, अगोपाग पसरत. कामाच्या वेळी काम आणि मजेच्या वेळी मुक्त मजा घेणे हा मंत्र आहे त्याचा मिआमिला येण्याआधी आम्हाला काही स्नेही मंडळीनी धोक्याच्या सूचना दिल्या होत्या कुणावरही इथे एकदम विश्वास ठेवु नका म्हणून, आम्हीही सावधपणेच वागत होतो. पण तरीही एकदा प्रसग आलाच सकाळी पायी फिरायला निघालो. फुट-पाथवरून शोकेसिस पाहात आम्ही चालली होतो.

–००–

# गुड गुड मार्निंग व डॉलर

इथे ओळखीचे कुणीही भेटणे असणे शक्यच नव्हते आम्ही त्यामुळे आमच्यातच दग होतो. माझ्या हातात माझी छोटी पर्स होती– त्यात रुमच्या किल्ल्या–काही डॉलर्स–काही महत्वाचे कागद–पत्रे होते

आमच लक्षच नव्हत तर एक अति उंच किडकिडीत चमत्कारिक पोशाख घातलेला–विचित्र टोपी–जॅकेट घातलेला, बऱ्यापैकी पोशाख घातलेला मनुष्य एकदम समोरून हसत आमच्याकडे आला अणि हात पुढे करून 'गुड मॉर्निंग' म्हणाला व बोलायला उभाच राहिला आम्ही क्षणभर भांबावलो–पण मग सावध झालो– 'यू आर फ्रॉम इंडिया–! ओ. आय सी.! कुठे उतरलात ? वगैरे विचारायला लागला. रस्त्या-

वर तुरळक माणसे होती हॉटेलच्या जवळचाच हा रस्ता होता. आम्ही त्याला कटवायचा प्रयत्न केला. तर वेडसरपणे हसायलाच लागला-पर्सला हात लावण्याचा विचार दिसला आम्ही त्याला बाय बाय म्हणून विरूद्ध दिशेने झपाझप निघालो इथे कुणीही ओळखीचे नाही त्यामुळे पर्स हिसकणे वगैरे प्रकार अधूनमधून चालतात असे ऐकलेले होतेच कारण मिश्रामिला श्रीमंत प्रवासी ऐषआराम करायला सतत येतच असतात. तेव्हा हा प्रकार असंभवनीय नाही. हा माणूस जातीने ज्यू असल्याचे त्याच्या बोलण्यातून कळले-बोलणेही मोडक्या तोडक्या त्याच्या (आमच्या नव्हे) इंग्रजीतून असो-

० ०

# केल्याने देशाटन पंडितमैत्री

केल्याने देशाटन पंडित मैत्री-सभेत संसार असे म्हणतात- तो अनुभव या देशाटनाने आला हे खरे.किती प्रवास किती प्रकारचे अनुभव. हा फक्त इंग्लंड व अमेरिका (पूर्व) एवढाच प्रवास तरीही बरेच शिकवून गेला-एकूण इंग्लंड अजूनही राजेराजवाड्यांच्या जमान्यांत आहेसे जाणवले साहेबाची शिस्त वाखाणण्याजोगी आहे-वेळ-नियमितपणा, शिस्त सगळेच इंग्लंडचे वैभव आहे-कौतुक आहे. खास खानदानीपणा (Aristocrat) आहे परंपरेबाहेर जायला साहेबाला आवडत नाही. चेहऱ्याची इस्त्री बिघडू न देता जमेल तितकेच तो हसणार. पण एकदा तुम्हाला आपले मानले-मैत्री जमली तर ती टिकणार हे मात्र जाणवले. तर अमेरिकेत सगळाच खुल्लम खुल्ला कारभार-खा-प्या-गा-मजा करा-धाडस-साहस करा-तुमचं स्वागतच आहे- प्रत्येकक्षणाचा उपयोग करा-उपभोग घ्या. गेलेला (जाणारा) क्षण पुन्हा मिळणार नाही हे ध्यानात घ्या व त्याचा मुक्त उपभोग घ्या-कष्ट करा आणि मजाही करा हसत खेळत जगा - दिव्य - भव्य - जवळचे दूरचे सगळे समजून घ्या - ताबा

घ्या. शिकून घ्या आणि पुढे पुढे - पुढेच पाउल टाका. तेच जिवन आहे सदैव प्रगतीच्या दिशेने घोडदौड चालु ठेवा.असा जणु अमेरिकन जीवनाचा अर्थ दिसला. दिशा जाणवली - पण दोन्ही ठिकाणी - दोन्ही देशात इंग्लंड भारदस्त तर अमेरिका आधुनिक - अत्याधुनिक अस वाटल. अमेरिकेत माणसाचा मोकळेपणा अधिक अनुभवाला आला दोन्ही देशात डोळयाचं पारण फिटाव अशा अनेक गोष्टी पाहायला मिळाल्या - आता पुढच्या प्रवासात पश्चिम अमेरिका आणि युरोप तसेच जपान पाहण्याची इच्छा आहे. केव्हा योग येतो ते पहायचे कान - डोळे उघडे ठेवून जगातले सर्व शिकण्याजोगे - पहाण्या ऐकण्याजोगे - आधुनिक - अभिनव ते पाहायचे आणि आपल्याला जमेल तसे आपल्या रसिक वाचकापुढे लेखनाच्या रूपाने पुन्हा पुन्हा ठेवायचे अशी इच्छा आहे - तूर्त तशी तयारी चालू आहे चालु आहे - केव्हा योग येतो पहायचे - तूर्त पाहिलेल्या - केलेल्या प्रवासाच्या आठवणीत समुद्राची पहाटेची गाज ऐकत रहायचे, आठवत राहायचे.

REFBK-0025219

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५२८
३७९२८६